

# दुर्वांकुर

## (श्री गणपती अथर्वशीर्ष)

डॉ. वसुधा वि. देव
प्रा. कु. मेघा म. बल्लाळ

# दुर्वांकुर

ISBN - 28-978-93-84801-10-6

http//:www./chinmayasanskar.com
ह्या पुस्तकातील मुळ लेखांचा स्त्रोत
http//:www./facebook.com/sadaphuli/

(ISBN : 978-93-84801-10-6)

**सुनंदा प्रकाशन क्रं. २८, ता. २१ मे २०१८**

# दुर्वांकुर

**लेखक :**

डॉ. वसुधा विनोद देव, ०९४२२९५९७६४
३ चिन्मय, शंकर नगर,
घाटोळ लेआउट, जठारपेठ, अकोला. ४४४००५

श्री. विनोद दत्तात्रय देव ०९४२२९५९७६३

(सर्व हक्क सुरक्षित)

**प्रकाशक :**

श्री. मनीष शांताराम बुटे
सुनंदा प्रकाशन
राजेश्वर अपार्टमेंट, जलाराम शाळेजवळ,
तापडिया नगर, अकोला.
दूरध्वनी :- ०७२४-२४२१२९९
भ्रमनध्वनी :- ०९४२२९२०२२५

**आवृत्ती पहिली : दि. २१ मे २०१८**

**अक्षर रचना :**

संजय आर. अन्नदाते
चिराग ग्राफीक्स, जठारपेठ,अकोला.
९८५०६४७९९२


**मुद्रण :**

अश्विनी प्रिंटर्स, दत्त मंदिर समोर,
रामदासपेठ,अकोला. ९८२३१०९१९३

**मुल्य :**


रु. १५०/-

# समर्पित



मेरे जीवन के निर्माण की
तुम सुंदर अभिव्यक्ती हो
गुरु तुम मेरे जीवन हो !!!

प.पू. स्वामी पुरुषोत्तमानंद सरस्वती
ह्यांचे चरणी अर्पण



# चिन्मय सदाफुली
# (डॉ. वसुधा विनोद देव)

सहयोगी प्राध्यापक व

समन्वयक स्वामी चिन्मयनानंद अभ्यास केंद्र ,

शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला.

अध्यापनाचा अनुभव –२८ वर्ष

शिक्षण:– M.COM, M.A. (MARATHI,ECONOMICS,SUBJECT COMMUNICATION), M.ED. PhD.

प्रकाशन;–

१.एकूण ७ पुस्तके प्रकाशित

२.एका पुस्तकाला उत्कृष्ट पुस्तक पुरस्कार

३.दोन पुस्तके शासनमान्य

४.एका पुस्तकाचा अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश

५.एकूण २०० लेख प्रकाशित

६.जागतिक आंतरराष्ट्रीय राज्यस्तरीय चर्चा सत्रात सक्रिय सहभाग

७.२०१४ मध्ये अथेन्स ग्रीस येथे जागतिक तत्वज्ञान परिषदेत "SWAMI CHINMAYANAND ON RELIGION" ह्या विषयावर व्याख्यानाला आमंत्रित

८. हा जागतिक स्तरावरील पहिला प्रबंध मानव संसाधन विकास मंत्रालयाकडून

९.विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत शासकीय अध्यापक महाविद्यालयात स्वामी चिन्मयनानंद अभ्यास केंद्राची स्थापना

१०.स्वत: ची वेबसाईट www.chinmaysanskar.com

११.चिन्मय मिशन ची सक्रिय कार्यकर्ती

१२.संतगाडगेबाबाअमरावती विद्यापीठ अमरावती येथे Ph.D ची मार्गदर्शक एकूण ५ विद्यार्थ्यांना Ph.D प्राप्त



**प्रा. मेधा मधुकरराव बल्लाळ**
सेवानिवृत्त प्राध्यापक,
शिक्षण :- एम. ए.एम. एड्.

अध्यापनाचा दिर्घ अनुभव

अनेक लेख प्रकाशित,

विविध चर्चा सत्रातून सक्रिय सहभाग,

अध्यात्माची आवड

# मनोगत

दुर्वांकुर हे पुस्तक आपल्या सेवेत सादर करताना मला खूप आनंद होतो,,,श्री गणेश हे आपले सर्वांचे लाडके दैवत,,,अगदी पहिला संस्कार आपल्यावर होतो तो श्री गणेशाय नमः ह्या मंत्राचा,,, लहानपणापासून मी अथर्वशीर्ष घरी ऐकत असे,,पण त्याचा अर्थ खुप आकलन होत नव्हता,,,अनेकदा वाचून समजून घेण्याचा प्रयत्न केला ,,पण प पू स्वामी पुरुषोत्तमानंद सरस्वती ज्यांना आम्ही स्वामीजी म्हणतो त्यांनी जेव्हा अथर्वशीर्षाचे विवेचन केले तेव्हा मात्र शंका उरली नाही,,,मागच्या वर्षी म्हणजेच २०१७ मध्ये गणपतीचे आगमन झाले ,,आणि ह्यावर्षी आपण लेखनसेवेतून श्री गणेशाला दुर्वांकुर अर्पण करावे ही इच्छा मनात उत्पन्न झाली,,,आणि ह्या दुर्वांकुर ला प्रारंभ झाला,,,प्रत्येक दिवस हा नवीन आनंदाचा ठरला,,आणि २१ दुर्वांकुर पाहता पाहता नित्यनूतन बनत गेले,,,आणि जीवन जगताना दृष्टी कशी असावी ह्याचे मार्गदर्शन देऊन सिद्ध झालेत,,,श्रीगुरु कृपा ,,,,लेखन प्रेरणा देणारे तेच,,बुद्धीत प्रकाश देणारे तेच,,लेखन सेवा करून घेणारे तेच,,ही सेवा गुरुकृपेने सफल झाली व जीवनात नवीन आनंदाचा ठेवा प्रदान करून गेली,,,ही लेखनसेवा मी गुरुचरणी अर्पण करते,,,

*चिन्मय सदाफुली*
(डॉ. वसुधा विनोद देव,)
सहयोगी प्राध्यापक ,
शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला.

# श्री गणपति अथर्वशीर्ष

श्री गणपति अथर्वशीर्ष
मंगलकारी आहे श्री गणपति अथर्वशीर्ष
गणपति अथर्वशीर्ष



ॐ नमस्ते गणपतये।
त्वमेव प्रत्यक्षं तत्वमसि
त्वमेव केवलं कर्ता।ऽसि
त्वमेव केवलं धर्ता।ऽसि
त्वमेव केवलं हर्ता।ऽसि
त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्मासि
त्व साक्षादात्मा।ऽसि नित्यम्।।१।।

ऋतं वच्मि। सत्यं वच्मि।।२।।

अव त्व मां। अव वक्तारं।
अव श्रोतारं। अव दातारं।
अव धातारं। अवानूचानमव शिष्यं।
अव पश्चातात। अव पुरस्तात।
अवोत्तरात्तात। अव दक्षिणात्तात।
अवचोर्ध्वात्तात।। अवाधरात्तात।।
सर्वतो माँ पाहि-पाहि समंतात।।३।।

त्वं वाङ्मयस्त्वं चिन्मय:।
त्वमानंदमसयस्त्वं ब्रह्ममय:।
त्वं सच्चिदानंदाद्वितीयो।ऽषि।
त्वं प्रत्यक्षं ब्रह्माषि।
त्वं ज्ञानमयो विज्ञानमयो।ऽषि।।४।।

सर्वं जगदिदं त्वत्तो जायते।
सर्वं जगदिदं त्वत्तस्तिष्ठति।
सर्वं जगदिदं त्वयि लयमेष्यति।
सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति।
त्वं भूमिरापोऽनलोऽनिलो नभः।
त्वं चत्वारिकाकूपदानि।।५।।

त्वं गुणत्रयातीतः त्वमवस्थात्रयातीतः।
त्वं देहत्रयातीतः। त्वं कालत्रयातीतः।
त्वं मूलाधारस्थितोऽसि नित्यं।
त्वं शक्तित्रयात्मकः।
त्वां योगिनो ध्यायंति नित्यं।
त्वं ब्रह्मा त्वं विष्णुस्त्वं
रूद्रस्त्वं इंद्रस्त्वं अग्निस्त्वं
वायुस्त्वं सूर्यस्त्वं चंद्रमास्त्वं
ब्रह्मभूर्भुवःस्वरोम्।।६।।

गणादि पूर्वमुच्चार्य वर्णादिं तदनंतरं।
अनुस्वारः परतरः। अर्धेन्दुलसितं।
तारेण ऋद्धं। एतत्तव मनुस्वरूपं।
गकारः पूर्वरूपं। अकारो मध्यमरूपं।
अनुस्वारश्चान्त्यरूपं। बिन्दुरूत्तररूपं।
नादः संधानं। सँ हितासंधिः
सैषा गणेश विद्या। गणकऋषिः
निचृद्गायत्रीच्छंदः। गणपतिर्देवता।
ॐ गं गणपतये नमः।।७।।

एकदंताय विद्महे।
वक्रतुण्डाय धीमहि।

तन्नो दंती प्रचोदयात।।८।।

एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम्।
रदं च वरदं हस्तैर्विभ्राणं मूषकध्वजम्।
रक्तं लंबोदरं शूर्पकर्णकं रक्तवाससम्।
रक्तगंधाऽनुलिप्तांगं रक्तपुष्पैः सुपुजितम्।।
भक्तानुकंपिनं देवं जगत्कारणमच्युतम्।
आविर्भूतं च सृष्टयादौ प्रकृते पुरुषात्परम्।
एवं ध्यायति यो नित्यं स योगी योगिनां वरः।।९।।

नमो व्रातपतये। नमो गणपतये।
नमः प्रमथपतये।
नमस्तेऽस्तु लंबोदरायैकदंताय।
विघ्ननाशिने शिवसुताय।
श्रीवरदमूर्तये नमो नमः।।१०।।

एतदथर्वशीर्ष योऽधीते।
स ब्रह्मभूयाय कल्पते।
स सर्व विघ्नैर्नबाध्यते।
स सर्वतः सुखमेधते।
स पञ्चमहापापात्प्रमुच्यते।।११।।

सायमधीयानो दिवसकृतं पापं नाशयति।
प्रातरधीयानो रात्रिकृतं पापं नाशयति।
सायंप्रातः प्रयुंजानोऽपापो भवति।
सर्वत्राधीयानोऽपविघ्नो भवति।
धर्मार्थकाममोक्षं च विंदति।।१२।।

इदमथर्वशीर्षमशिष्याय न देयम्।
यो यदि मोहाद्दास्यति स पापीयान् भवति।

सहस्रावर्तनात यं यं काममधीते तं तमनेन साधयेत।१३।।

अनेन गणपतिमभिषिंचति
स वाग्मी भवति
चतुर्थ्यामनश्नन जपति
स विद्यावान भवति।
इत्यथर्वणवाक्यं।
ब्रह्माद्यावरणं विद्यात
न बिभेति कदाचनेति।।१४।।

यो दूर्वांकुरैंर्यजति
स वैश्रवणोपमो भवति।
यो लाजैर्यजति स यशोवान भवति
स मेधावान भवति।
यो मोदकसहस्रेण यजति
स वाञ्छित फलमवाप्नोति।
यः साज्यसमिद्भिर्यजति
स सर्वं लभते स सर्वं लभते।।१५।।

अष्टौ ब्राह्मणान सम्यग्ग्राहयित्वा
सूर्यवर्चस्वी भवति।
सूर्यग्रहे महानद्यां प्रतिमासंनिधौ
वा जप्त्वा सिद्धमंत्रों भवति।
महाविघ्नात्प्रमुच्यते।
महादोषात्प्रमुच्यते।
महापापात प्रमुच्यते।
स सर्वविद्भवति से सर्वविद्भवति।
य एवं वेद इत्युपनिषद्।।१६।।

दुर्वांकुर अर्थात श्री गणपती अथर्वशीर्षह्यावर काही लिहावे असे कधीही मनात नव्हते,तो दिवस मला आजही लक्षात आहे गणेश चतुर्थीचाअचानक पणे मनात विचार आला की श्री गणपतीला आपण रोज दुर्वा वाहणार ते तर करूचपण रोज लेखनसेवा रुजू केली तर कायहरकत आहे? असा विचार मनात आला आणि लगेच लेखनाला प्रारंभ केलादहा दिवसांत २१ दुर्वांकुर वाहण्याचा संकल्प केलाआणि फेसबुक च्या माध्यमातून रोज दोन लेख ही मालिका सुरू झाली,लिहिता लिहिता विचारांना धुमारे फुटत गेले आणि २१ दुर्वांकुरानंतरही ही मालिका श्री गणेशाच्या कृपेने अव्याहत सुरूच राहिली,आणि बघता बघता व`दांताचा सार ह्या अथर्वशीर्ष मधून मला अभ्यासायला मिळाला.


हे दुर्वांकुर लिहीत असताना माझाही अभ्यास छान झाला. ह्यापूर्वी माझे गुरू प.पू.स्वामीपुरुषोत्तमानंद सरस्वती ह्याच्या प्रवचनांचा पगडा मनावर होताचही सर्व कृपा माझ्या सद्गुरूंचीचआहेहा कृपाप्रसाद आता आपणा सर्वांपर्यंत पोहोचविताना मला खूप आनंद होतोयह्यातीलएकही विचार माझा नाही ही सर्व सद्गुरूंचीच कृपा आहे. हे दुर्वांकुर मी सद्गुरू,तसेच श्री गणेशाच्या चरणी अर्पण करते.

हरिओम श्री चिन्मय गणाधिशाय नमः

भाग – १

# श्री गणपती अथर्वशीष

गणपती अथर्वशीर्ष आपण नित्य म्हणता`ह्या दहा दिवसांत आपण ह्या स्तोत्राचा अर्थ पाहणार आहोत. गणपतीही सर्व मान्य देवता आहे, सर्व विघ्नांचे हरण करणारी ,बुद्धी प्रदान करणारी, कार्याला सिद्धीस




नेणारी, सुख देणारी व दु:खाचे हरण करणारी, विद्या प्रदान करणारी, अशी देवता आहे, 'गणांनामपति इति गणपती ' अशी आपण गणपती ह्या शब्दाची उकल केली, तर आपल्या लक्षात येईल की गण म्हणजे व्यष्टीस्तरावर व्यक्ती व समष्टीस्तरावर जे प्रकृतीचे प्रगटन आहे, ते सर्व, ह्या सर्वांचा जो पती आहे, पातीइतिपती, म्हणजेच सर्वांचे रक्षण करणारा जो आहे, शिवाय गण ह्या शब्दात जे दृश्य आहे विकार वान आहे, त्याचाही समावेश होतो, म्हणून जड आहे, अशा सर्व पदार्थ व जीव ह्या सर्वाचा जो ईश आहे तो गणाधिश,

श्री:–शिर्षकाच्या आधी श्री हा शब्द आला आहे, श्री ह्या शब्दाचा अर्थ, लौकिक अर्थाने ह्याचा अर्थ लक्ष्मी पैसा संपत्ती , पण ह्या ठिकाणी परमेश्वराची शड ऐश्वर्य संपन्नता दर्शविली आहे.

अथर्व:– संस्कृत मध्ये कोणत्याही शब्दाच्या मागे 'अ' लावल्यास तो विरोधी अर्थ प्रकट करतो. अथर्व ह्याचा अर्थ जे चंचल आहे परिवर्तनशील आहे, त्रास दायक आहे, भयदायी आहे, रजो गुणयुक्त आहे, अमंगल आहे, अपूर्ण आहे, भेदयुक्त तसेच सीमित आहे, ज्यात

केवळ देहात्मभाव आहे, ज्यामुळे बुद्धी विपरीत होते,ज्यात असंतोष आहे, जेपरम दु:खाचे कारण आहे,असे सर्व गोष्टी थर्व ह्या शब्दात सामावले आहे, आता अथर्व म्हणजेच ह्याच्या विरुद्ध, जे निश्चल आहे, अपरिवर्तनीय आहे, जे परमशांत आहे, जे अभेद आहे,ज्यात अभयता आहे,रजोगुण आणि तमोगुण ज्यात शांत झाला आहे, जे योगयुक्त आहे , मंगल आहे, ज्यात पूर्णत्व अभेदत्व, तृप्तता, संतुष्टी, समत्व, परामसुख प्राप्त करून देणारे म्हणजे अथर्व होय.


शीर्ष:–शिवाय शीर्ष म्हणजे शिरोभागी, गणपती अथर्व शीर्ष हे अथर्व वेदातील ब्राह्मविद्येचे प्रतिपादन करणारे, असल्यामुळे ते सर्व स्रेष्ठ ठरते, ब्राह्मविद्ये पेक्षा आत्म विद्येपेक्षा कोणतीही विद्या स्रेष्ठ नाही, ही शिरो भागी असणारी विद्या आहे, ह्या अनुषंगाने अत्यंत थोडक्यात श्री गणपती अथर्वशीर्ष ह्याचा अर्थ विशद केले आहे.

श्री गणपती अथर्वशीर्ष चीरचनेचा विचार केल्यास ह्याचा प्रारंभशांतीपठापासूनहोतो,दुसरा भाग गणपतीच्याध्यानाचाआहे,तिसरा भाग संरक्षण कवचाचा आहे,चौथा भाग देवतेची स्तुती महती, आणि शेवटच्या भागात फलश्रुती अशी ह्या स्तोत्राची रचना आहे साधकहो चला ह्या दहा दिवसांत गणपतीची साधना करू या ही साधना निर्विघ्नपणे पार पडो हेच गणपतीच्या चरणी प्रार्थना.

# भाग – २

**ॐ भद्रंकर्णेभिशृणुयामदेवा:।भद्रंपश्येमाक्षभिर्यजत्रा:।।**
**स्थिरैरंगैस्तुष्टुवांसहस्तनुभि::।व्यशेमदेवहितंयदायु:।१।**

अथर्वशीर्ष आपल्या अशांत मनाला शांत करते, अस्थिर मनाला सुस्थिर करते, चंचल मनाला निश्चल बनविते, ही एक प्रकारची उपासना म्हणून आपण ह्या स्तोत्रकडे बघावयास हवे. ह्या स्तोत्राचा अभ्यास करण्यासाठी उपनिषदांची प्रणाली वापरली आहे, आणि म्हणूनच शांतीपाठाने ह्याची सुरवात झाली आहे, गुरुशिष्य एकत्र येऊन जेव्हा अध्ययन व अध्यापन कार्य करतात तेव्हा त्याची सुरवात शांतीपठाने करावीही प्रणाली आहे आणि एकत्र येऊन मनाच्या शांतीसाठी आराधना करणे हा त्यामागील उद्देश असतो, कारण मन शांत असल्याशिवाय कोणताही अभ्यास शक्य नाही, आपल्या ग्रंथांनी किती प्रगल्भतेने विचार केला आहे हे आपल्या लक्षात येईल, उपनिषदाची एक पद्धत आहे की ज्या वेदा पैकी ते उपनिषद असेल त्या वेदातील प्रार्थना सुरवातीला केली जाते.




अथर्वशीर्षात आलेला हा शांतीपाठ हा मांडूक्य उपनिषदातही देण्यात आला आहे, ह्याचे महत्वाचे कारण की अथर्वशीर्ष व मांडूक्य उपनिषद दोन्हीही अथर्व वेदाचेच भाग आहेत, शांती पाठाची सुरवात ओंकाराच्या स्मरणाने झाली आहे, ओंकार हे ब्राह्मतत्वाचे शाब्दिक प्रगटीकरण आहे.

ह्या शांतीपाठाच्या कडे आपण लक्ष दिल्यास आपल्या लक्षात येईल की आपल्या पंचज्ञानेंद्रियापैकी फक्त डोळे आणि कान ह्या दोनच

ज्ञानेंद्रियांचा उल्लेख ऋषींनी ह्यात केला. माझ्या डोळ्यांनी मंगल बघू दे आणि माझ्या कानाने मंगल ऐकू दे. ह्याचे महत्वाचे कारण जेव्हा आपण अध्ययन करतो तेव्हा आपले मन अतिशय शांत असायला हवे, पण ह्या मनाला डीवचणारे जर कोण त्या गोष्टी असतील तर ते म्हणजे आपण जे ऐकतो त्याचा आपल्याला खूप त्रास होतो आणि आपण जे पाहतो त्याचा आपल्याला त्रास होतो, आणि ह्या दोन्ही गोष्टींमुळे आपले चित्त विचलित होते, आणि आपले आपल्या साधनेत अभ्यासात लक्ष लागत नाही, कारणही दोन इंद्रियांच्या द्वारा जे विचार आपण ग्रहण करतो, ते आपल्या अंत:करणात अशांती निर्माण करतात, आणि ही अशांती आपल्या जीवनात निर्माण होणे हे जीवनाचे ओंगळवाणे रूप आहे, आणि हे अभद्र आहे, आणि म्हणूनच ह्या दृष्टिकोनातून मी भद्र ऐकावे भद्र पाहावे ही प्रार्थना करण्यात आली आहे, किती मानसशास्त्राचा सखोल अभ्यास ऋषींनी केला हे आपल्या लक्षात येईल.

इथे प्रश्न असा उद्भवतो की कान डोळे सतत उघडे असतात, त्याने काय ऐकावे काय पाहावे हे आपल्या हाती नाही, कधी जे ऐकू नये ते ऐकायला मिळते कधी जे दिसू नाही ते पाहायला मिळते, आणि मग त्याचा आपल्या मनाला खूप त्रास होतो, अशा वेळी काय बरोबर आहे, काय दिसेल काय ऐकायला मिळेल हे आपल्या हाती नाही पण जे दिसते जे ऐकायला मिळते त्याच्याशी तदात्म्यन ठेवणे हे माझे माझ्या हातात नक्की असावे, हीच तर साधना आहे, हे मनाचे प्रशिक्षण आहे, ही प्रशिक्षणाची प्रणाली ऋषींनी ह्या श्लोकात दिली आहे, त्या साठी आपल्या संतांनी आपल्या मनाची जी घडी बसवून दिली तीच घडी मी पण बसवून घ्यावी ती घडी आहे,

डोळे तुम्ही घ्यारे सुख!!! पहा विठोबाचे मुख !!!
तुम्ही ऐकारे कान माझ्या विठोबाचे गुण!!
मना तिथे धाव घेई, राही विठ्ठलाचे पायी!!!

## भाग – ३

ॐभद्रंकर्णेभिशृणुयामदेवा:।भद्रंपश्येमाक्षभिर्यजत्रा:।।
स्थिरैरंगैस्तुष्टुवांसहस्तनुभि::।व्यशेमदेवहितंयदायु:।१।

मित्रानो २१ दुर्वांची ही मालिका बाप्पाच्या चरणी अर्पण करायची आहे म्हणून हा अट्टाहास, अथर्वशीर्षाची सुरवात शांतिपठाने झाली, आणि ह्यात सुरवातीलाच दोन ज्ञानेंद्रियांचा उल्लेख आला, कानाने भद्र ऐकावे व डोळ्यांनी भद्र बघावे, ह्यात तिसरा मुद्दा असा की




आम्हाला जे स्थिर अंग तनु प्राप्त झालीआहे, (म्हणजे चपाच ज्ञानेंद्रिय, पाच कर्मेंद्रिय, पंचप्राण, अंत:करण, (मनबुद्धी चित्त अहंकार) ह्या सर्वांनी मिळून जे मानवाचे अंतरंग व बहिरग बनले आहे ह्या अशयाने तनु ), अंग म्हणजे त्यात अंतर नीहीत असणारी शक्ती, केवळ अवयव असून चालत नाही तर त्यात शक्तीही असावी लागते, म्हणजेच डोळ्यात पाहण्याची, कानात ऐकण्याची, जी शक्ती आहे ती, हे सर्व आपणास प्राप्त झालेले आहे, ही ईश्वर कृपा आहे, ह्या ठिकाणी मी ईश्वर कृपा ह्यासाठी म्हणते की किती तरी व्यक्ती अशा सुदृढते पासून वंचित असतात, असा सुदृढ व स्थिर स्वरूपाचा जो देह आपणास मिळाला आहे तो कशा साठी ? ह्याचा शोध घेणे महत्वाचे आहे, ह्या सुदृढ शरीराचे जे आयुष्य आहे ते मानवाने कसे व्यतीत करावे ह्याचे अतिशय सुंदर मार्गदर्शन आपणास ह्याठिकाणी आढळते, मला मिळालेला देह व माझे आयुष्य हे सत्कारणीच लागावे, ईश्वरीय कारणासाठीच


घालवावे, खरंय, माझ्या जीवनाचे प्रयोजन काय हे ओळखणे महत्वाचे आहेच, माझ्या देहाचा उपयोग सत्कार्यासाठीच व्हावा.

पहा ऋषींनी ईश्वराला काय मागितले? आपल्या संतांनी सुद्धा हेच मागणे मागितले आहे, तुझे कारणी देह माझा पडावा, ही जीवनदृष्टी आहे, आपले कर्म ईश्वरार्पण बुद्धीने करणे आवश्यक आहे, जेवढे आयुष्य आपल्याला मिळाले आहे मग ते कितीही वर्षाचे असू देत तेवढे ही आयुष्य देव कार्यासाठी, म्हणजेच कर्मात ईश्वर पाहून कर्म करण्याची वृत्ती आम्हास प्राप्त होवो ही प्रार्थना ऋषींनी केली, आता ही प्रार्थना देवाला केली म्हणजे कुणाला केली? हा विचार खूपच महत्वाचा ठरतो, ही प्रार्थना पंच महाभूताना केली, ही प्रार्थना सृष्टी देवतेला केली, जे पिंडी ते ब्रह्माडी असे म्हणतात, म्हणून ब्रह्माडी जे आहे तेच पिंडी आहे म्हणजे काय? असे बघा आपली पंचज्ञानेंद्रिये आहेत व त्याची देवता ठरली आहे जसे, कानाची देवता दिग देवता, नेत्राची सूर्य, नाकाची देवता गंधवती पृथ्वी, रसनेचीदेवतापाणीआहे, आणि म्हणूनच बाह्य स्तरावर पंच महाभूते व व्यक्तींमध्ये त्याच्या देवता ह्या दोन्हीही स्तरावर कार्य व्यवस्थित झाले तरच आपण व्यष्टीस्तरावर सुदृढ व समष्टीस्तरावर संतुलित राहू शकू,

मित्रानो ऋषींची ही दृष्टी खूप व्यापक आहे, आणखी एक गोष्ट लक्षात घेण्या सारखी आहे की ऋषींनी स्वत:साठी काहीही मागितले नाही त्यांनी प्रार्थना केली ती वैश्विकतेची, त्यांनी सर्वांचे कल्याण मागितले, अखिल सृष्टीसाठीचे वरदान मागितले.

आमच्यासंतानाहीतेचकेले, 'आताविश्वात्मकेंदेवें' हे पसायदान मागतानाकायदृष्टी असेल ज्ञानदेवांची? हा अभ्यास करतानाही जीवन दृष्टी माझ्या अंगीयावी ही खरी साधना आहे, गणपती अथर्वशीर्ष म्हणताना गणपतीच्या बाह्य रुपा पेक्षा आंतरिक रूप व सौन्दर्याचे


अनुसंधान महत्वाचे ठरते, आणि ते माझे च स्वरूप आहे हा निर्णय महत्वाचा आहे, हे विवेचनाच्या माध्यमातून ही गणपतीची  अंतरंग उपासना कशी करायची हाच विचार प्रकर्षाने पुढे येतो आणि मग त्यातील तंत्रिकता दूर होऊन मग त्याला साधनेचे व आराधनेचे रूप प्राप्त होते,



## भाग – ४

ॐभद्रंकर्णेभिशृणुयामदेवा:।भद्रंपश्येमाक्षभिर्यजत्रा:।।
स्थिरैरंगैस्तुष्टुवांसहस्तनुभि::।व्यशेमदेवहितंयदायु:।१।
ॐस्वस्तिनइन्द्रोवृद्धश्रवा:।स्वस्तिन: पूषाविश्ववेदा:।
स्वस्तिनस्तार्क्ष्र्योअरिष्टनेमि:।।स्वस्तिनोबृहस्पतिर्दधातु।२।
ॐशांति:।शांति:।।शांति:।।।

शांती पठाचा हा भाग म्हणजे साधकाचा मानसिक आधार आहे, कारण ह्या ठिकाणी देवतांचे साहाय्य मिळावे अशी प्रार्थना करण्यात आली आहे, पहिली प्रार्थना केलीती देवांचा राजा इंद्र, जो ज्ञानाने वृद्ध अर्थात श्रेष्ठ आहे, ईदम द्रष्टा इति इंद्र, अर्थात जो सगळ्या विषयांचा द्रष्टया आहे, तो आम्हास अनुकूलता प्रदान करो, कारण आम्ही सर्व विषयासक्त आहोत, ह्या सगळ्या विषया पासून त्या विषयाच्या ज्ञानानेच त्याचे क्षण भंगुरत्व कळेल, अशा ज्ञानाने आमचे रक्षण व्हावे ही येथे प्रार्थना केली आहे.




दुसरी प्रार्थना केली ती विश्ववेद : पुषा' म्हणजेच विश्वाचे पोषण करणारा व जो सर्वज्ञा आहे असा सूर्य, ह्या ठिकाणी सूर्य म्हणजेच ज्ञान प्रकाश व ऊर्जा ह्याचे प्रतीक आहे, शिवाय सूर्याला उदयं किंवा अस्तंना ही, उत्पत्ती स्थिती लय त्याच्यात सामावले आहे, उदय अस्तं ह्या सापेक्ष कल्पना आहेत,

सगळ्या सृष्टीचे भरण पोषण करणारी देवता म्हणजे सूर्य आहे, ज्ञान सक्रियता ऊर्जा ह्याचे प्रतीक असणारा सूर्य आमचे कल्याण करो म्हणजेच आम्हास ज्ञान व ऊर्जा प्रदान करो, तिसरे वंदन स्तारक्ष्य, (starkshya) ही वैदिक काळातील देवतेला केले आहे, अशी देवता आहे की जीवाऱ्या सारखी एकीकडून येऊन दुसरीकडे घेऊन जाते, काही ठिकाणी हिला वायू देवता असे संबोधन केले आहे, ही वायू देवता आहे जी सर्व संकटाचे निवारण करते,


ह्या नंतर प्रार्थना केली ती बृहस्पतीची, अर्थात देवांचे गुरू, ह्याचाच अर्थ गुरुदेवतेची आमच्यावर कृपा असावी, बृहस्पती समष्टी बुद्धीचा प्रकाशक आमच्या ही बुद्धीला प्रकाशित करो, शास्त्राचा गूढार्थ गुरु शिवाय नाही कळत.

ज्ञान प्राप्तीसाठी गुरुकृपा अत्यंत आवश्यक आहे, त्यानेच जीवनप्रेरणा दायी बनते, ह्या नंतर तीन वेळा शांती हा शब्द आला आहे, ही त्रिविधतापाची शांती ह्यासाठी हा शब्द वापरला आहे, आपल्याला जीवन जगत असताना अनेक तापाना सामोरे जावे लागते,काही ताप हे आपल्या कक्षेतील नसतात उदा, भूकंप, वादळ, महापूर, इ, येथे आपल्या कुणाचे काहीच चालत नाहीं ह्याला अधि दैवीक ताप म्हणतात.

प्रथम शांतीचे उच्चारण जे आपण मोठ्याने करतो ते अधि दैवीक शांतीसाठी, काही ताप हे आपल्याच आजू बाजूच्या परिसरातील असतात, ते भौतिक जगातील असतात, त्यांच्या वर आपले काहीही नियंत्रण राहत नाही, उदा, चोऱ्या, मारामारी, इतर तत्सम कारणे, ह्याला आधि भौतिक ताप म्हणतात, ते भौतिक जगतातून आलेले असतात, ह्या तापाच्या शमना साठी आपण दुसऱ्यांदा शांती हा शब्द उच्चारतो, काही ताप हे आपल्या स्वत:शीच निगडित असतो,

निसर्गाचाही त्रास होत नाही आजूबाजूच्या परिसराचाही त्रास होत नाही तर स्वत:चाच त्रास होतो, ह्याला अध्यात्मिक ताप म्हणतात. हे ताप दोन प्रकारचे असतात.

आधी:- हे मनाचे ताप आहे, व्याधी:- हे शरीराचे ताप आहे, मनाला होणारे सुख दु:ख, शरीराचे आजार हे अध्यात्मिक तापात येतात, ह्यासाठी शेवटचे शांती शब्दाचे उच्चारण अत्यंत हळुवार केले जाते, म्हणजेच निसर्गाशी निगडीत, आपल्या आजूबाजूच्या परिसराशी निगडित आणि नंतर स्वत:शी निगडित, आशा सर्व तापांचे शमन झाले की शास्त्राचा गूढार्थ आपल्या लक्षात येऊ शकतो, अध्ययनाचीही पूर्वतयारी आहे असेच म्हणावे लागेल, असे सगळ्या स्तरावर शांत झालेल मनच साधनेच्या प्रांतात भराऱ्या मारू शकते, हा शांती पाठ झाल्यावर आता पुढच्या श्लोकात गणपतीची स्तुती आली आहे, पण त्याकडे केवळ स्तुती म्हणून न पाहता त्याकडे साधनेच्या स्तरावर आपल्याला त्याचा उपयोग करून घेता आला पाहिजे,.




# भाग – ५

# ॐ नमस्तेगणपतये।

गणपती अथर्वशीर्षाची रचना उपनिषद प्रणालीनुसार आहे, सुरवात शांतीपाठा पासून झाली आता दुसरा भाग हा गणेशाचा नाममंत्र आहे.

ओम नमस्तेगणपतये :– ह्या ठिकाणी ओम ह्या शब्दा पासून सुरवात झाली आहे, ओंकार हा सगळ्या मंत्राचा बीजमंत्र आहे, पुराणात, शास्त्रातही पद्धत आहे की कोणत्या ही स्तवनाचा प्रारंभ हा ओंकारा पासून होतो, ओंकार व अथ हे दोन उगम दर्शक शब्द मंगलतेचे प्रतीक आहेत, पुराणात अथ हा शब्द प्रारंभी वापरला जातो, आणि वेद वाङ्मयात ओंकाराचे रुपास प्राधान्य आहे, ओंकार रुपी ईश्वर हा




वेदांच्या निर्मिती पूर्वी सुद्धा अस्तित्वात होता, आणि वेद जेव्हा शब्द राशीत आले तेव्हा प्रथम ओंकार प्रगटला, ओंकार रुपी भगवान जो आहे तोच गण नायक आहे, साधनेच्या दृष्टिकोनातून हा विचार खूप महत्त्वाचा ठरतो, गणाधिश, म्हणजे गणाचा ईश, ईश म्हणजे ज्यात शड ऐश्वर्य संपन्नता आहे, यशश्री, औदार्य ज्ञान वैराग्य, आणि ऐश्वर्य, ह्या सहागुणांना भग असे म्हणतात आणि ह्या सहा गुणांनी जोयुक्त तो भगवान, ओंकार हे शब्द ब्रह्माचे असे रूप की जो शब्द रशीत येण्यापूर्वीच प्रगटला, तोच ओंकार स्वरूप होय. मित्रानो मांडुक्य उपनिषद ह्यात संपूर्ण ओंकाराचेच वर्णन आले आहे,

संतांनी सुद्धा ह्याला ओंकार प्रधान रूप गणेशाचे असे म्हटले आहे, ओंकाराला एका क्षर ब्रह्म ही मानण्यात आले आहे, ओंकारात तीन शब्द एक वटले आहेत, अकार, उकार, आणि मकार, हे तीन ही एक वटले तेथ`शब्द ब्रह्म कळवळले असे ज्ञान देवानेही म्हटले आहे, समर्थांनी, गणाधिश जो ईश सर्वागुणांचा मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा !! असे म्हटले आहे, असे हे एका क्षर ब्रह्म हे वारंवार मायेने प्रगट होते व त्या पासून नाम रूपात्मक जगाचा प्रसार होतो, ओंकार हे एका क्षर नाद ब्रह्म स्वतः अनद स्वरूप आहे, ह्या ओंकाराचे अनुसंधान ह्यासाठी करायचे ह्या विकार वान जगात आपल्याला स्थिर तत्वांचे आकलन व्हावयास हवे, जसे पाणी लाट रुपाने बुडबुड्याच्या रूपाने दिसेल पण पण पाण्यात विकार उत्पन्न होत नाही, सोने अलंकाराच्या रुपात भिन्न दिसेल पण सोन्यात विकार उत्पन्न होत नाही, तसेच आपली निर्विकारता कायम ठेवणारा असा ओंकार नादब्रह्म आहे, ओंकारा बाबतचे अधिक विवेचन पुढच्या भागात


ओम चिन्मय गणाधिशाय नमः



## भाग – ६

# ॐ नमस्ते गणपतये।

हरिओम, बरेचदा ओंकाराचा आपण तांत्रिक दृष्ट्या सुद्धा उच्चार करतो आणि आपल्या मनाला शांत वाटले असे म्हणतो, कारण ईश्वराचा वाचिक शब्द ओंकार आहे, अशा ओंकाराचा जेव्हा आपण जप करतो तेव्हा तो जर अर्थ सकट केला, त्याबाबतची भावना ठेऊन केला तर आपले साधन योग्य होते, ओंकार हेईश्वराचे प्रगटन आहे म्हणजे काय? बघा ईश्वराची व्याख्या करताना त्या परमत्म्या पासून मायेने जगाचे जे प्रगटन होते ते तीन प्रकाराने होत असते, उत्पत्तीस्थिती




आणि लय, हे प्रगट होत असतानाच स्थूल सूक्ष्म आणि कारण अशा तीन प्रकारचा प्रपंच आपणास आढळतो, आणि हे व्यष्टी व समष्टीस्तरावर असते, मग आता प्रश्न असा उद्भवतो की ह्या अर्थाचे निर्देशन करणारा मंत्र कोणता? ओंकार हा शब्द पाहिल्यास ह्यात तीन ध्वनी अंतर्भूत आहेत, अउम, अकारहे स्थूल प्रपंचाचे प्रतीक आहे, उत्पत्ती दर्शक आहे, उकार हे त्यापेक्षा सूक्ष्म असून ते स्थिती दर्शविते ,तो संगोपन करणारा ध्वनी आहे, तर मकार लय दर्शक आहे, सगळ्या शब्दाचा लय मकारात होतो, अशा उत्पत्ती स्थिती वलय ह्या अवस्था दर्शविणारा एकमेव शब्द म्हणजे ओंकार आहे.

अ हा opening sound आहे, कोणत्याही शब्दा मध्ये तो आहेच,

येथून आपला सर्व प्रपंच सुरू होतो, हे स्थूल प्रपंचाची प्रतीक आहे, उ हा rolling sound आहे, हा संरक्षणात्मक ध्वनी आहे, म हा closing sound आहे, शिवाय तीन अवस्थांचा दृष्टिकोनातून विचार केल्यास जागृती स्वप्न सुषुप्ती अशा तीन अवस्था आहेत, स्थूल शरीराशी एकरूप होऊन आपण जागृती अवस्था अनुभवतो, सूक्ष्म शरीरात मनबुद्धी आहेत त्याच्याशी एक रूप होऊन आपण स्वप्न अवस्था अनुभवतो, कारण देहाशी एकरूप होऊन आपण सुषुप्ती अवस्था अनुभवतो.

समष्टी स्तरावर विचार केल्यास अव्यक्त चैतन्य जेव्हा समष्टी शरीराशी एकरूप होते त्याला विराट अवस्था म्हणतात, समष्टी मनाशी बुध्दीशी एकरूप होणार`ज`चैतन्य आह`त्याला हिरण्य गर्भ अवस्था म्हणतात आणि हेच अव्यक्त चैतन्य जेव्हा समष्टीकारण देहातून प्रगट होते त्याला ईश्वर अवस्था म्हणतात, आणि हे सर्व त्याच्या पासून उत्पन्न झाले तो हा गजानन म्हणजेच ब्रह्म, म्हणजेच अयं आत्मा ब्रह्म, ही तुरयावस्था होय, आणि ह्या अवस्थेत मग तीनही ध्वनी संपून जातात, मकाराचा सुद्धा लय होतो, तीन ध्वनी, तीन अवस्था, तीन शरीर, ह्या सर्वांचे व्यष्टी व समष्टीस्तरावर प्रतिनिधित्व करणारा असा जो आहे तो ओंकार, इंग्रजीत जर आपण god म्हणत असू तर g म्हणजे म्हणजे generator o म्हणजे, organizer आणि d म्हणजे, destroyer अशा तीन अवस्थांचा तीन शरीराचा तीन ध्वनीचा साक्षी जो आहे तोच ब्रह्म आहे आणि तो मी आहे, ही साधना ओंकार साधना आहे, आता ओंकार हे ब्रह्म आहे, गणेश हे ब्राह्मचेच रूप आहे आणि ते मी आहे, ,ह्याच`विवेचन पुढील भागात पाहू या, ,ओम चिन्मय

गणाधिशाय नमः

# भाग–७

# ॐ नमस्ते गणपतये।




ओम गणेशो वेदौ ब्रह्म,गणेश हे ब्राह्मचेच रूप आहे नवे ब्रह्म आहे, ह्याचे महत्वाचे कारण उपनिषदात ब्रह्माचे रूप वर्णन करताना असे नमूद करण्यात आले आहे की त्याच्यापासून निर्मिती होते,त्याच्यातच संगोपन होते व ज्यात लय होतो,असे ब्रह्म, ही संकल्पना गणेशाच्या बाबतीत लागू होते, ओम ब्रह्म ,गणेश, एकच,ह्या ब्राह्मस्वरूपचा साक्षात्कार हे जीवनाचे खरे ध्येय आहे.

ओम हे एकक्षर ब्रह्म आहे,ते स्वत: आनंदमय आहे,सत चित आनंद स्वरूप आहे, शब्द प्रगट होण्यापूर्वी ते प्रगटले आहे,हे ब्रह्म मायेमुळे विकारवान झाल्यासारखे वाटते,पण त्यात विकार उत्पन्न होत नाही, ते सर्वाचा साक्षी आहे, त्याचे वर्णन वाणीने होऊ शकत नाही, असे ओम अर्थात गणेश हे ब्रम्ह आहे.

हया मंत्रात गणपतीला नमस्कार केला आहे, सर्व जड व पंचमहाभूताह्याचा पती म्हणजेच रक्षण करणारा गणपती जो निर्गुण निराकार आहे पण आपल्या उपासनेसाठी तो प्रगट झाला आहे, त्याला नमस्कार करणे म्हणजेच त्याला संपूर्ण समर्पित होणे, माझे काहीही नाही जे आहे सर्व गणेशाचेच आहे, हा भाव मनात निर्माण होणे गरजेचे आहे, आपला अहंकार गणपतीच्या चरणी अर्पण करता आला

पाहिजे,हे तत्व समजून घेण्यासाठी हा समर्पण भाव महत्वाचा आहे, आपले कोणतेही कार्य करण्यापूर्वी आपण परमेश्वराला हात जोडतो, कोणत्याही कार्याच्या आरंभी गणेशाला नमन करण्याच्या मागे हाच भाव आहे.


आपण व्यवहारात हात जोडून नमस्कार करतो, ह्यामगची भूमिका ही असते की जे ब्रम्ह माझ्यात आहे तेच तुझ्यात आहे त्याला मी नमस्कार करतो, किती छान विचार आहे हा, भेद भेद मिटवणारा, नम्रतेचा भाव म्हणजे नमस्कार आहे, आपण जेव्हढे वाकतो तेवढी आपली सावली लहान होते, समोरचा मोठा होतो,आणि आपण त्याला सहमती देतअसतो, किती छान आहे हे सर्व,हे गणेशा तुला वंदन,तुझ्या चरणी साष्टांग दंडवत,माझ्यातहीच भावना निर्माण होऊ दे की.माझ्या जीवनात जे काही होते आहे ती तुझीच कृपा आहेमाझ्या आयुष्यात येणारी सुखख हा तुझा प्रसाद आहे,आणि त्याचे आनंदाने ग्रहण करण्याची मला बुद्धी दे,विश्वाचे कल्याण कर.

ज्ञानाच्या नावाने चालणारा बाजार थांबव,तत्त्वज्ञानाच्या नावाने खऱ्या तत्वाला फाटा पडतोय आणि तत्वज्ञानाला आपल्या पद्धतीने होणारे अर्थनिर्वाचंन थांबव,खूप अहंकार वाढतोय जगात,अहंकारी लोकांचा अहंकार झडू दे,त्यांच्या मनात सत्संगतीची आवड निर्माण कर. सर्वांमध्ये प्रेमभावना सहस्तित्वाची भावना निर्माण कर, अज्ञानाचा अंधकार दूर कर, धर्मसंकल्पनेचा आदर सर्वांच्या मनात निर्माण कर! जगात ईश्वर प्रेम मानव प्रेम निर्माण कर,सर्वांना पूर्णत्वाची अनुभूती दे,ह्या विश्वात शांतता निर्माण कर बाप्पा,माझा नमस्कार स्वीकार कर.

**ओम चिन्मय गणाधिशाय नमः**

भाग-८

# त्वमेव प्रत्यक्षं तत्वमसि।।





हरिओम मित्रानो, अथर्वशीर्षाच्या सुरवातीला शांतीपाठ म्हणून आणि गणपतीला नमस्कार करून आता गणेशाची स्तुती ह्या ठिकाणी केली आहेत्वमेवप्रत्यक्षम तत्वमसि :-ह्यात आलेले शब्द म्हणजे त्वमेव, प्रत्यक्षम,तत,त्वम,आसि असे आहेत, त्वमेवम्हणजे तूच इतर कुणीही नाही, आणि तूच म्हणजे जे केवळ चैतन्य युक्त आहे,जे सर्वांतसामावले आहे,जे सर्व चराचरात अभिव्यक्त झाले आहे,ते केवळ एकच एकमेव अद्वितीय असेतत्व आहे, आणि उपनिषदांनी सांगितले आहे की हेच स्वरूप आपले आहे, मीच चैतन्य स्वरूपआहे, अहं ब्राह्मस्मि, असे म्हणत असताना ही दृष्टी मला विकसित करावी लागेल की तत्वाच्यास्तरावर गणेशाच्या आणि माझ्या स्वरूपात भिन्नता नाही, असे जर असेल तर जे जे स्वरूप मीगणेशाचे वर्णन कारेन ते ते रूप माझेच आहे नव्हे मीच आहे ही एकदा आपल्या मनाची घडीबसवून घेतली की मग अभ्यासाला साधनेला बळकटी येते,प्रत्यक्षम:-अक्ष म्हणजे डोळा, अक्ष म्हणजे इंद्रिय, जे इंद्रिय गोचर आहे, म्हणजेच जे प्रत्यक्ष आपण पाहू शकतो, ह्या ठिकाणी गणेशाच्या सगुण स्वरूपाचा

उल्लेख आहे, कारण साधनेची वाटचाल ही सगुणकडून निर्गुणकडे असते आणि शेवटी सगुणनिर्गुण एकू गोविंदू रे ही साधनेतील अनुभूती,तत्वामसि:-जो ओंकार स्वरुप गणपति आहे तोच तत्वामसी ह्या महावाक्याने निर्देशित केलेले ब्रह्म आहे, आणि इंद्रिय गोचर अशा सगुण रुपात तू माझ्यासमोर आहेस, तू ब्रह्म आहेस, ह्यात तत हा शब्द ब्राह्मवाचक, परमात्मा ह्याचे निर्देशन करतो,जे सर्व व्यापक आहे,जे सूक्ष्म आहे, जे सर्वात विद्यमान आहे,जे नित्य आहे अनंत आहे,जे आनंद स्वरूप आहे असे जेत्वम:-त्वम ह्या शब्दाचा अर्थ तू म्हणजेच जीव,जोअल्पज्ञा आहे ,संकुचित आहे,अनित्य आहे,अंतवान आहे,आता ह्याठिकाणी प्रश्न उद्धवतो की तत आणि त्वम चे ऐक्य कसे शक्य आहे?कारण विरुद्ध र्माच्या कोणत्याही गोष्टी एकरूप होऊ शकत नाही, ह्यासाठी तिसरे पद वापरले आहेआसि:-आसि ह्या शब्दातून दोन पदातील एकरूपता सांगितली आहे,जिवाच्या सर्व उपाधी बाजूला ठेवल्या तर जीव व शिवतील ऐक्य होईल,वीज आणि बल्ब वेगवेगळे आहेत पण वीज एकाच आहे फक्त उपाधीच्या माध्यमातून ती प्रगट होते, कधी पंख्यातून कधी विविध उपकरणातून, तसेच चैतन्य हे एकच आहे पण ते विविध जीवांच्या माध्यमातून प्रगट होते, मग चैतन्याच्या स्तरावर जर विचार केला तर विविधता आलीच कुठे, इथे एकरूपता आली,  गणपतीच्या समोर उभे राहून हाच भाव निर्माण व्हायला हवा न,आपल्या ऋषींनी स्तोत्राची रचना जरी साधने च्या दृष्टिकोनातून केली असे आपल्याला वाटत असले तरी ह्यात किती मोठा सामाजिक आशय आहे तो नक्कीच आपण शोधायला हवा, आणि नेमके इथे आपण कमी पडतो, आपण तत्वज्ञानाला गौण लेखतो आणि कर्मकांडाला प्राधान्य देतो, कर्मकांडावर आक्षेप नाही पण त्यालाच धर्म मानणे चुकीचे आहे, आणि ह्यानेच धर्मसंकल्पनांची हानी होते,

भाग – ९

# त्वमेव केवलं कर्त्ता।सि।




हरिओम, त्वमेवकेवलम कर्तासी:–गणपती अथर्वशीर्ष ही गणपतीची उपासना आहेच पण त्याचसोबत ती स्वत: चे स्वरूप समजून घेण्याची पण उपासना आहे, ह्याठिकाणीकेवलह्याचाअर्थशुद्ध,अहंकार विरहित,हे भगवंताचे रूप आहे, आपण छोटी एखादी गोष्ट करीत असू आणि त्याबाबत आपण किती अहंकार ठेवतो, पण ह्या विश्वाचा पसारा ज्याने निर्माण केला तो किती अहंकार विरहित आहे.

ह्या संपूर्ण जगताच्या निर्मिती मागे जे तत्व आहे तेपरमात्मतत्व आहे, माया एकटी ह्याविश्वाचा पसारा उभा करू शकत नाही, मायाम्हणजेच प्रकृती,ती मायिक आहे, ईश्वराची परिभाषा करतानाब्रह्म+माया =ईश्वर अशी करण्यात येते, आणिब्रह्म+अविद्या माया=जीवअसे जरी असले तरी ह्याच्या सर्वांच्या अधिष्ठानाला ब्रह्म आहे, ह्या सर्वांचे गणित मांडले तरब्रह्मचशिल्लक राहते आणि तर केवल म्हणजेच एकमेव आहे आणि तेच गणेश आहे, ह्यात बदल होत नाही, हे स्थिर तत्व आहे, ते अनंत अविनाशी आहे, पण ते मर्यादित झालेले भासते,मित्रानोतूचसर्व कर्ता आहे असे आपण सहज म्हणतो पण तसे व्यवहारात दृष्टी ठेवतो का?जीवनातील प्रत्येक घटनेचा करता आपण कुणाला तरी ठरवितोच, कधी कधी सर्व करतेपण आपण स्वत: कडे घेतो, मी होतो


म्हणून सर्व चांगले घडले, मी होतो म्हणून,हा शब्द आपण वारंवार उच्चारतो आणि आपला अहंकार वाढवितो, लक्षात ठेवा मित्रानो आपल्या जीवनाचा  तयार असते, नियती नावाचा सिव्हिल इंजिनियर त्याच   च्या आधारे आपल्या जीवनाची इमारत तयार करीत असतो,घडवणारे हात वेगळेच असतात आम्ही मात्र मी केले ह्या अहंकारात असतो, हा अहंकार गणेशाच्या चरणी अर्पण करायला हवा, जे घडतंय ती माझी नियती होतीच त्याच नुसार मी वर्तन करीत गेलो, पण ह्याचा अर्थ आपण दैव वादी बनावे असेही नाहीकर्मसिद्धांतावर आपली श्रद्धा असायला हवी, म्हणून हे गणेशा माझ्या जीवनाचा शिल्पकार जरी मी असलो तरी हे शिल्प तू ठरविले आहेस, हे शिल्प घडविण्याची शक्तीही तूच प्रदान करणारा आहे.

**ओम चिन्मय गणाधिशाय नमः**



## भाग – १०

# त्वमेव केवलं धर्तासि।
# त्वमेव केवलं हर्ता।सि।





हरिओम, सर्व कर्ता श्री गणेश, त्वमेव प्रत्यक्षम धर्तसि: हे गणेश सर्वांचे भरण पोषण करणारा तूच आहेस, अर्थात सर्वांना धारण करणारे तत्व तूच आहेस, ह्याचा तात्विक अर्थ लक्षात घेतल्यास एक उदा. आपल्याला देता येईल, जसे समुद्रात लाटा निर्माण होतात बुडबुडेही निर्माण होतात, पण ह्या सगळ्यांचे संगोपन सागर करतो, समुद्रात लाटांचा निर्माता समुद्र, त्यांच्या संगोपां कर्ता समुद्र ,आणि त्याला टासरते शेवटी समुद्रातच विलीन होतात, उत्पत्ती स्थिती आणि लय तिन्ही अवस्था ह्याठिकाणी आहे पण त्याचा प्रभाव सागरावर होत नाही, अगदी तसेच ब्रह्म रूप असणारा गणेश हा सर्वनिर्मितीचे करण आहे.

ह्या ठिकाणी त्वमए व असे ही शब्द आलेले आहे, एव हा शब्द वापरण्याचे काय कारण असेल, बघा आपले आपल्या जीवनातील संबंध हे सगळे तात्पुरते असतात, आत्म नस्तुकामाय सर्व मप्रियमभवति, असे असतात, पण ईश्वराशी गुरुशी असणारा आपला

संबंध हात कला दूतर नाहीच पण कायमस्वरूपी टिकणारा आहे, म्हणून फक्त तूच हा शब्द ह्याठिकाणी वापरला आहे, ह्या विश्वाला निर्माण करणारा त्याला धारण करणारा असा जो आहे तो गणेशातूच आहे, आता साधनेच्या दृष्टीने जर ह्याचा उपयोग करून घ्यायचा असेल तर जेव्हा माझ्या प्रपंचाचा कर्ता धरता मी आहे असे जेव्हा मी म्हणतो तेव्हा मायेच्या दृष्टीने मी करता धरता आहे हे वाटणे स्वाभाविक आहे पण माझ्या स्वरूपाच्या ठिकाणी मी कशाचाच कर्ता देखील नाही आणि धरता देखील नाही, अशी साधना ह्यासाठी करायची की मी जर गणेशाचा भक्त असे म्हणत असेल तर मी त्याच्या पासून विभक्त नाही, आणि विभक्त नसेल तर त्याच्यात आणि माझ्यात काहीही फरक नाही, आणि स्वरूपाच्या ठिकाणी आम्ही एकाच आहोत, किती छान अनुभूती आहे ही, प्रत्यक्ष गणेशाशी तादात्म्य, त्वमेव केवलम हर्तासी: सगळ्या दु:खाचे निवारण करणारा गणेश आहे, मित्रानो आपल्याला जीवनात किती तरी दु:खे येतात, व आपण त्याने खचून जातो, दु:ख येणे हे अटळ आहे, पण हीदु:खाची संवेदना मला का होते, ह्याचे महत्वाचे कारण माझे अज्ञान आहे, माझ्या स्वरूपाच्या अज्ञानामुळे माझी देह बुद्धी इतकी प्रबळ झाली असते की त्यामुळे संयोग वियोगाचे सुख दु:ख मी करतो, पण आता ह्या दुखाचे चकारणमी नाहीसे केले तर? म्हणजे काय? म्हणजे असे की अज्ञानाचा नाहीसे करण्याचा मी प्रयत्न केला आणि ज्ञान मार्गाला मी जवळ केले तर जीवनात दु:ख येईल पण त्याकडे पाहण्याची माझी दृष्टी बदलल्यामुळे ते माझ्यासाठी दु:खच राहणार नाही, आत्म तत्वपासून ढळणे हे सर्वात मोठे दु:ख आहे आणि ह्या दु:खाचे हरण करणारा म्हणजेच ज्ञानप्राप्ती करून देणारा श्री गणेश आहे, असे सर्वांचे दु:खाच्या कारणांची निवृत्ती होवो ही गणेश चरणी प्रार्थना. ओम चिन्मय गणाधिशाय नमः

# भाग – ११

# त्वमेव सर्वं खल्विदं ब्रह्मासित्व साक्षादात्मा । सिनित्यम।।१।।





हरिओम, श्री गणेश कर्ता धरता हर्ता म्हणजेच उत्पत्ती स्थिती व लयाचे कारण आहे,त्वमेवसर्वम खलु ईदम ब्रह्मासी: ह्याठिकाणी ईदम ह्याचा अर्थ संपूर्ण नामरूपात्मक जे ह्या विश्वात प्रगटन आहे ते तूच आहे, असे ऋषींना नमूद करावयाचे आहे ब्रह्म आहेस, महावाक्यांचा विचार केल्यास तत त्वम असि, प्रज्ञानम ब्रह्म,अयम आत्मा ब्रह्म,अहं ब्रह्मस्मि, ह्या चारही महा वाक्यात ब्रह्माचे निर्देशन केले आहे,प्रत्येक ठिकाणी ब्रह्म हा शब्द सर्वसामान्य पणे आला आहे, सगळ्यांना व्यापून उरणारे आकाश,आकाशाचे कारण माया किंवा प्रकृती आणि मायेचे करण ओंकार स्वरूप ब्रह्म, असे असल्यामुळे ते सर्व व्यापक ब्रह्म आहे,ते सर्वात व्यापून आहे, अशी एकही जागा नाही की ज्याठिकाणी ते नाही, आता ह्याच ब्राह्मला ऋषींनी आपल्या हृदयापर्यंत आणले, की जे ब्रह्म सर्व व्यापक आहे तेच माझ्यात आत्मतत्वाच्या रूपाने विद्यमान आहे आणि म्हणून त्वमसाक्षात आत्मसि नित्यम असे म्हटले आहे, म्हणजेच तू साक्षात माझा आत्मच आहे.आत्मा, ब्रह्म हा डोळ्यांनी पाहायचा विषय नाही,तो सीमित

नाही, आपण व्यवहारात  खूप सीमित बनवून टाकतो, ते तत्व आहे, तो पाच ज्ञानेंद्रियचा विषय नाही, तो इंद्रिय गोचर नाही,परोक्ष ही नाही,पण तो साक्षात आहे आणि माझ्यातच आहे, समष्टी स्तरावर ब्रह्म विचार व्यष्टी स्तरावर आत्मविचार,नित्यमहा शब्द ह्याठिकानी वापरला आहे,  नित्यम म्हणजेच नित्य, आणि नित्य म्हणजेच जो कालही होता आजही आहे आणि उद्याही राहणार आहे,  जो काळाने परिछिन्न नाही, जो अखंड नित्य आत्मा आहे ते माझेच स्वरूप आहे, ब्रह्मस्वरूप असणारा तू आणिआत्मस्वरूपअसणारा मी ह्या दोघांमध्ये काहीही फरक नाही , दोघांमधील हेअद्वैतआहे, ह्या ठिकाणीजीवब्रह्म ऐक्य ऋषींनी निर्देशित केले आहे, त्रानो गणेशाची उपासना करताना हा अद्वैत भाव मनात निर्माण होणे अतिशय आवश्यक आहे, आपण व्यवहारात कायम द्वैत बघतो आणि हा द्वैत भाव दुःखाला कारणीभूत ठरतो, तुझे माझे करण्यात आयुष्य निघून जाते , पण दुःखाची मालिका भेदाभेद संपत नाही, नामरूपात्मक जग हे दिसायला जरी परस्पराहून भिन्न असले तरी तत्वाच्या स्तरावर विचार केल्यास सर्वात आत्मतत्त्व सृष्टीत ब्रह्म तत्व एकच आहे, जे माझ्यात आहे तेच सर्वदूर अभिव्यक्त झाले आहे, नव्हे मीच सर्वदूर अभिव्यक्त झालो आहे, मग भेद कुणात करू?जे जे माझ्यासमोर येईल ते ते माझेच रूप असेल, कधी मनुष्य बनून कधी प्राणी बनून कधी वनस्पती बनून, कारण ह्या चराचरात मीच व्यापून उरलो आहे, किती आनंददायी अनुभूती आहे ही, कारण ह्या अनुभूतीनंतर भेदाभेदच मिटला द्वंद्वव मिटले, आणि ‘उजेडी राहिले उजेड होऊन‘ हीच अनुभूती,किती छान, म्हणूनच अथर्वशीर्ष चा अभ्यास महत्वाचा ठरतो, ह्या मंत्रपर्यंतचे मंत्र गणक ऋषींचे होते, ह्या नंतरचे मंत्र अथर्व ऋषींचे आहेत, अथर्वशीर्षाचे मंत्र द्रष्टे दोन ऋषी आहेत.

## भाग – १२

# ऋतंवच्मि। सत्यंवच्मि।।२।।




हरिओम, अथर्वशीर्षाची सुरवात शांतीपठाने झाली, आणि अथर्व ऋषी आणि गणक ऋषी ह्यांना दोघांनाही झाले लागणे शाचा साक्षात्कार सारखाच आहे, तत्वम सी ह्या महावाक्याचा मागोवा आता ह्या स्तोत्रात आपल्याला बघावयास मिळतो, ह्या दुसऱ्या श्लोकात आता ऋषींनी प्रतिज्ञा केली आहे, ऋतम वचमी :: सत्यम वचमी: ही प्रतिज्ञा करण्याचे महत्वाचे कारण म्हणज`जे काही शब्द आता प्रगट होतील ते सत्यच असतील, त्यात मनात एक आणि शब्दात दुसरेच असे होणार नाही, किती छान, ऋतस्य यथाप्रेत' हे ऋग्वेदाचे सूत्र आहे ह्याचाच अर्थ प्राकृतिक नियमानुसार जगा, पण ऋत ह्या शब्दाचा एवढंच अर्थनाही तर ऋत म्हणजे जे सहज आहे स्वाभाविक आहे, जे आरोपीत झालेले नाही, ज्याच्या आधारे ही सृष्टी व्यवहार अतिशय लयबद्ध सुरू आहे, बघा सूर्य उगवतो मावळतो, वारे वाहतात, बीजारोपण केले तेच झाड उगवते, त्याला कालांतराने फळे येतातच, ऋतूंचे आगमन त्याच्या वेळा ठरलेल्या आहेत , फुलांचे फुलणे ठरले आहे, जीवांचा जन्म मृत्यू ठरला आहे , आणि त्यामुळेच

ह्या सृष्टीचा समतोल साधला जातो आहे ही जी अंतर्गत लयबद्धता आहे त्याला ऋत हा शब्द वापरला जातो, हे आंतरिक सुनियोजन आहे, ह्यात एक सुसंबद्ध संगीत आहे ,ही एक व्यवस्था आहे आणि ही व्यवस्था अनादी काळापासून आहे, असे कधीच घडले नाही की पावसाळा संपल्यावर एखादे वर्ष सृष्टी कर्त्याने आपला विचार बदलविला आणि उन्हाळा सुरू केला, अगदी प्रायोगिक स्तरावर, नाही असे नाहीच घडले कधी, बरोबरन, ही अखिल जीवनाची जी लयबद्ध सुसंगती आहे तिला ऋत म्हणतात, असे ऋत ह्यालाच आधुनिक विज्ञान म्हणते, हा संतुलनाचा नियम आहे आणि हे अखिल विश्वाचा आंतरिक अस्तित्वाची खुण आहे, आणि हेच सत्य आहे.

आता असच ऋत आम्ही बोलू असा निर्धार जेव्हा साधक करतो तेव्हा ही जी लयबद्धता आहे तिचा अनुपालन आम्ही करू, ही खूप मोठी जबाबदारी साधकांनी तर घ्यावीच पण अखिल विश्वातील हे संतुलन त्यामागील तत्व ह्याचे अनुसंधान आयुष्यभर सांभाळून माझेही जीवन लयबद्ध व सुस्वर कसे होईल ह्याबाबत जीवनभर प्रयत्न करणे ही साधना आहे,


सत्यम वचमि, मी जे बोलेल ते सत्यच बोलेन, ही प्रतिज्ञा जेव्हा साधक करतो तेव्हा सत्य म्हणजे काय? हे लक्षात घ्यावे लागेल, सत्य म्हणजे जे कालही होते, जे आजही आहे, आणि जे उद्याही राहणार आहे, त्यात तिळ मात्र ही बदल होणार नाही, जे अपरिवर्तनीय आहे, ज्याचा कशामुळे ही बाध होणार नाही, ज्याच्यात सापेक्षता नाही, जे निरपेक्ष आहे, मग असे तत्व कोणते? कारण जीवनात आपण बऱ्याच नव्हे सर्वच परिवर्तनशील गोष्टींना सामोरे जातो आणि मग ह्या जगात काही अपरिवर्तनीय आहे ह्यावर आमचा विश्वासच राहत नाही, पण एक नियम आहे की एखादे निश्चल तत्व असल्याशिवाय चंचल तत्व

राहत नाही,  ज्या अर्थी मला चंचल तत्व कळते आहे त्या अर्थी ह्या मागे जे निश्चल तत्व आहे ते ही मला समजू शकते पण ते शोधण्याची तयारी माझी नाही, फार थोडे भाग्यवान ज्यांना हा शोध घ्यावासा वाटतो, मित्रानो जगात सगळे बाह्य शोध लागतात, त्याची गृहीतके असतात, पण जे सत्य आहे त्याला कोणतेही गृहीतक नाही, ते कधीच बदलत नाही, सूर्यहा पश्चिमेला उगवला असे घडले नाही, एखादया महिन्यात चंद्राला आपण महिनाभर पूर्णच राहावे असे वाटले नाही, गुलाबाचे असा विचार नाही केला की मी मोगऱ्याची फुले देतो,  अग्नीने कितीही विचार केला तरी तो शीतल कधीच होणार नाही, हे सर्व ऋत ह्या संकल्पनेतही येतात म्हणूनच जे ऋत आहे तेच सत्य आहे, आणि पुढील स्तोत्रात ह्याची अनुभूती आपणास येईल, असे ऋत आणि सत्यवदाण्याचे वचन प्रतिज्ञा ऋषींनी केली, किती छान, आता गणपतीची कृपा आपल्यावर नक्कीच होणार पणही कृपा आपल्या पासून हिरावून घेऊनही म्हणून संरक्षण कवच घ्यावेच लागेल, पुढील भागात



# भाग-१३

## अवत्वमां।अववक्तारं। अवश्रोतारं। अवदातारं।




हरिओम,,, श्री. गणपती अथर्वशीर्ष हे केवळ स्तोत्र म्हणून नबघता ते साधनेच्या स्तरावर त्याचे आकलन करून घेणे महत्वाचे आहे,,प्रारंभी शांतीपाठ,,करण सर्व स्तरावर शांती असल्याशिवाय आपण कोणतेही अध्ययन करू शकत नाही,,त्यानंतर प्रतिज्ञा आणि अभिवचन,,ह्या दोन श्लोकानंतर आता ज्या आराध्याची उपासना करावयाची आहे त्याचे संरक्षण कवच आपल्याला मिळावे ,,,हे संरक्षण कवच साधना योग्य मार्गाने होण्याकरिता आवश्यक आहे,,,

अव त्वम माम:-ह्याचा शब्दश: अर्थ आहे अव म्हणजे रक्षण,,त्वम म्हणजे तू,आणि माम म्हणजे माझे,,अर्थात हे गणेश तू माझे रक्षण कर''

आता प्रश्न पडतो की रक्षण कुणापासून करायचे?का करायचे?माझे रक्षण करायला मला गणेशाची गरज का पडते??खूप प्रश्न पडतात मनाला,,,पण त्याचे उत्तरही आपले गुरू देतात आपल्याला,,बघा आपण व्यक्ती एकाच असतो पण आपल्या भूमिका

नात्या परत्वे बदलत जातात,,नातं बदलले भूमिका बदलली,,शिवाय प्रत्येक भूमिकेचे आपली स्वतंत्र कर्तव्य जबाबदाऱ्या आहेत ह्या आपल्याला पुरुषार्थाने पार पाडता याव्यात,,शिवाय आता आपण रक्षण कर म्हणजेच मला सद्बुद्धी दे असेही म्हणू शकतो,,आता सद्बुद्धी शरीराच्या स्तरावर माझे आरोग्य व्यवस्थित असणे आवश्यक आहे,,त्यासाठी जे करता येईल ते मी केले पाहिजे आणि मी करतोही पण ह्या देहाचा सदुपयोगच व्हावा ही झाली सद्बुद्धी,,,मित्रानो शरीराला व्याधी होणे अपरिहार्य आहे शरीराचा अंत निश्चित आहे पण ह्याच देही ह्याची डोळा ही जीवनदृष्टी,तुझे करणी देह माझा पडावा हा निश्चय होईल त्यादिवशी गणपतीने आपल्या देहाचे रक्षण केले असे निश्चित समजावे

मनाच्या स्तरावर मनातील विकारांचे शमन होणे ही गणेशाची कृपा,,''दर्शन मात्र मनकामना पूर्ती''अशी आरती म्हणत असताना माझ्या जीवनातील कामानाना पूर्णविराम लागणे हे वैचारिक मानसिक स्तरावरील रक्षण होय

बुद्धीच्या स्तरावर आत्मतत्वाचा निश्चय होणे,,देहबुद्धी क्षीण होणे व हळूहळू नाहीशी होणे,,देहबुद्धी आत्मबुद्धीत परिवर्तित होणे,ही बुद्धीच्या स्तरावरील रक्षण आहे,,

माझ्या चित्ताच्या स्तरावर विचार केल्यास चित्तात श्री गणेशाचेच अनुसंधान असणे तत्वाचे अनुसंधान असणे आवश्यक आहे,,तुझे रूप चित्ती राहो,,ही संतांनी बसवून दिलेली घडी आहे,,आणि ही आपल्या साठी आहे,,ती आपण बसवून घेतली पाहिजे,आपल्या चित्तातील मालिनता हळू हळू आपणास दूर करून त्या चित्ताच्या कप्प्यात आपल्याला ओंकाराच्या रूपाची अनुसंधान करावे लागेल ही चित्ताच्या स्तरावरील रक्षण आहे,,,

हे सर्व झाल्यावर आता माझा अहंकार गणपतीच्या चरणाशी वाहून देणे ,दैनंदिन जीवनात प्रसाद बुद्धी ठेवणे महत्वाचे,,,,गणेशासाठी मोदक केले होते पण त्याच्या चरणी वाहिल्यावर आता तो प्रसाद झाला,,,किती छान,,माझा प्रपंच त्याच्या चरणी अर्पण करता येईल???मग असे घडले तर माझ्या जीवनात कोणताही प्रसंग येवो तो मोदकाचा प्रसाद च असेल,,,,

हे गणेशा ही किती सुंदर साधना आहे,,,आणि ह्या साधनेचे मार्गदर्शन करणारे ऋषी किती महान आहेत,,आणि हे ज्ञान देऊन ज्यांनी आपले जीवन आनंदी बनविले ते सद्गुरू किती स्रेष्ठ आहेत,,,,अव त्वम माम......

**ओम चिन्मय गणाधिशाय नम:**



# भाग – १४




श्री गणपती अथर्वशीर्ष ही ओंकार साधना असून तत्वमसी ह्या वाक्याचा मागोवा ह्यात घेण्यात आला आहे,,तिसरा श्लोक हा संरक्षण कवचाचा आहे,,जेव्हा आपण साधक अवस्थेत असतो तेव्हा आपल्याला अनेक बाह्य गोष्टीपासून स्वत: ला सांभाळून ठेवावे लागते,,अशावेळी ईश्वराची कृपादृष्टी अत्यंत आवश्यक आहे त्यासाठी ही प्रार्थना आहे,,माझे तू सर्व स्तरावर रक्षण कर अशी प्रार्थना ह्याठिकाणी करण्यात आली आहे,,ह्याठिकाणी एक बाब लक्षात ठेवायची आहे की परमार्थाचे साधन वृत्ती आहे,,देह उपकरण आहे,,

अव वक्तारम:हे गणेशा वक्त्याचे रक्षण कर??म्हणजे काय??ही प्रार्थना ऋषींनी का केली??मित्रानो आपल्या अभ्यासाला एक शाप असा आहे की आपण थोड्या अभ्यासाने खूप विद्वान झालो की काय असे वाटायला लागते,,शिवाय त्याचे विविध प्रकाराने अर्थनिर्वाचन करण्याचा मोह मला आवरत नाही,,शिवाय वक्त्याचे बाबतीत त्याला अहंकार निर्माण होण्याची भीती जास्त असते,,नवीन काळाचा विचार केल्यास माझ्या वक्तव्याचा बरेचदा उद्देश हा प्रसिद्धी मिळविण्याचाही असू शकतो,,वक्त्याला फार सावध असावे लागते,,

वक्तृत्वाची कृती पहिली तर अभ्यासाला शब्दाची जोड स्वत:चे विचार,आजवरचा अभ्यास ,त्याचे निष्कर्ष,त्याची युगानुकूलता,त्या

विषयाची वैश्विकता,शिवाय श्रोत्यांची मानसिकता,वक्तृत्वाची उपकौशल्ये,,वक्त्याचे मन, त्याची एकाग्रता,आशा कितीतरी गोष्टी त्यात अंतर्भूत असतात,,आणि ह्या सर्वात महत्वाचा घटक असतो तो म्हणजे वक्त्याचे उद्देश,,,असे अनेक घटक आपणास सांगता येईल,,

आता ह्या वक्त्याचे रक्षण कर म्हणजेच बोलत असताना त्याला सद्बुद्धी दे!!म्हणजेच वक्ता जे बोलेल ते फक्त कल्याणाचेच असावे,,सर्वांच्या कल्याणाचेच असावे,,स्वतः च्या व इतरांच्या जीवनाची उन्नती करणारे असावे,,ह्याशिवायचे भाष्य त्याने करू नये,,आणि सर्वात महत्वाचे त्याचे पालन त्याने स्वतः करावे,,,वक्तृत्वात वक्ता ज्या गोष्टी बोलतो त्याचे पालन करण्याची जबाबदारी त्या वक्त्यावर आहे,,मला इतरांपेक्षा जास्त येते आहे ह्याचा अहंकार त्याला व्हायला नको,,हे गृहीतच आहे की जेव्हा आपण एखाद्या विषयावर अधिकार वाणीने बोलतो तेव्हा आपल्याला इतरांपेक्षा त्या विषयाच्या संदर्भात जास्तच माहीत असते,,पण त्यात माझे कर्तृत्व नाही,,ही परमेश्वरी कृपा व योजना आहे,,त्याचा अहंकार मला होता कामा नये,,,

ह्या सर्वांपासून वक्त्याचे रक्षण करण्याची प्रार्थना ऋषींनी केली आहे,,ही बाब सर्व वक्त्यांनी लक्षात घेणे खूप गरजेचे आहे,,शिवाय दैनंदिन व्यवहारात आपण अनेकदा किती वायफळ गप्पामध्ये आपल्या आयुष्याचा वेळ जातो,,पण मी जे बोलेन ते माझ्या कल्याणाचेच असेन इतरांच्या कल्याणाचे असेल ही धारणा पक्की हवी,,,माझा आत्मविचार दृढ व्हावा,, करण जो मी विचार करतो तेच मी बोलत असतो,,म्हणून वक्ता म्हणून माझ्या विचारांची दिशा पण योग्य असावी,,,

ऋषींनी किती सखोल विचार ह्याठिकाणी मांडला आहे हे खरंच काही बाबतीत आपल्यालाही पटायला लागत,,,

# भाग–१५

# अवश्रोतारं।




श्री गणपती अथर्वशीर्ष हे केवळ स्तोत्र नसून ती साधना पद्धती आहे,,तत्वमसी ह्या महावाक्याचा मागोवा आहे,,ही ऋषीची अनुभूती आहे,,,गणेशाचे संरक्षण कवच वर्णन करणारा हा तिसरा श्लोक,,

अव श्रोतारम:–हे गणेशा श्रोत्यांचे रक्षण कर,,,आता अशी प्रार्थना ऋषींना का करावीशी वाटली,??हे पाहण्यापूर्वी श्रोता कुणाला म्हणावे हे पाहणे महत्वाचे ठरते,,प्रत्येक ऐकणारा श्रोता असेलच असे नाही,,,दोन शब्द ह्याठिकाणी आलेत,,ऐकणारा आणि श्रोता,,ऐकणारा जो आहे त्याने केवळ ऐकले पण त्याचे आचरण केले नाही त्याचे अर्थनिर्वाचन करायला तो असमर्थ ठरला,,पण श्रोत्यांच्या बाबतीत मात्र असे घडले की जे त्याने ऐकले त्याचे अर्थनिर्वाचन तर केलेच पण त्याचसोबत त्याचे पालनही केले,,,

फरक आपल्या लक्षात आलाच असेल की ऐकणार्याच्या ऐकणे ह्या प्रक्रियेत केवळ ऐकणे हीच क्रिया आहे पण श्रोत्यांच्या ऐकणे ह्या प्रक्रियेत कान म्हणजेच ज्ञानेंद्रिय सहभागी तर आहेतच पण त्याचसोबत

मन ही सहभागी आहे,, म्हणून श्रोता बनणे आवश्यक आहे,,मग आता श्रोत्यांचे रक्षण कर असे म्हणताना मी काय ऐकावे हे खूप महत्वाचे आहे,,जे ऐकू नये ते मी ऐकूच नये पण मी अशाच गोष्टी ऐकाव्या ज्या माझ्या जीवनाची उन्नती करणाऱ्या असतील,,

कोणते शब्द कोणते आवाज ऐकावे हे माझ्या हाती नाही ,,,कारण अनेक ध्वनी आपल्या आसपास असतात आणि इच्छा असो की नसो ती आपल्याला ऐकविच लागतात,,पण त्यापैकी कशाचे श्रवण मी करावे हे किती महत्वाचे आहे,,,माझ्या मनाला वेदना देणारे ,त्रास देणारे शब्द मी निश्चित पणे श्रावण करू नये,,ह्याउलट माझ्या मनाची शांतता प्रसन्नता अखंड कशी राहील ह्यासाठी प्रयत्नशील मी असायला हवे,,

जसे काय बोलावे हे महत्वाचे तसेच काय ऐकावे हेही माहत्वाचेच,, बरे मी फक्त चांगलेच ऐकतो ह्याचा अहंकारही नको,,तो ही वाईटच,,आणि म्हणून माझ्या जीवनाचे कल्याण व्हायचे असेल तर मी सद्विचारांचे श्रवण केले पाहिजे,,,श्रवण ही सुद्धा साधना आहे,,आणि म्हणून स्वामी चिन्मयनानंद ह्यांनी भगवद गीतेच्या संदर्भात श्रवणसाधना सुरू केल्यात,,,***तत कथानम,, तत चिंतानम,, तत श्रावणीयम*** असे जे म्हटले आहे ते योग्यच आहे,,ह्या संदर्भात आपल्या संतांनी एक विचारांची घडी बसवून दिली आहे ती अशी


‘‘‘तुम्ही ऐका रे कान माझ्या विठोबाचे गुण‘‘‘,,,

ही घडी एकदा बसवून घेतली की जीवन सुसह्य होते,,अन्यथा कानावर मनावर खूप अन्याय होतो,,,हे गणेशा तू श्रोता म्हणून माझे रक्षण कर,,

हरिओम चिन्मय गणाधिशाय नमः

## भाग–१६

# अवदातारं। अवधातारं।




श्री गणपती अथर्वशीर्षतील संरक्षण कवच हे साधकाचे रक्षण बाह्य गोष्टीपासून, आंतरिक गोष्टीपासून संरक्षण करते,,जो वक्ता आहे तोच श्रोताही आहे,साधक एकाच पण त्याच्या भूमिका वेगवेगळ्या असतात,,त्या प्रत्येक भूमिकेत आपले रक्षण व्हावे,,मी एकाच आहे फक्त ह्या मी ची अभिव्यक्ती भिन्न आहे,,आणि हा मी खूपच संकुचित असतो,ह्या संकुचित ते पासून आपले रक्षण व्हावे व आपण व्यापक व्हावे ही प्रार्थना ह्या ठिकाणी आहे,,रक्षण व्हावे म्हणजेच सद्बुद्धी प्राप्त व्हावी,,ही त्यामागे धारणा आहे,,

अव दातारम:–

हे गणेशा दान देणाऱ्याचे रक्षण कर,,,आपण दान देतो ,काही कळत काही नकळत,,पैशाचे दान विद्येचे दान,देहदान,श्रमदान,विचारांचे दान,प्रेमाचे दान,कितीतरी दानाचे प्रकार आहे ,,हे सर्व करीत असताना असे म्हटले जाते की दान हे गुप्त असावे,,दान हे कल्याणार्थ देण्यात यावे,,पण आज दानाचा आशयच बदलला आहे,,दान देणारा सर्वात गरीब आहे कारण दान देणारा मला

काहीतरी मिळावे ह्या उद्देशाने दान देतो आहे,,दानात व्यक्तिगत स्वार्थ येता कामा नये,,,पण त्यातही दोष असा निर्माण होतो की व्यक्तिगत स्वार्थ तर येतोच पण अहंकारही वाढतो,,,अहंकार हा जीवाचा फार मोठा शत्रू आहे,,अहंकारातून राग द्वेषादी दोष निर्माण होतात आणि साधनेची वाट लागते,,,ह्या पासून आपले रक्षण व्हावे,,

अव धातारम :-

हे गणेशा धात्याचे रक्षण कर!!!जो धारण करणारा आहे त्याचे रक्षण कर, परोपकारार्थ ईदम शरीरं!!!उरलो उपकारापुरता!!ही पुन्हा आपल्या शस्त्रांनी संतांनी बसवून दिलेली घडी आहे,माझा स्थूल देह ,सूक्ष्म देह हा चांगल्याच कामासाठी उपयोगी यावा,,माझ्या ह्या देहाचे पालनपोषण करणारा त्याचे रक्षण कर,,आता धारण करणारा ही संकल्पना किती व्यापक आहे,,सर्व चराचर सृष्टी ह्यात अंतर्भूत आहे,,निसर्ग अखिल सृष्टीला धारण करतो पण किती परोपकारी असतो,,आता ह्या निसर्गाकडे ईश्वराने suply केला नाही तर???कसे होईल ???ह्या पृथ्वीनेच आपला निवास नाकारला तर कसे होईल???धारण करणाऱ्याचे रक्षण कर ही किती व्यापक संकल्पना आहे हे आपल्या लक्षात येईल

आता जो दाता आहे तोच धाताही आहे,,आणि तोच मी आहे,,आणि मी हे तत्व कळले तर लक्षात येईन की माझ्यातील आत्मतत्त्व व परमात्व तत्व एकच आहे ,,,त्यात भेद नाही,,कारण ह्या स्तोत्रात मागोवा घेतला आहे **तत्त्वम आसि** ते तू आहेस तू ब्रह्म आहेस,,,ह्या तत्वाचा,,,,आता लक्षात घ्यायचे की गणपती अथर्वशीर्ष कुणासाठी??? गणपतीसाठी की माझ्यासाठी?????

भाग – १७

# अवदातारं। अवधातारं।




अथर्वशीर्षाच्या ह्या संरक्षण कवचाच्या विचार केल्यास एक गोष्ट लक्षात येईल की ऋषींनी व्यक्तिगत स्वतः साठी काहीही मागितले नाही,,जे मागणे मागितले किंवा जे संरक्षण प्राप्त केले ते वैश्विक आहे,,आणि हेच त्यांचे मोठेपण आहे,,,

अवानूचानमव शिष्यम :--

अव म्हणजे रक्षण कर,,अनुचान म्हणजे सतत गोळा करणे,,,हे कुणासाठी वापरले आहे,,गोळा करून आणणारे,,म्हणजे कोण??ह्याठिकानी गुरूंचे निर्देशन केले आहे,,मित्रानो गुरू ज्ञान देतात हे ज्ञान कण वेचून आणतात ते आपल्यासाठी,,,काय सांगू संतांचे उपकार!!मज निरंतर जगविती!!संत गुरू आपल्याला नित्य जागृत करतात आणि आपल्याला जीवनात सतत आनंदाचा मार्ग सांगतात ह्यासाठी आयुष्यभर ते आपली काया झिजवतात,,आपले जीवन आनंदी व्हावे हीच त्यांची तळमळ असते अशा सर्व गुरूंचे रक्षण कर अशी प्रार्थना ह्याठिकाणी केली आहे,,गुरूंचे वर्णन संत ज्ञानेश्वर व रामदास स्वामी ह्यांनी पण केले आहे,,,सर्वात महत्वाचे गुरू हे श्रोत्रीय व ब्रह्मनिष्ठ असतात हे ह्याठिकाणी समजणे अत्यंत गरजेचे आहे,,,

अव शिष्यम:-


जसे गुरूंचे रक्षण कर ही प्रार्थना केली तशीच शिष्याचे पण रक्षण कर अशी ह्या ठिकाणी प्रार्थना केली आहे,,जो शिस्त पाळतो तो

शिष्य असतो,,समर्थांनी सुद्धा शिष्याचे वर्णन उत्तम केले आहे,,आपण एकदा ज्या गुरूंचे शिष्यत्व पत्करले आहे त्यांनी सांगितलेल्या मार्गावर मला जायलाच हवे,,सत शिष्याचे ते लक्षण आहे ,,शिवाय जो छात्र आहे तो पात्रही असावा लागतो,,शिष्याची पात्रता असते विवेक वैराग्य शट संपत्ती,मुमुक्षुत्वं,,,ही शिष्याची पात्रता वर्णन केली आहे,,,अशा वाटेवर चालताना खूप अडचणी येतील,मार्ग सोडून द्यावासा वाटेल पण ही सगळी आपल्या निष्ठेची परीक्षा असेल,,आशा वेळी आपण आपला मार्ग गुरूंची साथ सोडून चालणार नाही,,वास्तविक पाहता जो श्रोता आहे तोच वक्ता आहे,,जो गुरू आहे त्याच्यात आणि शिष्यात तत्वाच्या स्तरावर काहीही भेद नाही,,ही अद्वैत भाव मनात निर्माण व्हायला हवा,,,आणि म्हणूनच, हे गणेशा तू शिष्याचेही रक्षण कर,,,किती छान प्रार्थना आहे ही??



## भाग-१८

# अवपश्चातात। अवपुरस्तात।




हा श्लोक म्हणजे श्री गणेशरक्षा असेही आपण म्हणू शकतो,,पण हे कवच घेण्यापूर्वी गणेशासमोर प्रतिज्ञा केली हे विसरून चालणार नाही,,ही प्रतिज्ञा सत्य वक्तव्याची आहे,,आणि कवच मंत्रामध्ये आपण बघतो आहोत की एकाच मी चे प्रगटन आहे,,मी तोच आहे पण कधी श्रोता कधी वक्ता,कधी गुरू कधी शिष्य,,कधी धाता कधी दाता,,, पण तत्वाच्या रूपाने माझ्यात काहीही बदल होत नाहीत,,दोन महावाक्याचे निर्देशन ह्या ठिकाणी आपणास आढळते ते म्हणजे तत त्वम आसि आणि अयं आत्मा ब्रह्म,,,,

अव पश्चात्तात:-

आता ह्या ठिकाणी दिशांचे निर्देशन आहे,,दिशा ही संकल्पना सापेक्ष आहे तरी त्या दिशेने स्वतंत्र महत्व आहे,,चारही दिशांपैकी सर्वप्रथम माझे पश्चिम दिशेनी रक्षण कर,,पश्चिम दिशा हे क्षात्र तेजाचे प्रतीक आहे,,म्हणजेच सक्रीयतेचे प्रतीक आहे,,आपल्याला कोणतेही काम करायचे असेल तर सक्रियता असली पाहिजे,,निष्क्रीयतेने जीवन जगणे हा पुरुषार्थ नाही,,जीवनात ही सक्रियता तेज राहावे ह्यासाठी ही प्रार्थना आहे,,,,,,

पश्चात म्हणजे मागे:माझे पाठीमागून रक्षण कर असे ऋषींना का

म्हणावेसे वाटले??विचार करा ,साधनेच्या दृष्टिकोनातून मनाची शांतता अतिशय महत्त्वाची आहे,,आणि मनाला सर्वात विचलित करणारा जर कोणता घटक असेल तर तो आहे माझ्या जीवनात घडलेल्या घटना,,भूतकाळात माझ्या जीवनात ज्या चांगल्या वाईट घटना घडल्या त्या का घडल्या??असे व्हायला नको होते??मी असा का वागलो??काय चुकले माझे??किती प्रश्न असतात??आणि हे प्रश्न खूप त्रास देतात आणि महत्वाचे म्हणजे ह्याचे उत्तर आपल्याजवळ नसते,,,पण एक लक्षात ठेवा ,त्या घटना घडून गेल्यात,,त्या घटनेचा आपणास पाश्चात्तापही झाला,,आता आयुष्यात पुन्हा असे होणार नाही हा निर्धारही झाला,घटनेतून खूप काही शिकलो,,हे जे सर्व घडले हे माझे प्राक्तन होते,,ते मी टाळू शकलो नाही,,घटना घडून गेली,,आता त्यापासून धडा घेणे महत्त्वाचे,,,**अकस्मात होणार होऊनि जाते***त्यावर जास्त विचार करून मनाला क्षीण करून आपल्या साधनेची शक्ती वाया घालवण्यात अर्थ नाही,,घडून गेले,,ते माझ्या हाती असते तर मी घडूच दिले नसते,,बरोबर न,,


आता मानसिक शक्ती वाया घालवण्यात अर्थ नाही,,साधना सुरू ठेवलीच पाहिजे,,,,

अव पुरस्तात :-

माझे पूर्व दिशेने रक्षण कर,,पूर्व दिशा हे ब्राह्म तेजाचे प्रतीक आहे,,आपण जे कार्य करू ते सर्वसमावेशक दृष्टीने करायला हवे,,बुध्दीयुक्त अंतकरणाने केले पाहिजे,,जीवनातील निर्णय बुध्दीयुक्त अंतकरणाने घ्यायला हवे,,भावनेतून घेतलेले निर्णय हे निर्णय नसतातच कारण ते भावनेचे कार्यच नाही,,त्यात संकल्प विकल्प च राहतील,,


माझे पुढून रक्षण कर असाही ह्याचा अर्थ आहे,,बघा माझे भविष्यात काय होईल ह्याबाबत आपल्या मनात उत्सुकता काळजी

असते,,पुष्कळदा अनेक गोष्टी आपण टाळू इच्छितो त्याच आपल्यासमोर येतात,,भविष्यबाबतची चिंता हा साधनेतील व्यत्यय आहेच,,चिंता वाटणे स्वाभाविक आहेही,, पण विचार करा जे घडायचे आहे तेच घडेल,,तुमच्या माझ्या हातात जर घटना घडू देणे असेल तर मी वाईट घटना घडूच कशाला देईल,,जे घडायचे ते आणि जसे घडायचे तसेच घडणार आहे,,,आपली काळजी करून घटना टाळता येणार नाही,,,हो पण आज आपण वर्तमानात जीवन चांगले जगू शकतो कर्म चांगली करू शकतो आणि भविष्याचे भांडवल छान गोळा करू शकतो,,,मग तेच करूया न,,



# भाग–१९

# अवोत्तरात्तात। अवदक्षिणात्तात।




श्री गणेशाचे संरक्षण कवच हे साधकाकरिता खूप महत्वाचे आहे,,माझ्या जीवनात प्रत्येक क्षणाला संभाळकर्ता तूच आहेस ही भावना निर्माण होणे आवश्यक आहे ,आपल्या मनात अनेक विक्षेप येतात ह्या विक्षेपांपासून आपले संरक्षण होणे अत्यंत गरजेचे आहे,,ह्या अर्थाने गणपती हा संकटांचे निवारण करणारा आहे,,स्वतःच्या स्वरूपाचा विसर हेच खरे संकट आहे ह्यापेक्षा जगात मोठे संकट असूच शकत नाही,,पण आम्ही मात्र संकटांचा अर्थ प्रापंचिक दृष्टिकोनातून घेतो,,कर्ज झाले,तब्येत बिघडली,संबंध बिघडले इ,ही खरेतर संकटे नाहीतच हे तर भोग आहेत,,,असो ह्या संरक्षण कवचात आता दिशांचे निर्देशन केलेले आहे,,,

अवोत्तरात्तात:–हे गणेश माझे उत्तर दिशेने रक्षण कर,,,अस बघा उत्तर दिशा ही कुबेराची दिशा मानली जाते,,धनाची दिशा मानली जाते,,ह्या ठिकाणी असे ध्वनित होते की धनापासून माझे रक्षण कर,,म्हणजे काय??बघा आज धानाच्या मागे लागता लागता माणूस किती कुठे निघून गेला,,, धनामुळे अहंकार वाढतो,,इतरांना कमी

लेखण्याची वृत्ती निर्माण होते,,धनाची लालसा माणसाचे काय काय वाईट करू शकते हे कुणालाही नव्याने सांगण्याची गरज नाही,,,माणसातील माणुसकी हिरावून घेण्यात जर कुणाचा महत्वाचा वाटा असेल तर तो धन लालसेचा,,, आणि ही जीवनाची अधोगती आहे,,म्हणूनच माझे तू ह्या पासून रक्षण कर,,माझ्याजवळ कितीही धन आले तरी त्याचा अहंकार मला होऊ देऊ नकोस,,,त्याचा सदुपयोग करण्याची सद्बुद्धी तर देच पण ही सद्बुद्धी माझ्याकडे आहे ह्याचाही अहंकार मला होऊ देऊ नकोस,,,,,,


शिवाय माझ्या शरीराची रचना पाहिल्यास वरच्या भागाला माझे डोके आहे,ह्या अनुषंगाने माझ्यास डोक्याचे रक्षण कर मला सद्बुद्धी दे,,,,,,,

अव दक्षिणात्तात:-

हे गणेश माझे दक्षिणेकडून रक्षण कर!!दक्षिण दिशा ही मृत्यूची दिशा आहे,,मग ह्या ठिकाणी मृत्यूपासून माझे रक्षण कर असा अर्थ आहे का??आणि खरच कुणाचे मृत्यू पासून रक्षण झाले आहे का??मग ऋषींनी असे का म्हटले??बघा ह्या जगात प्रत्येक गोष्ट मर्त्य आहे पण मी मृत्यूला किती घाबरतो??सर्वात मोठे भय माझ्या जीवनात कोणते असेल तर ते मृत्यूचे आहे,,पण अगदी मृत्यूची देवताही आपली मृत्यूची वेळ कमी जास्त नाही करू शकत,,,ह्या जगातील प्रत्येक वस्तू मर्त्य आहे,,जे जे उपजे ते ते नाशे!!असे माऊली पण म्हणतात,,अशा सर्व मर्त्य गोष्टींच्या संदर्भात आपली कित्ती आसक्ती असते,,ह्या सगळ्यांपासून माझे रक्षण कर,,ही बुद्धी दे की ह्या परिवर्तनीय जगात जे अपरिवर्तनीय तत्व आहे त्याचे अनुसंधान करण्याची सद्बुद्धी मला दे!!! किती छान!!

## भाग – २०

**अवत्वमां। अववक्तारं। अवश्रोतारं। अवदातारं।
अवधातारं । अवानूचानमवशिष्यं। अवपश्चातात। अवपुरस्तात।
अवोत्तरात्तात। अवदक्षिणात्तात। अवचोर्ध्वात्तात। अवाधरात्तात ।
सर्वतोमांपाहि – पाहिसमंतात ।।३।।**




चारही दिशांनी माझे रक्षण कर ही प्रार्थना झाली,,आता उधवार्तात:–म्हणजेच ऊर्ध्व म्हणजेच वरच्या दिशेने माझे रक्षण कर,,आता वरच्या दिशेने रक्षण कर म्हणजे काय??ऊर्ध्व दिशा हे प्रगतीचे लक्षण आहे,,व्यक्तीची जेव्हा प्रगती होते किंवा जेव्हा तो प्रगती पथावर असतो तेव्हा त्याला स्वत: ला सांभाळण्याची खूप गरज असते हे सांभाळणे म्हणजेच हया काळात व्यक्ती स्वत: ला खूप श्रेष्ठ समजायला लागते आणि मग आपल्याला सहाययभूत ठरणारे सर्वांना तो तुच्छ लेखण्याचा धोका नाकारता येत नाही,,,आशा वेळी तू मला अहंकार होऊ देऊ नकोस,,,

दुसरा अर्थ असाही सांगता येईल की आपण नेहमी म्हणतो की वरची दिशा ही पितरांची दिशा आहे,,आपण आपल्या जवळच्या व्यक्तीचा मृत्यू नाही पचवू शकत,,त्याच्या जाण्याचा आपल्याला प्रचंड त्रास होतो,,आणि हे दु:ख आपल्याला आयुष्यभर त्रास देते,,हे गणेशा

माझे ह्या सर्वांपासून रक्षण कर,,,,,,

अवधरात्तात,,,,

खालच्या दिशेने माझे रक्षण कर,,,मित्रानो अत्युष्यात असे अनेकदा घडते की सतत चढाव उतारांना आपल्याला सामोरे जावे लागते,,,जीवनातील चढाव आपण चढतो खूप वेळ लागतो पण गडगडायला वेळ लागत नाही,,,आणि जेव्हा असे उतरणीला लागतो तेव्हा स्वत: ला खूप जपावे लागते,,,जसे व्यवसायात येणार तोटा,,नातेवाईकांकडून होणारी फसवणूक,,असे अनेक अडचणी येतात ज्यावेळी आपल्या सहनशीलतेचा कस लागतो,,,बरोबर आहे न,,,आशा वेळी आपल्या मनाची बुद्धीची स्थिरता राखण्याची प्रार्थना ह्या ठिकाणी केली आहे,,,,

सर्वतोमाम पाही पाही समंतात:-

ह्या सर्व स्तरावर रक्षण कर असे गणेशाला सांगून झाले आता काही अजून रक्षणाच्या जागा शिल्लक असतील तर त्या सर्वांपासून माझे रक्षण कर,,,

मित्रानो मंगलमूर्ती आपले रक्षण करतो म्हणजेच तो आपणास सद्बुद्धी देतो,,,आपल्या जीवनातील संकटाचे निवारण करता म्हणजेच त्या संकटकडे पाहण्याची आपली दृष्टी बद्दलवितो,,संकटे येणार त्यातून सुटका गणपती करतो म्हणजे तो त्यातून सुटण्याचा मार्ग आपणास देतो,,,करण येणारी संकटे हे आपले प्राक्तन आहे पण त्या संकटांला सामोरे जाऊन त्यावर मात करणे हा पुरुषार्थ,,,

## भाग – २१

**अवत्वमां।अववक्तारं। अवश्रोतारं।अवदातारं।**

**अवधातारं। अवानूचानमवशिष्यं। अवपश्चातात। अवपुरस्तात।**

**अवोत्तरात्तात। अवदक्षिणात्तात। अवचोर्ध्वात्तात।।**

**अवाधरात्तात। सर्वतोमांपाहि–पाहिसमंतात।।३।।**




हरिओम,,आजचा अथर्वशीर्ष चे २१ वे दुर्वांकुर,,आज बाप्पाला निरोप देण्याचा त्यासोबत जी साधना स्वीकारली तिचे सातात्याबाबत बाप्पाला अभिवाचन देण्याचा दिवस,,,आज २१ लेख दुर्वांकुर श्री गणेशाच्या चरणी अर्पण करूयात!!!आणि ह्या साधनेत सातत्य राहील हीच प्रार्थना त्याच्या चरणी करूया!!!अर्थात अथर्वशीर्षाचे संपूर्ण विवेचन लेखदूर्वांकुर गणेशाच्या चरणी अर्पण करण्याची कामना करूया!!!,,,,,,,,

मित्रानो श्री गणपतीच्या नामपासून आपण सुरवात करून आज आपण संरक्षण कवाचपर्यंत येऊन पोहोचलो,,नाम आणि नामी ह्यांच्यात ऐक्य असतं,,, आणि हे ऐक्य समजण्यासाठी आपल्याला निश्चित पणे त्याच्याशी एकरूपता ठेवावी लागते,,त्याच्याशी स्वत: ला connect करावे लागते,,समजा माझ्याकडे विजेची खूप उपकरणे आहेत , ही तयार आहे,पण त्यात विद्युत प्रवाहच नाही,,,,,,,आता


विद्युत प्रवाह आहे मीटर घेऊन तयार आहे उपकरणेही आहेत पण स्विच नाहीत,,आता स्विच पण आहे विद्युत प्रवाह पण आहे पण उपकरणेच नाही,,,ह्या तिन्ही परिस्थितीत विजेचा साक्षात्कार कसा व्हावा,,,अगदी असेच आहे,,आपण परमेश्वराला कनेक्ट व्हायला हवे,,आणि ह्यासाठी ईश्वराने जी उपकरणे आपल्याला दिली त्याची निगा त्याचा योग्य उपयोग,आणि त्यासाठीची साधन ह्या सर्वांची गरज आहे,,

देह इंद्रिय मन प्राण!!ह्याचे करी जो रक्षण!!
त्या गणपतीचे चरण !!वंदू आम्ही!!

ह्या ठिकाणी सुद्धा देह इंद्रिय मन प्राण ह्याचा रक्षण कर्ता असे संबोधन आले आहे,,एक लक्षात घेण्यासारखी बाब ही आहे की आपले रक्षण जेव्हा परमेश्वर करतो न तेव्हा त्याचा अर्थच असा आहे की ह्या जगातील सर्व अनात्म गोष्टीचे तो आपल्याला आकलन करून देतो आणि आत्मवस्तू आपल्या हाती ठेवतो,,,आपल्या स्वतः चे आकलन आपण फक्त नारदेहाताच करू शकतो,,आणि म्हणून संतांनी सुद्धा ह्या नारदेहाला घबाड म्हटले आहे,,,ह्याचा उपयोग ह्याच जन्मात करून घेऊन आपण ह्याच जन्मात आपल्या सर्व कामनांमधून सुटका करून घेऊ शकतो आणि ह्यासाठी श्री गणेश उपासना अथर्वशीर्ष खूप उपयोगी आहे,,

ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे ह्यात ज्या दोन महावाक्यांचा उल्लेख आला आहे ती म्हणजे तत त्वम असि आणि अयम आत्मा ब्रह्म,,,,जे जे गणपतीचे रूप आता ह्या नंतर वर्णन केले जाईल ते ते केवळ गणपतीचे रूप नसून ते माझेच रूप आहे,,माझे सत्य स्वरूप आहे,,आणि म्हणून अथर्वशीर्ष ची आवर्तने करायची म्हणजे केवळ यांत्रिक पणे गणपतीला त्याचे रूप सांगत बसायचे नाही कारण ते

आपल्याला माहीत आहे ते त्याला माहित नाही का???पण ह्या अवर्तनातून स्वत:ला स्वत: च्या स्वरूपाची ओळख करून द्यायची,,,लक्षात घ्या अथर्वशीर्षाचे आवर्तन आपल्या साधनेच्या सतात्यासाठी आहे,,आपल्याला खूपदा सांगून सुद्धा पटत नाही की त्वमेव केवलम कर्तासी,,,धारतासी,,,ज्ञानमायो विज्ञानमायोसी,,,,इ,,हे आपल्या मनावर बिंबवायचे आहे,,,गडबड कुठे होते की आम्ही खरे विचार तत्व सोडून देतो आणि कर्मकांड मोठे करतो आणि आम्हीच मग नंतर हे कर्मकांड यांत्रिकतेने करायला लागतो,,,त्यात विचारांची भर न टाकता पुन्हा कर्मकांडाचीच भर टाकतो मग असे झाल्यावर कर्मकांड किती जास्त आहे ह्याचा गाजावाजा करतो,,,पण त्यामुळे तत्वज्ञानाचा आशय मागे पडतो,,,लक्षात घ्या इतिहास साक्षी आहे की तत्वज्ञानाचा आशय मागे पडला व कर्मकांड तत्वज्ञानापेक्षा मोठे केले तर धर्मात मतमतांचा गलबला वाढतो आणि धर्माला ग्लानी येते,,,ही अथर्वशीर्षची साधना अखंडपणे सुरू ठेऊ,,,



# भाग–२२

# त्वंवाङ्मयस्त्वंचिन्मयः।




हरिओम,,,,श्री गणेशाचे रूप हे व्यापक आहे,आणि ते दोन महावाक्यांनी निर्देशित केले आहे,,तू ब्रह्म आहेस तूच माझा आत्मा आहे ,,,आणि ह्या स्तरावर तू आणि मी वेगळे नाहीत,,ही परमेश्वराची व्यापकता व ओतप्रोतता कशी आहे,,हे आता ह्या श्लोकात व्यक्त केले आहे,,,,

त्वम वाङ्मय: :––

ह्या ठिकाणी असि हा शब्द अंतर्भूत आहे,,नाम आणि नामी ह्यांचे ऐक्य ऋषींनी जाणले आहे,,हे गणपती तू वाणीमय आहेस,,,मय ह्या शब्दातून अपरिवर्तनीयता निर्देशित होते ,,,उदा, आपण म्हणतो जलमय सुवर्णमय,समुद्र जलमय आहे असे म्हणतात त्यात लाटा जरी भिन्न असल्या तरी जळतत्व व्यापक व अपरिवर्तनीय आहे,,सुवर्णाचे दागिने जरी भिन्न असले तरी त्यात सुवर्णतत्व अपरिवर्तनीय आहे,,,त्याच प्रमाणे श्री गणेश वाणीमय आहे अर्थात ह्याठिकाणी वाणी ह्या शब्दाचे दोन अर्थाने आपण विचार करू,

वाणी म्हणजे शब्द:: विचार करा शब्द मग तो मानवाचा असो पशु पक्षाचा असो किंवा ह्या सृष्टीतील कुणाचाही असो त्यात जड चेतन व्यक्त अव्यक्त असे सर्व शब्द आवाज अंतर्भूत आहेत,,ह्या मागे प्राणसत्ता

असेल तरच ते व्यक्त होतात,,हे शब्द दिसायला जरी स्थूल वाटत असले तरी त्यांच्या मागे ईश्वराची प्राणसत्ता असते आणि म्हणूनच वाणीचा दुसरा अर्थ सत्ता असाही होतो,,ही सत्ता अशी आहे ज्याला वाचा प्रकाशित करू शकत नाही पण त्याच्या प्रकाशाने वाणी प्रकाशित होते,,त्यांच्यापर्यंत वाचा पोहोचू शकत नाही पण जो वाचेचा प्रकाशक आहे तो श्री गणेश आहे,,,

करण गणपती ब्रह्मस्वरूप आहे आणि ब्रह्म सर्वव्यापक आहे,,,बरेचदा आपण व्यवहारातही म्हणतो की '''बोलविता धनी वेगळाची''',,,वाचोहम वाचा असे केनोपनिषदतही वर्णन आढळते,,,'''आपुलिया सत्ते नाही मी बोलत'''' असे संतही म्हणतात,,हे एवढे सर्व असले तरी प्रत्येकाचे प्रगटन निरनिराळे असते,,ह्याचे कारण प्रत्येकाच्या प्रकृतीत भिन्नता आहे,,अचेतन वस्तूत सुद्धा शब्द आहेत पण त्यांना प्रगटनाचे उपकरण नाही,,ही जी सर्व शब्दराशी आहे ही सर्व त्या ओंकाराररूप परमेश्वराचे प्रगटन आहे,,,ह्या वाणीचे वर्गीकरण जर आपण केले तर लक्षात येईल की तीन प्रकारातच ह्याचे वर्गीकरण होते

१)उत्पत्तीचा ध्वनी ,,

२)स्थितीचा ध्वनी,,

३)लयाचा ध्वनी,,,

अ उ म म्हणजेच ओंकार म्हणजेच गणपतीचे रूप आहे,,ह्या शब्द राशीपासूनच प्रत्येक भाषेची साहित्य निर्मिती होते,,आणि ह्याचा अधिष्ठाता श्री गणेश आहे,,,ही सर्वव्यापाकता गणपतीची ह्या शब्दात वर्णन केली आहे,,,मित्रानो शब्दाचा जेवढा शास्त्र शुद्ध अभ्यास ह्या ठिकाणी संस्कृत भाषेत आढळतो तेवढा क्वचितच इतर भाषांनी केला आहे,,आणि म्हणूनच संस्कृत भाषेला भाषांची जननी म्हणतात,

## भाग – २३

# त्वंवाङ्मयस्त्वंचिन्मयः।




हरिओम::श्री गणेश वाणीमय आहे,,कोणताही शब्द प्रगट होत असेल तर त्याच्या मागे गणेशाची सत्ता आहे,असे विधान करीत असताना तत्व रूपाने गणेशाचा विचार केला आहे,,

त्वम चिन्मयः :––चिन्मय ह्याचा अर्थ शुद्ध ज्ञान,,,चैतन्यमय,,,चैतन्याने व शुद्ध ज्ञानाने ओतप्रोत असा,,,जगातील बाकी सर्व ज्ञानापेक्षा आत्मज्ञान सर्वात महत्वाचे आहे,,स्रेष्ठ आहे,,ह्याचे महत्वाचे कारण हे ज्ञान प्राप्त केल्यावर काहीही प्राप्त करायचे राहत नाही। आणि जीवन आनंदी होते कारण ह्या परिवर्तनशील जगाचे जीवनाची क्षणभंगुरतेचा अनुभव ह्याठिकाणी आहे आणि जीवनाच्या व्यापाकतेचाही अनुभव आहे,,,पण हे ज्ञान हा अनुभव ह्याच्या मागे त्याला प्रकाशित करणारे चैतन्य असते,,अगदी खूप अंधारात उभे राहिले तरी तेथे अंधार आहे हे त्या चैतन्याच्याच प्रकाशात कळते,,हाच ज्ञानप्रकाश आहे,,

ज्ञानेंद्रियचे कर्मेंद्रियचे जे व्यवहार चालतात ते त्याच्याच सत्तेने,,,वाणीला प्रकाशित करणारा,विचारांना प्रकाशित करणारा तोच आहे,,,पहा आपण विचार करून ,,की आपल्या मनात विचार का येतात ? कोठून येतात??त्याचा उगम काय??शब्द ब्रह्माचे

आकलन मला कसे होते??बोलण्याचे शब्द मला कुठून सुचतात??त्याची जीवशास्त्रीय प्रक्रिया काहीही असू देत पण हे सर्व अनाकलनीय आहे,,सर्व शब्द तीनच शब्दात कसे व्यापले आहे??वाचेपेक्षाही शब्द सूक्ष्म आहेत??ह्या सूक्ष्मलाही कोण प्रकाशित करते??कुणाच्या प्रकाशात हे ज्ञान प्राप्त होते???त्याचे उत्तर एकाचं!!जी चैतन्ययुक्त सत्ता आहे तिच्या प्रकाशात हे सर्व ज्ञान होते आणि ती सूक्ष्मातिसूक्ष्म असून सर्व व्यापक आहे,,,जिच्या प्रकाशात आहे नाही ह्याची आकलन होते,,,

मित्रानो विज्ञान एवढे पुढे गेले की आता त्याचा स्फोट झाला,,,पण ज्ञानामगिल विज्ञान मात्र शोधून काढायला ते नक्कीच असमर्थ ठरले आहे,,ह्याचे महत्वाचे कारण जी वस्तू जिथे आहे म्हणजेच ज्या वस्तूचे जे स्थान ठरले आहे ती तिथेच शोधावी लागते,,,आमच्या ऋषींनी ध्यानप्रक्रियेलाच प्रयोगशाळा बनविले होते,,,आणि स्वतः मध्येच प्रयोग केले आणि त्यांना सृष्टीची अनेक रहस्ये कळली,,,आणि ती त्यांनी पुढच्या पिढीपर्यंत संक्रमित केली,,,विज्ञानाला ह्या प्रयोगशाळा मान्य नाहीत,,भारताकडे जे ज्ञान आहे त्याची सत्यता आम्ही नाही पाश्चात्य देशांनी सांगितली की ती आम्हाला पटते,,हा दैव दुर्विलास आहे,,,,



भाग – २४

# त्वंवाङ्मयस्त्वंचिन्मयः।




त्वम आनंदमय:–गणपती हा सुखस्वरूप व आनंदस्वरूप आहे,,जीवनाचा उद्देश आनंदाची प्राप्ती व दु:खाची निवृत्ती हा आहे,,पण जीवन हे दुखमय आहे असा सर्वसामान्यपणे सर्वांचा अनुभव आहे,,कारण जीवनात सुख हवेच असते पण ते काही काळ टिकत आणि त्याचे रूपांतर दु:खात कधी होईल हे सांगता येत नाही,,,काहींच्या जीवनात तर इतके दु:खाची साखळी निर्माण झाली असते की ते फक्त दु:खच सहन करण्यासाठी जन्माला आहे का??असा प्रश्न आपल्याला पडतो,आशा प्रसंगी काय घडते??

काही लोक खचतात, जीवन जगणेच विसरतात

तर काही लोक ह्यातूनही मार्ग काढतात आणि तरीही आनंदाने जगतात,,आणि अशा लोकांकडे पाहून मग आपल्याला एक प्रकारची प्रेरणा मिळते,,

असे का घडते?

त्याच प्रसंगांनी एखादी व्यक्ती खचून जाते

तर एखादी व्यक्ती समर्थपणे प्रसंगांना तोंड देते,,

ह्याचे महत्वाचे कारण दु:खाची जी परिस्थिती येते त्याचे


आकलन,,आणि ह्या दु:खाच्या परिस्थितीला स्वीकृती आणि दु:खाच्या कारणांचा निरास,,पाहिले दोन गोष्टी समजण्या सारख्या आहेत पण शेवटची जी आहे की दु:खाच्या कारणांचा निरास,,,म्हणजे काय??जी व्यक्ती दु:खाच्या कारणांचा निरास करते ती व्यक्ती जीवनात कितीही संकटे आलीत तरी दु:खी होत नाहीत,,आणि श्री गणेशाच्या रुपाकडे पाहून हेच आपणास शिकायचे आहे,,श्री गणेश जीवनातील प्रारब्धानुसार येणारी दु:ख टाळू शकत नाही पण दु:खाच्या कारणापासून आपणास निवृत्त करू शकतो,,दु:खापासून निवृत्त व्हायचे असेल तर त्याचे कारण दूर करावे लागेल,,आणि दु:खाचे कारण फक्त अज्ञान आहे,स्वत: बाबतचे ,जगताबाबतचे,सर्व अज्ञान दूर केले तर अर्थात ज्ञान शिल्लक राहील आणि जेथे ज्ञानप्रकाश आहे तेथे दु:ख नावाच्या अंध:काराला स्थान नाही,,गणपती ज्ञानस्वरूप आहे,,आणि म्हणूनच तो आनंद स्वरूप आहे,,

शिवाय दु:ख निर्माण होण्याची आणखी एक कारण आहे की आपण सर्वत्र द्वंद्वा पाहतो,,मी आणि जगत ह्यात भिन्नता पाहतो हे दु:खाला कारणीभूत आहे,गणेश हा द्वंद्वातीत आहे,,तो विकाराराहित आहे,,त्यामुळे दु:खाचा तेथे लवलेशही नाही,,आता सुख दु:ख ह्या सर्व सापेक्ष संकल्पना आहेत,,पण ज्याने आत्मनुसंधान सतत ठेवले त्याला सुख दु:ख ह्या सापेक्ष कल्पना विचलित करू शकत नाही,,करण त्याने आपले आत्मस्वरूप अनंदस्वरूप जाणले आहे,,आणि माझे आत्मस्वरूप व गणपती हे भिन्न नाही,,

मित्रानो प्रत्येक वेळी आपणास तत त्वम असि,, व ,,अयं आत्मा ब्रह्म,,ह्या दोन महावाक्यांचा अनुभव आल्याशिवाय राहणार नाही,,,

# भाग – २५

# त्वंब्रह्ममय:।।




हरिओम ,,,सुप्रभात मित्रानो,,,श्री गणेशाच्या रूपाचे वर्णन करीत असताना समष्टी स्तरावर ते ब्रह्माचे स्वरूप आहे तर व्यष्टी स्तरावर ते आत्म्याचे स्वरूप आहे,,आणि आत्मा आणि ब्रह्म हे निराळे नाही,,म्हणून गणपतीचे स्वरूप हे माझेच स्वरूप आहे हा निर्णय होणे महत्त्वाचे आहे,,

गणपतीचे रूप आनंदाने ओतप्रोत भरलेले आहे,,मी आणि गणपती ह्याच्यात भेद नाही मग मी दु:खी कसा??माझेहीरूप आनंदमय आहे,,

त्वम ब्रह्ममय::–

मय हा शब्द ओतप्रोतता निर्देशित करतो,,श्री गणेश सर्वव्यापक ब्रह्म आहे असे म्हणत असताना ब्रह्म म्हणजे काय हे पण समजून घेणे गरजेचे आहे,,वास्तविक पाहता ब्रह्म हे नाम नाही कारण नाम त्यालाच असते ज्याला रूप आहे,,,,

ब्रह्म ही संकल्पना आहे तिला नाम रूप नाही,आत्मा ही संकल्पना आहे त्याला नाम रूप नाही,,

ब्रह्म हे रुपादि विरहित निर्विशेष आहे,ब्रह्म हे दिसणार तर नाहीच त्यामुळे जे दिसते ते ब्रह्म ही नाही,

ते ज्ञानेंद्रियाने कळत नाही,,मग जे जे नामरूपात्मक आहे जे जे

इंद्रियांनी कळते ते ब्रह्म नाही हा निर्णय जर झाला नाही तर फसगत होण्याची शक्यता जास्त असते,,

ब्रह्म सद्रूप आहे म्हणजेच आम्हाला सर्वांना आपण अखंड असावे असे वाटते,,

ब्रह्म चिद्रुप आहे म्हणजेच ज्ञानाची इच्छा असणे ही चिद्धवनाना आहे,,

ब्रह्म आनंदरूप आहे,,,आम्हाला सर्वांना सुख हवाय आनंद हवाय,ही आनंदरूपातेची भावना आहे,,वास्तविक हीच आपली इच्छा व जिज्ञासा असते,,,म्हणूनच अथातो ब्राह्मजिज्ञासा ही ब्रह्मसूत्राची पण सुरवात मांडली आहे,,

ब्राह्मची साधना केल्यावर ''''ब्राह्मविद ब्राह्मिव भवति'''''',,म्हणजेच साधक जीवरूपाने न राहता ब्राह्मरूपाने राहतो,,, आता श्री गणेश स्वतः च ब्रह्मरूप असल्याने त्याची साधना करणारा त्याच्याच रूपात विलीन होतो,,व त्याला ''''भरला घनदाट हरी चोहीकडे'''''' म्हणजेच सर्वत्र ब्रह्म स्वरूपाचेच दर्शन होते,,अयं आत्मा ब्रह्म ही अनुभूती आल्याशिवाय राहत नाही,, साध्या सोप्या भाषेत सांगायचे तर पूर्णत्वाची संकल्पना म्हणजे ब्रह्म आहे,, चैतन्याचे तत्व म्हणजे ब्रह्म आहे तेच आत्मतत्त्व आहे जे सर्वांमध्येच विद्यमान आहे,

ते ब्राह्मतत्व म्हणजे गणपती व आत्मतत्त्व म्हणजे मी ह्यात काहीच भेद नाही,,

ह्या स्तरावर विचार केला तर मी आणि श्री गणेश ह्यात भेद नसून एकाच आहे ही अनुभूती आहे,,

ही आपण सर्वांना येवो ही गणेश चरणाशी प्रार्थना,,,,,

# भाग – २६

# त्वंसच्चिदानंदाद्वितियो।ऽसि।




सुप्रभात मित्रानो,,,,बुद्धीच्या द्वारा आपल्याला ज्ञान जरी व्हायचे असेल तर त्यांच्यामागे चैतन्य असल्याशिवाय होऊ शकत नाही,इंद्रियांचे प्रगटन सुद्धा चैतन्याच्या आधारेच होते,,ही गणपतीची व्यापकता,,वाचेपेक्षा विचार सूक्ष्म,विचारापेक्षा ब्रह्म सूक्ष्म,आणि जेवढे सूक्ष्म होतो तेवढे व्यापक होत असतो,,हा साधनेचा क्रमविकास आहे,,तत त्वम असि ह्यात तत पद ब्रह्माचे निर्देशन करते तर त्वम पद हे आत्मतत्वाचे निर्देशन करते,,आणि ह्याचाच मागोवा आपण घेत आहोत,,

त्वमसचिदानंदद्वितीयोसि::

‘‘‘सत चित आनंद अद्वितीय असि‘‘‘ असे म्हणत असताना दृढिकरणाच्या दृष्टिकोनातून येथे पुनश्च तत पदाचे निर्देशन केले आहे,,काही महत्वाच्या मुद्द्यांचे दृढीकरण केल्याशिवाय आपल्यालाही समजत नाही,,हा त्यामागील उद्देश,,

सत

ह्या शब्दाचा विचार केल्यास, जे तीनही काळात अबाधित असते त्याला सत म्हणतात,,आता जेथे नाम, रूप, आकार ,आहेत तेथे ही बाब शक्य नाही,,करण हे सर्व निर्माण झाले व काळाच्या ओघात

नष्टही होणार,,पण सगळ्या ब्राह्मण्ड चे अधिष्ठान आहे ते सत आहे,,ते अपरिवर्तनीय आहे आणि ते निराकार आहे,,तेच ब्रह्म आहे आणि तेच आत्मस्वरूपाही आहे,,माझ्या शरीराला जन्म मृत्यू असेल पण त्यातील जो मी आहे तो अपरिवर्तनीय आहे,,आणि म्हणूनच ब्रह्मस्वरूप असणारा गणेश आणि मी अभिन्न आहे,,

चित:-

चित ह्या शब्दातून श्री गणेश शुद्ध ज्ञानस्वरूप आहे हेच ऋषींची अनुभूती आहे,,आपण जेव्हा विचार करतो त्यावेळी ह्या विचाराना प्रकाशित कोण करतो,,शिवाय प्रत्येक वेळी मी आहे ही जाणीव आपल्या ठिकाणी सतत असते,,जागेपणी तर असतेच पण गाढ झोपेतही असते,,ह्याला प्रकाशित करणारे जे तत्व आहे ते मात्र स्वयं प्रकाशित आहे ,,असे जे नित्यप्रकाशित स्वयंप्रकाशित तत्व आहे त्याला चित असे म्हणतात,,हे प्रकाशस्वरूप अपरिवर्तनीय निर्विकार शुद्ध आहे हेच गणेशाचे स्वरूप आहे कारण गणेशच ब्रह्ममय आहे आणि हेच माझेही स्वरूप आहे कारण हे माझ्या आत्मतत्वाचे निर्देशन आहे,,,

आनंद:

श्री गणेश अनंदस्वरूप आहे,,आनंद म्हणजे सुखस्वरूपता आहे,,आपण सुखस्वरूप तेव्हाच होतो जेव्हा आपण व्यापक होतो,,स्वार्थी सुखलोलुपता माणसाला विशिष्ट काळापुरते सुख देईल पण त्याचे पर्यवसान दु:खातच होईल,,पण व्यापाकतेने सुखाचा विचार माणसाला आनंदी बनवितो,,व्यापक सुख म्हणजेच जे स्थळ काळ परिस्थिती निरपेक्ष आहे आणि जे कशावरही अवलंबून नाही,,असे श्री गणेशाचे रूप आहे तेच गुणधर्म आत्म्याचे आहे आणि म्हणून तेच स्वरूप माझेही आहे,,,

अद्वितीयोसि;–

ह्या शब्दातून ऋषींना जी अनुभूती आली ती ‘‘‘‘तुझ्यासारखा तूच देवा‘‘‘‘‘,,,कुणीही तुझ्यासारखा नाही कारण तूच एकमेव आहे,,तुझ्यात कोणतेही भेद नाहीत ,,सजातीय विजातीय स्वगत भेद राहितम असे श्री गणेशाचे रूप आहे,,

ही उपनिषदांची अभ्यास प्रणाली आहे की ब्रह्म सत्य हे दोन असू शकत नाही ही ज्ञानाची दृष्टी आहे,,ह्या सर्व जगताचे अधिष्ठान जरी माया आहे तरी मायेचे अधिष्ठान ब्रह्म आहे,आणि तेच सर्वांचे अधिष्ठान आहे,,आणि आपली दृष्टी अधिष्ठानकडे असावी,,

सत्य दोन नाहीं,,

शुद्ध ज्ञान दोन नाही,,आणि

आत्म सुखशिवाय सुखाची आनंदाची कल्पना असू शकत नाही,,,

म्हणून ते सर्व अद्वितीय आहे,,,किती छान,,,साधनेचा एक एक टप्पा पुढे पुढे सरकताना अथर्वशीर्षासारखे स्तोत्र आपल्याला निश्चित साहाय्य भूत ठरते,,,



भाग – २७

# त्वंसच्चिदानंदाद्वितियो।सि।




मुख्य मुद्दे विसरू नये ह्यासाठी आचार्यांनी दृढीकरण केले,,हे गणेशा तू सत चित आनंद स्वरूप आहे आहे ,तूच एकमेव आहे,,ज्ञानाच्या दृष्टिकोनातून भेद नाही,,पण बुद्धी सतत भेद करते,,पण ह्या भेदाच्या पलीकडे आहे,तो अद्वितीय आहे,त्याच्यासारखा कुणीच नाही,कारण ते व्यापक तत्व आहे ,,,त्याच्या सारखे दुसरे चैतन्य नाही,,

तूच निर्गुण निराकार असून तूच माझ्यासमोर सांगून साकार होऊन माझ्यासमोर आहेस,,असे सांगत असताना एक केव्हढे मोठे तत्व ह्याठिकाणी विशद केले आहे ते असे की निर्गुण निराकार परमेश्वराचे आपण सगुण साकार प्रगटन पाहतो तेव्हा त्याचे प्रत्यक्ष दिसणाऱ्या रूपातील तत्वाकडे आपली दृष्टी असायला हवी,,त्याबाबत चा भाव मनात असायला हवा,,उदा,,सोन्याचे खूप दागिन्यांची पूजा आपण लक्ष्मी पूजनाचे वेळी करतो पण त्यावेळी आपण अंगठीची पूजा करू की बांगडीची असा विचार करीत नाही,कारण त्यावेळी आपण सोने नावाच्या लक्ष्मीची पूजा करतो,,,कोणत्याही दागिन्यांची पूजा करावे पण अनुसंधान सोन्याचे असले पाहिजे,,त्याचप्रमाणे ऋषींना आता गणपतीचा प्रत्यक्ष साक्षात्कार झाला पण ब्राह्मच त्यांच्यासमोर साकार प्रगटले,,त्वम प्रत्यक्षम ब्रह्मासी,,,, ही ऋषींची अनुभूती आपल्याला

येणार नाही का??असा प्रश्न पडेलच,,,

का नाही येणार??त्यासाठी ऋषींचा भाव मनात जसे गणपतीबाबत चे भाव निर्माण झाले तसेच माझ्याही मनात निर्माण झाले आहेत का हे ही पडताळून पाहणे गरजेचे आहे,,

पण नेमके काय घडते की मी कर्मकांडात इतका स्वत:ला अडकवून घेतो की खऱ्या तत्वांचा मला विसर पडतो आणि मग मी जर विशिष्ट कर्मकांड नाही केले तर गणपती माझ्यावर कोपणार तर नाही ना!!अशी शंका माझ्या मनात निर्माण होते,,,

मित्रानो कर्मकांड जरूर करा पण ते यांत्रिक नसावे,,ती आपली बहिरंग उपासना म्हणून जरूर करायची,,त्यामुळे परमेश्वराबाबत प्रेमभाव निर्माण होईल,,पण त्यातून भय निर्माण होण्याइतकेही त्याचे स्तोम माजवू नका,,, ह्याने आपणच आपल्या विनाशाला कारणीभूत ठरतो,,

ह्याठिकाणी ब्रह्म हा शब्द वापरला कारण ब्रह्म हे सर्वनामवाचक शब्द आहे,,आणि सर्वनाम असल्यामुळे तो सार्वभौम आहे,,परमेश्वराच्या कोणत्याही रुपाला तो लागू पडतो,,जगत राममय आहे, कृष्णमय आहे,शिवमय आहे, हरीमय आहे,नानकमय आहे,बुद्धमय आहे,,लावू या सगळ्या परमेश्वराची नावे,, ही नामरूपात्मक भिन्नता आहे पण तत्वाच्या स्तरावर ह्यात भेदच नाही,,

निर्गुण निराकार ब्राह्मचीच प्रगटन आहे सर्व,,मग ह्या सर्वांना भिन्न तरी कसे म्हणायचे??म्हणून संतांनी सुद्धा म्हटले आहे

जगा मध्ये ब्रह्म दिसे उधडे,,

एकचि धागा नाना परी लुगडे,,,,

एकचि सोने नाना परी बुगडे,,,

ह्याचप्रमाणे आपल्याही स्वरूपाचे नामरूपात्मक प्रगटन भिन्न आहे

पण सर्वमधील आत्मतत्त्व एकच आहे,,तत्वाच्या स्तरावर भिन्नता नाहीच,,आणि म्हणूनच ईश्वर आणि मी ,गुरू आणि मी,समस्त चराचर सृष्टी आणि मी आमच्यात एक अभंग नाते आहे आणि ते नाते आत्मिक आहे,,त्या नात्याला भेदाभेद ,लहान मोठे , जातीभेद,धर्मभेद,संप्रदाय भेद मान्यच नाही,,

मग अशी ऐक्याची अनुभूती ही किती कल्याणकारी आहे हे ही आपल्या लक्षात येईल,,हीच खरी उपासना आहे,जी मनातून द्वैताला दूर करते,,,,,

किती छान,,परमेश्वर आणि मी अभिन्न,,चराचर सृष्टी आणि मी अभिन्न,,पुन्हा एकदा तत त्वम असि,,आणि अयं आत्मा ब्रह्म,,,,

अशी अनुभूती जर प्रत्येकाला आली तर फक्त माझाच देश नाही तर हे विश्वच एका सुंदर नात्यात बांधले जाइल आणि मग कुणीही ह्यांच्यात अडथळे निर्माण करू शकणार नाही,,वैश्विक ऐक्याची संकल्पना ह्याहून काही वेगळी असू शकते का???



# भाग–२८

## त्वंवाङ्ग्मयचस्त्वंचिन्मय।
## त्वंवाङ्ग्मयचस्त्वंब्रह्ममय:।।
## त्वंसच्चिदानंदाद्वितियो। सि। त्वंप्रत्यक्षंब्रह्मासि।
## त्वंज्ञानमयोविज्ञानमयो।सि।४।




ऋषींना प्रत्यक्ष ब्रह्माचा सगुण रूपात साक्षात्कार झाला,,आणि त्वम प्रत्यक्षम ब्रह्मसि हा तो साक्षात्कार होय,, त्वम ज्ञानमयो विज्ञानमयोसि:–

श्री गणेश हा प्रत्यक्ष ज्ञानस्वरूप आहे विज्ञानस्वरूप आहे,,शास्त्राचे श्रवण व गुरुपासून प्राप्त होते ते ज्ञान,,गणपती हा ज्ञानस्वरूपच आहे,,गणपतीचे रूप आपण पाहिले तर सुपसारखे कान जे श्रवणासाठी समर्थ आहेत,,पण त्याचबरोबर ज्याप्रमाणे सुपातून नको असलेला गोष्टी बाहेर फेकले जातात तसेच आपल्या विचारातील असार गोष्टीना फेकून देण्याचा प्रतिकात्मकता त्या ठिकाणी आहे,,त्याचे मोठे डोके बुद्धिमत्तेचे प्रतीक आहे,,सहा हात शट शास्त्राचे प्रतीक आहेत,,

अशा विविध प्रकारे केवळ ही प्रतिकात्मकता नसून ते ज्ञानाचे प्रत्यक्ष दर्शनच आहे,,हे ज्ञान आपणास गुरूकडून प्राप्त होते ,,म्हणूनच गुरू हे श्रोत्रीय व ब्रह्म निष्ठ असायला हवे,,करण तत त्वम असि हे गुरू कडून वारंवार श्रवण करणे व ते श्रद्धेने श्रवण करणे आवश्यक आहे,,आणि

हे गुरूंनी सांगितल्याशिवाय त्याबाबत चे सखोल ज्ञान होऊ शकत नाही कारण गुरूंनी ब्रह्म तत्वांचा अनुभव घेतलेला आहे,,,अगदी व्यवहारातील उदा,घेतले तर जी वस्तू मी पहिली आहे अनुभवली आहे व ती इतरकरिता पण खूप फायदेशीर आहे असे जेव्हा मला वाटते तेव्हाच त्याचे मी उत्कृष्ट वर्णन करू शकते,,,अगदी तसेच आपल्या ब्रह्मनिष्ठ व श्रोत्रीय गुरूंनी प्रत्यक्ष ब्रह्मनुभूती घेतलेली असते ,ते अत्यंत दयाळू असतात आता माझ्याही शिष्याचे कल्याण व्हावे हीच त्यांची दृष्टी असते आणि ह्यांसाठीच ते शिष्याला ज्ञान प्रदान करतात,,हे परोक्ष ज्ञान होय,,आशा ज्ञानाने परिपूर्ण असा श्री गणपती आहे,,,

विज्ञानमयोसि:–बघा साखर खूप गोड असते हे नुसते ऐकले त्याबाबतचे तात्विक ज्ञान पूर्ण मिळाले पण जोवर त्याची गोडी चाखत नाही तोपर्यंत साखरेच्या ज्ञानाची परिपूर्णता होणार नाही,,केवळ बौद्धिक स्तरावरील ज्ञानापेक्षा अनुभवाला जास्त महत्व आहे,,म्हणून शास्त्रकडून गुरूकडून मी कितीही ऐकले तत त्वम असि ,तरी अयं आत्मा ब्रह्म,,अहं ब्रह्मस्मि ही प्रत्यक्ष अनुभूती आहे ,,,ज्याला शास्त्राच्या भाषेत अपरोक्ष ज्ञान म्हणतात,,,आता हे ज्ञान शब्दाच्या स्तरावर येत नाही तर ते प्रत्यक्ष अनुभवाच्या स्तरावर येते,,हा एकरूपतेचा अनुभव हे विशेष ज्ञान आहे,,हेच स्वानुभवाने ज्ञान आहे,,ह्यालाच विज्ञान म्हणतात,,गणपतीच्या सगुण रूपातून तत्वांचे ज्ञान प्राप्त होतेच पण त्याच्या सततच्या चिंतनातून स्वानुभव प्राप्त होतो,,,ज्या दोन महावाक्यांचा आपण मागोवा घेत आहोत त्याची प्रत्यक्ष अनुभूती ह्या ठिकाणी येते,,

मित्रानो ज्ञान हे तीन प्रकारचे असते,,

१) प्रत्यक्ष ज्ञान जे ज्ञानेंद्रियांचा माध्यमातून प्राप्त होते। ,,२)परोक्ष

ज्ञान:-जे ज्ञान आपण श्रवणातून प्राप्त करतो,,,हे ज्ञान कधी कधी प्रत्यक्ष ज्ञानामध्ये परिवर्तित होऊ शकते,,,,३)अपरोक्ष ज्ञान:-जे प्रत्यक्ष नाही परोक्ष नाही,,,पण जे स्व चे ज्ञान आहे,,ही स्वानुभूती आहे,,

तुमच्या एक गोष्ट लक्षात आली असेल की आधुनिक जगात सर्वप्रकारच्या महितीलच ज्ञान संबोधले आहे,,, हे  मध्ये हरविले आहे knowledge ?? Information ज्याची गृहीतके मांडण्यात येतात त्याला विज्ञान संबोधण्यात आले,,,ज्ञानाचा खरा आशयच हारविला मग खरे ज्ञान होईल कसे??



# भाग–२९

**सर्वजगदिदंत्वत्तोजायते। सर्वजगदिदंत्वत्तस्तिष्ठति।**
**सर्वजगदिदंत्वयिलयमेष्यति।। सर्वजगदिदंत्वयिप्रत्येति।।**
**त्वंभूमिरापोनलो।ऩिलोनभ:।। त्वंचत्वारिवाक्पदानी।।५।।**




मागच्या श्लोकात आपण पाहिले की गणक ऋषींच्या सक्षात्कारात गणपतीचे रूप कसे आहे,, वाणी स्वरूप, सत चित अनंदस्वरूप, अनंदस्वरूप, ब्रह्मस्वरूप असा असणारा गणपती,, मय ह्या शब्दातून ऋषींनी त्याची ओतप्रोतता व्यक्त केली व त्यांना प्रत्यक्ष झालेला गणपतीचा साक्षात्कार की तोच प्रत्यक्ष ब्रह्म म्हणून माझ्यासमोर आहे,तो ज्ञान विज्ञानमय आहे,हे त्याचे अनुभूती वर्णन केल्यावर आता पुढील श्लोकात हे संपूर्ण जगत हे त्याचेच कसे प्रगटन आहे हे विशद केले आहे,,

ह्या श्लोकातील एकेका पदाचा आपण विचार करू पण त्याआधी एक गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे की ‘‘‘‘जे ज्याच्यापासून निष्पन्न झाले ते त्याच्यापासून भिन्न नसते‘‘‘‘‘,,संपूर्ण जग ज्या मायेपासून निर्माण झाले ती माया परमेश्वरापासून भिन्न नाही,,आणि म्हणून हे जगत सुद्धा परमेश्वरापासून भिन्न नाही,,

हा कार्यकारण संबंध नाही ह्याला विवर्त संबंध म्हणता येईल,,आभास संबंध म्हणता येईल,,

सर्वम जगद ईदम ततो जायते:-

ईदम सर्वम म्हणजेच जे आपल्याला विषय स्वरूपात प्रतीत होते असे सर्व स्थूल जगत तसेच सूक्ष्म जगत ,,,,,ह्या सर्वांची उत्पत्ती ज्या माया तत्वामुळे झाली ,तिचा अधिष्ठाता तू असल्यामुळे ह्या जगताचा निर्माता अधिष्ठाता तूच आहे,,

मित्रानो ऋषी आता आपल्याला समजावे म्हणून बुद्धीच्या स्तरावर येऊन आपल्याला समजावीत आहे,,,बघा जगत हे दोन प्रकारचे असते,,

१)अंतरजगत:-ह्यालाच विचारांचे जगत असेही म्हणतात,,विचारात्मक जगताची प्रचिती आपणास मन आणि बुद्धीच्या माध्यमातून येते,,ह्यालाच सूक्ष्म जगत असेही म्हणतात
२)बाह्य जगत:-शरीर इंद्रियांच्या माध्यमातून ज्याची आपण प्रचिती घेतो त्याला बाह्य जगत म्हणतात,,ह्यालाच स्थूल जगत असेही म्हणतात,,,

पण पुन्हा प्रश्न उद्भवतो की जगत कशाला म्हणायचे,,जगत ह्या शब्दाचे पर्यायी शब्द आहेत संसार,,जगत ह्याचा अर्थ ‘‘‘‘‘गच्छंती इति जगत:,‘‘‘‘‘‘,जे चालते फिरते म्हणजेच बदलते त्याला जगत म्हणतात,,,संसार ह्याचा अर्थ ‘‘‘‘संसरति इति संसार:‘‘‘‘‘ म्हणजेच ज्यात संसरण होते परिवर्तन होते त्याला संसार म्हणतात,,व्यक्ती हा जगताचाच भाग आहे,आणि म्हणून आपल्याला ह्या जगताचे रूप परिवर्तनशील आहे हे कितीही सांगितले तरी नाही पटत करण आपण ते जाणण्याचा प्रयत्न नाही केला,,

बघा एक गोष्ट किंवा नियम असतो की एखादी परिवर्तन शील गोष्ट जेव्हा असते तेव्हा तिचे अधिष्ठान अपरिवर्तनीय स्थिर असते,,अगदी व्यवहारातील उदा आपण घेऊया की ,समुद्रावर आपण

कायम परिवर्तित होणाऱ्या असंख्य लाटा बघतो पण त्याचे आतल्या दृष्टीने पाहिल्यास ती अत्यंत नि:स्तरंग अशी जलराशी आहे,,जेवढे आपण खोल जातो तेव्हढे तो समुद्र प्रशांत असतो,,

जगताचे असेच आहे,,वर वर अनेक परिवर्तन आपल्याला बघावयास मिळतात पण त्यामागील अपरिवर्तनीय तत्व काय हे समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे,,,,

मित्रानो ह्या विश्वाच्या उत्पत्ती बाबत वैज्ञानिकांच्या मनात किती कुतूहल आहे,,अनेक आभासी प्रयोग ह्यासाठी होत आहे,,परंतु आजचे विज्ञान हे अद्याप सिद्ध नाही करू शकले,,,आधुनिक विज्ञानाची ही मर्यादा आहे,,पण ज्या विज्ञानाची भाषा ऋषींनी केली ,त्या विज्ञानाचे प्रयोग हे ऋषींनी त्यांच्या अंतरजगतात केले,,त्यांच्या प्रयोगशाळा ह्या वैश्विक होत्या,,सूक्ष्म जगत हे त्याची त्यांची प्रयोगशाळा म्हणजेच मन बुद्धी,,,,आणि हीच त्यांची उपकरणे,,,पण ही दिसणारी नाहीत,,,म्हणून त्यांच्या तत्वांवर आपला विश्वास नाही,,,पण हे मात्र नक्की की सृष्टीच्या गूढ रहस्याचा शोध घेण्यासाठी वैज्ञानिकांना back to Ved ‘अर्थात वेदांकडे परत हे तत्व वापरावेच लागेल,,,जगताबाबत चे अधिक विवेचन पुढील भागात,,,,,



## भाग–३०

### सर्वजगदिदंत्वत्तोजायते।




मित्रानो,,,ऋषींनी ह्या श्लोकात गणपतीचे प्रगटन व्यक्त केले आहे आणि सर्व जगत तुझ्यातूनच निर्माण झाले ही त्यांची अनुभूती आहे,,आणि नियम असा आहे की जे त्याच्यापासून निर्माण झाले ते त्याच्यापासून भिन्न नसते,,सोन्यापासून निर्माण झालेले दागिने सोन्यापासून भिन्न नाही,,,अशी घडी आपण सर्वप्रथम बसवून घेऊ,,आता जगत जे स्थूल व सूक्ष्म स्वरूपाचे आहे त्याच्या बाबत अधिक विचार करूया,,,

आपल्या ऋषी मुनींनी जी जगताची निर्मितीचे घटक सांगितले ते २४ आहेत ,,,त्यात

पंच महाभूते:–५,,

पंच ज्ञानेंद्रिये:–५,,

पंच कर्मेंद्रिये,:–५,

पंचप्राण:–५ आणि

अंत:करण चतुष्टय(मन बुद्धी चित्त अहंकार)

आता केवळ ह्याचे निर्देशन केले नाही तर ते विशिष्ट क्रमाने प्रगट झाले आहे तो क्रमही तत्वबोधात देण्यात आला आहे,,जगत निर्मिती हा परिणाम समजले तर त्याचे कारण असलेच पाहिजे,,म्हणून सत्य

स्वरूपात असणारे ब्रह्म हे त्याचे कारण आहे ,,(वास्तविक सत्य ह्या संकल्पनेस कोणतेही कारण जबाबदार नाही),,

हे ब्रह्म त्रिगुणातमीका असणाऱ्या मायेशी एकरूप होते,,त्यालाच ईश्वर म्हणतात आणि ही माया शक्ती आणि ब्रह्म वेगवेगळे नाही,,असे म्हणत असताना मायेत ब्रह्माचे अस्तित्व आहे पण ब्रह्म मात्र स्वतंत्र आहे हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे,,

त्रिगुणातमीका मायेच्या निर्मितीनंतर पंचमहाभूतांचे निर्मिती झाली,,ही निर्मिती सत्य तत्वपासूनच झाली,,ह्या निर्मितीचा क्रम पहिला तर एक तत्व महत्वाचे आहे की निर्मिती ही नेहमी सूक्ष्मकडून स्थूलकडे होत असते,,

सत तत्वपासून प्रथम आकाश,(आकाशाचा गुण शब्द) आकाशापासून वायू (गुण शब्द आणि स्पर्श),

त्यानंतर अग्नी(गुण शब्द,स्पर्श,आकार),

त्यानंतर पाणी(शब्द,स्पर्श,रुप आणि रस),

त्यानंतर पृथ्वी(शब्द,स्पर्श,रूप,रस,आणि गंध)

आता ही जी सूक्ष्म तत्व आहेत त्याला तंमात्रा म्हणतात,,आणि ह्या तंमात्रांचे स्थूलीकरण होते तेव्हा तो ज्ञानेंद्रियांचा विषय बनतो,,,

मित्रानो मायेच्या संयोगाने पंचमहाभुतांची निर्मिती झाली तरी यात मायेचे तीनही गुण अव्यक्त स्तरावर आहेत,,साम्यवस्थेत आहेत,,पण मायेची ही साम्यवस्था भंग पावली की खऱ्या अर्थाने पुढची निर्मितीची प्रक्रिया सुरू होते,,,

किती गहन आशय आहे ह्या शब्दात,,मित्रानो सुरवातीलाच आपण एक घडी बसवून घेतली आहे की जे त्याच्यापासून निर्माण झाले ते त्याच्या पासून वेगळे नसते,

,पाणी लाटेपासून वेगळे नाही,,

अलंकार सोन्यापासून वेगळे नाही,

घट मातीपासून वेगळा नाही,,,

मग पंचमहाभूते ब्रह्मपासून वेगळी कशी???

गणपती हे साक्षात ब्रह्म आहे,,,ही ऋषींची अनुभूती आहे,,,ह्यापुढची निर्मितीची ही प्रक्रिया पुढील भागात विस्तृत पणे पाहू,,,,,



# भाग–३१

# सर्वजगदिदंत्वत्तोजायते।





श्री गणेशाची उपासना त्याला जाणूनच करता येईल,,ह्या सलोकत आपण श्री गणेशाचे व्यापक प्रगटन पाहतो आहोत हे ब्रह्माचे प्रगटन आहे,,ब्रह्मापासून माया,मायेपासून क्रमाने आकाश वायू अग्नी जल आणि पृथ्वी ह्याची क्रमाने झालेली सूक्ष्मकडून स्थूलकडे असणारी उत्पत्ती ह्याचा विचार केला,,

माया ह्याचा पण अर्थ समजून घेणे गरजेचे वाटते,,करण आपण ह्या संकल्पनांना नाही समजून घेतले तर खूप गैरसमज होतात तत्वज्ञानाबाबत,,,,आणि ह्या गैरसमजामुळे मग त्यावर टीकाही होतात,,, वेदांतानी ही संकल्पना आम्हाला ठासून सांगितली,,,लक्षात घ्या माया ही वस्तू नाही ती जादू नाही,,किंवा ती खोटेपणाचे निदर्शन करते असेही नाही,,, आपण पाहतो की ह्या जगताचे कारण अपरिवर्तनीय आहे,,पण जेव्हा आपण प्रत्यक्ष जगाचा अनुभव घेतो तेथे मात्र सर्व परिवर्तनशील आहे,,मग अपरिवर्तनीयतेचे परिवर्तनशील जगात होणारे हे रूपांतर ह्याला काही तरी कारण असलेच पाहिजे,,कारण कार्य जे दिसते त्याच्यामागे करण असलेच पाहिजे,,ह्याचे वर्णन करण्यासाठी वेदांत माया ही संकल्पना स्वीकारतो,, माया ह्या शब्दाची फोड केली असता या–मा–सा माया,म्हणजेच जी नाही तरी भासते तिला माया म्हणतात,,,आणि ही संकल्पना जगताच्या दृष्टिकोनातून वापरण्याचे मुख्य कारण की

अपरिवर्तनीय सत्याच्या ठिकाणी कोणतेही कंपन नाही,ते स्वतंत्र आहे,ह्या अपरिवर्तनीय सत्याच्या भूमिकेतून जगत ही संकल्पना नाही पण आपण अनुभवतो ही माया,, ह्या जगताचे कारण सत्य तत्व असू शकेल,पण सत्याच्या भूमिकेतून विचार केल्यास जग हे त्याचा परिणाम असू शकत नाही,, असे बघा ,रस्त्यात पडलेल्या दोरीला जर मी साप समजत असेल तर,वास्तविक दोरी सर्पला निर्माण करू शकत नाही,तरीही आपल्याला सापाचा अनुभव येतो,,,दोरीच्या दृष्टीने विचार केला तर तेथे साप कधीच नव्हता,,दोरी हा सापाचा परिणाम नाही,,पण दोरीवर सापाचा अध्यारोप मात्र केला आहे,,,आता हे कशामुळे घडले )सत्यावर अज्ञानाचे आवरण होते,,,ही मायेची आवरणशक्ती होती) नाम रूप निर्माण करण्याची मायेची ही दुसरी शक्ती,,जिला आपण सृजन शक्ती म्हणतो,,ह्यालाच विक्षेप शक्ती असेही म्हणतात,,आणि ह्या शक्तीमुळे नामरूपात्मक प्रगट होणारे जग आपापली वासना घेऊन जन्माला येते,,,आणि ह्यालाच संतांनी म्हटले आहे ‘‘‘जन्म घेणे लागे, वासनेच्या संगे‘‘‘‘,आशा सत्य तत्वाचा मायेशी संयोग होतो तेव्हा त्याला आपण ईश्वर म्हणतो,,आणि म्हणूनच मायेला ईश्वराची सृजनशक्ती म्हणतात,हीच शक्ती अनादी काळापासून निर्मिती करीत आहे आणि अनंत काळापर्यंत करीत राहणार आहे,,,पण तिला स्वतंत्र अस्तित्व नाही,,,ती ब्राह्मश्रित आहे,,,ब्रह्म मात्र मायेवर अवलंबून नाही,,आणि म्हणूनच सत्याचा साक्षात्कार झाला की मायेचाही नाश होतो,,, मित्रानो तत्व ज्ञान चे खरे रूप न समजून घेता आपण त्यावर किती टीका करतो त्याचा अपभ्रंश करतो,,ह्या आपल्या मर्यादा आहेत तत्त्वज्ञानाच्या नाहीत,,त्याचे अर्थनिर्वाचन करण्यास आम्ही चूक करतो,ही खूप मोठी शोकांतिका आहे

## भाग–३२

# सर्वजगदिदंत्वत्तोजायते।




सर्व जगताचे कारण असणारा गणेश हा ब्रह्मस्वरूपच आहे आणि मायेच्या शक्तीच्या द्वारा तो संपूर्ण जगतात अभिव्यक्त होतो आहे ह्याची विवेचनाचा पुढचा टप्पा म्हणजे

ही ब्रह्माश्रित असणारी माया तीन गुणांनी युक्त आहे,,मायेपासून पंचमहाभूतांचे विशिष्ट क्रमाने निर्मिती झाली,,मायेच्या त्रिविध गुणांशी जेव्हा माया एकरूप होते तेव्हा पुढील निर्मिती होते,,,बघा ,, पहिला गुण आहे सत्व गुण ,पंच महाभूतांचे ह्या सत्वगुणांशी जेव्हा माया निगडित होते तेव्हा ज्ञानेंद्रियांचीं निर्मिती होते,,

आकाशाच्या सात्विक अंशापासून श्रोत्रेंद्रिय,,,

वायूच्या सात्विक अंशापासून स्पर्शइंद्रिय,,

अग्नीच्या सात्विक अंशापासून नेत्रइंद्रिये,,,

जलाच्या सात्विक अंशापासून रासानेंद्रिय,,

पृथ्वीच्या सात्विक अंशापासून घ्राणेंद्रिय ,,,,,

अशी ही सूक्ष्म ज्ञानेंद्रियांचीं उत्पत्ती आहे,,,आता सत्व गुणांशीच एकरूपता का म्हटली???ह्याचे महत्वाचे कारण सत्वगुणाचा मुख्य लक्षण ज्ञान आहे,,आणि ही पंचज्ञानेंद्रिय ही ज्ञान ग्रहण करण्याचे साधन आहे,,अगदी कोठेही जा,,,विश्वाच्या कितीही पुढारलेल्या देशात जा प्रत्येक ज्ञानेंद्रियाने जे काम दिले आहे तेच काम ते करतात,,,

आणि प्रत्येक महाभूतांचे एक स्वतंत्र गुण आहे तो ग्रहण करण्यासाठी ही ज्ञानेंद्रियांचीं निर्मिती आहे,,,पण ही सूक्ष्म इंद्रियांचे वर्णन आहे,,कानाचा कान डोळ्याचा डोळा,,म्हणजेच कानात ऐकण्याची असणारी शक्ती,,,ह्याचे वर्णन उपनिषदांनी खूप छान केले आहे,,,,, पंचमहाभूतपासून अजून एक महत्वाची निर्मिती म्हणजे आपले अंत:करण चतुष्टय,,म्हणजेच आपले मन बुद्धी चित्त अहंकार,,,पंचमहाभूतांचे समष्टी सात्विक अंशापासून ही निर्मिती आहे,, मनाची देवता चंद्र आहे कारण मन हे सतत बदलत राहते आणि चंद्राच्या कलाही बदलत असतात,,,

बुद्धी:-निश्चयाचा स्थितीतील विचार म्हणजे बुद्धी ,,,ह्या बुद्धीची देवता ब्रह्मा,,करण ब्रह्माला सर्वज्ञ मानले जाते,,

चित्त:-स्मरण हे चित्ताचे कार्य आहे,,ह्याची देवता विष्णू आहे,,करण विष्णूचे रूप शांत आहे,,आपण शांत असलो तरच विचार करू शकतो,,

अहंकार:-मी करता आहे हा विचार म्हणजे अहंकार,,ह्या अहंकाराची देवता रुद्र आहे कारण रुद्र संहारक आहे ,आपल्या अहंकार आपला नाश करतो पण अहंकाराचा नाश झाला तर दु:खाचा शेवट होतो,,, मित्रानो आपल्या लक्षात आले असेल की ब्रह्माश्रित मायेचे प्रगटन हे ब्रह्म तत्वांचे प्रगटन आहे,मायेच्या द्वारा त्रिगुणाचे पहिले प्रगटन म्हणजे पंचमहाभूते,,,

ब्रह्म+माया=ईश्वर ,,

असे जर असेल तर पंचमहाभूते ही खऱ्या अर्थाने ईश्वरच आहे,,किती व्यापक संकल्पना ईश्वराची???किती संकुचित करतो आपण त्याला,,,आता तो व्यक्तिपरत्वे देश काळ परत्वे बदलेल का????

भाग – ३३

# सर्वजगदिदंत्वत्तोजायते।




ह्या जगताची जी उत्पत्ती झाली ती कशी झाली ह्याचे विवेचन करीत असताना जे पिंडी ते ब्रह्मणडी असे का म्हटले जाते ह्याची प्रचिती आल्याशिवाय राहत नाही,,सत्य स्वरूपात असणारे ब्रह्म,ब्रह्माश्रित त्रिगुणातमीका माया,आणि पंचमहाभूतांचे क्रमाक्रमाने झालेली निर्मिती आणि सत्वगुणांचे प्रगटन म्हणजे सूक्ष्म ज्ञानेंद्रियांचे प्रगटन,आणि समष्टी सत्व गुणांपासून अंत:करण चतुष्टय इथपर्यंतची निर्मिती आपण पहिली,,,

आता ह्याच ब्रह्माश्रित मायेच्या राजसिक गुणांचे प्रगटन काय ह्याचा विचार करूया,,,मायेच्या सत्वगुणांचे प्रगटन हे सूक्ष्म इंद्रिय होती,,करण सत्व गुण ज्ञान निर्देशित करतो,,,राजोगुणाचे लक्षण कर्म आहे,,म्हणून जसे मायेच्या सत्वगुणांचे प्रगटन सूक्ष्म ज्ञानेंद्रिये होती,,आता त्याच मायेचे राजसिक प्रगटन कर्मेंद्रिय आहे,,मायेचा रजोगुण पंचमहाभूतांशी निगडित होऊन कर्मेंद्रिय प्रगट झालीत,,

आकाशाच्या राजस अंशापासून वाचेचे इंद्रिय,

वायूच्या राजस अंशापासून ग्रहणेंद्रिय,हात तयार झालेत,,

अग्नीच्या राजस गुणांपासून चालण्याचे इंद्रिय पाय तयार झाले,

जलाच्या राजस गुणांपासून जननेंद्रिय तयार झाली,,तर पृथ्वीच्या राजस गुणांपासून गुदद्वार निर्माण झाले,,

ही पंच कर्मेंद्रिय आपल्या शरीराला कार्यप्रवण करीत असतात,,,आणि ह्या इंद्रियांना कार्यप्रवण करणारे पंचप्राण असतात,शरीरांतर्गत आपल्या सगळ्या क्रियाना नियमित करणारे जे पाच प्रकारचे वायूविकार आहेत त्यांना पंचप्राण म्हणतात,,, आणि म्हणून पंचप्राणही मायेचे राजसिक प्रगटन आहे,,हे पंचप्राण पुढीलप्रमाणे आहे,,

प्राण:-श्वसन क्रिया नियमित करतो,,

अपान:-शरीरातील सर्व निरुपयोगी द्रव्यांचा त्याग होतो तो अपान वायू मुळे,,

व्यान:-रक्ताभिसरण करणे आणि आपल्या शरीरातील प्रत्येक पेशींचे पोषण करणे हे व्यान चे मुख्य कार्य,,


उदान:-शरीरातील सर्व उलट्या क्रिया उदानाकडून होतात,,शिंक उलटी,इ,,

समान:-आपण जे खातो ते पचविण्याची व त्याचे सात्मिकरण करणे हे समान चे कार्य आहे,,,

हे पंच प्राण आपले कार्य अव्याहतपणे करीत असतात अगदी आपण झोपलेलो असलो तरीही,,,पंचप्रणाचे सर्वात महत्वाचे कार्य ते स्थूलशरीर व सूक्ष्मशरीरास जोडतात,,त्यांना शक्ती प्रदान करतात,,आणि हे जेव्हा सक्षमतेने कार्य करतात तेव्हा शरीरही सुदृढ राहते,,,आणि त्यांचे कार्य बिघडले तर रोगी होते,,म्हणून तर प्राणायाम महत्वाचा आहे,,, आता ही गोष्ट आपल्या लक्षात आली असेल की कर्मेंद्रिय आणि पंचप्राण ही पंचमहाभूतांचे राजसिक अंशाचे व्यक्त रूप आहे,,,मित्रानो तत्त्वज्ञानाने हे विस्तृत वर्णन केले आहे ते आपण निश्चित समजून घ्यायला हवे,,,अत्यंत महत्वाचे आणि मानवी देहाची अध्यात्मिक अधिष्ठान व्यक्त करणारे,,,,

# भाग – ३४

# सर्वजगदिदंत्वत्तोजायते।




श्री गणेश तुझ्यापासून साऱ्या जगताची निर्मिती झाली''' ही जी ऋषींची अनुभूती आहे,,आणि ह्या अनुभूतीचेच वर्णन आपण बघतोय,,

पंचमहाभूतांचे निर्मिती ही मायेच्या त्रिगुण गुणांसकट आहे,,पंचमहाभूतांचे सात्विक अभिव्यक्ती ही सूक्ष्म ज्ञानेंद्रिये,,समष्टी सात्विक गुणांपासून अंत:करण चतुष्टय,,राजसिक अभिव्यक्ती पंचज्ञानेंद्रिये व पंचप्राण,,पण आता ह्याच पंचमहाभूतांचे तामसिक प्रगटन काय आहे हे आपण पाहूया,,,

तमोगुणाचे लक्षण जडत्व हे आहे,,जड ह्याचा अर्थ जे स्वत: ही जाणत नाही व जे दुसर्यालाही प्रकाशित करीत नाही,,स्थूल शरीराची निर्मिती हे मुख्यत्वे पंचमहाभूतांचे तामसिक अभिव्यक्ती आहे,,स्थूल शरीराच्या ह्या निर्मितीत प्रत्येक महाभूतांचे ५० टक्के व इतर महाभूतांचे १२.५टक्के असे गुण असतात,,आणि ह्या मिश्रणाने स्थूल देहाची निर्मिती होते,,आणि म्हणून आपण म्हणतो की हा देह पंचमहाभूतात्मक आहे,,

आता स्थूल देह कोणताही असो त्यात पंचमहाभूतांचे गुणधर्म असतातच,,विज्ञान कितीही पुढे गेले तर ह्यातील एकही घटक कमी करू शकत नाही किंवा वाढवू शकत नाही,,पण हे स्थूल शरीर सूक्ष्म

शरीराशिवाय कामही करू शकत नाही,,आणि सूक्ष्म शरीर जेव्हा स्थूल शरीरास सोडून जाते तेव्हा शरीर विघटित होते,,आणि पुनश्च पंचमहाभूतात विलीन होते,,,

आता आणखी एक महत्वाचा विचार की जे माझ्या शरीरात पंचमहाभूतांचे अस्तित्व आहे तसेच चराचर सृष्टीच्या प्रत्येक स्थूल देहात ते तेवढ्याच टक्क्यामध्ये आहे,,मग आता कोणते शरीर माझ्यापेक्षा श्रेष्ठ आहे??सगळे भेद हे वरवरचेच नाही का???तत्व ज्ञानाचा हा भाग कधीच कसा कुणी पुढे आणला नाही ह्याचे मला नेहमीच आश्चर्य वाटते,,करण हे तत्वज्ञान जर पुढे आले असते आणि हेच मूल्यसमाजात रुजले असते तर कदाचित आज समाजात जो जाती धर्म संप्रदाय उच्चनीच हा भेदभाव जाणवतो जो फोफावला आहे तो निर्माणच झाला नसता,,,वैश्विक एकात्मतेची ह्यापेक्षा चांगली कोणती उपपत्ती असू शकते?? आता त्याच सर्वव्यापक ब्रह्म म्हणजेच मी आणि म्हणजेच श्री गणेश असे म्हणत असताना व्यष्टी म्हणून मी आणि समष्टी म्हणून श्रीगणेश,,ब्रह्माचे प्रगटन असणारा श्री गणेश आणि आत्म्याचे प्रगटन असणारा मी,,ह्यात भेद राहिलंच कसा,,,करण एक नियम आहे की '''पूर्णपासून अंश हा कधीही भिन्न नसतो'''',,आणि म्हणूनच व्यष्टी सूक्ष्म शरीर हे समष्टी सूक्ष्म तत्वपासून बनल्याने ते भिन्न नाही,,, व्यष्टी स्थूल शरीर हे समष्टी स्थूल तत्वपासून बनल्या मुळे ते समष्टीचाच अंश आहे,,

तसेच समष्टी स्थूल आणि सूक्ष्म तत्वांचे मूळ कारण शुद्ध सत्य तत्व आहे आणि ते व्यष्टीतही विद्यमान आहे,,,

मित्रानो सहस्तित्वाची इतका चांगला सिद्धांत आपणास कोठे पहावयास मिळेल??ऐक्याचा वैश्विक एकात्मतेचा एवढा सुंदर सिद्धांत कुठे बघावयास मिळेल,,,

पण हा भेदाभेद निर्माण झाला आहे हे नक्की ,,,श्री गणेश अथर्वशीर्षाच्या निमित्ताने हा भेद का निर्माण झाला हे पाहिल्याशिवाय ह्या मुद्यास पूर्णविराम लागणार नाही,,,पुढच्या भागात,,,,

## भाग – ३५

# सर्व जगदि दंत्वत्तोजायते।




सहस्तित्वाची वैश्विक ऐक्याची एक सुंदर अभिव्यक्ती आपण ह्या आधीच्या विवेचनात पहिली आहे,,पण जीवांमध्ये होणारे भेद आणि आपण व ईश्वर ह्यांच्यात भेद का असतात ह्याचेही महत्वाचे कारण आपण जाणून घ्यायला हवे,,करण भेदाचे मूळ कळणेही महत्वाचे आहे,,

मित्रानो ,जीव हा शब्द उच्चारल्यावर आपल्या समोर काय येते? माझा जीव आधी,,मग बाकीच्यांचे जीव,,माझा जीव महत्वाचा,,,पण मित्रानो जीव म्हणजे काय माहित आहे??अज्ञानाच्या उपाधीने युक्त असा आत्मा त्याला जीव म्हणतात,,आता सांगा प्रत्येकाच्या दृष्टीने विचार केल्यास अज्ञान एकाच आहे,,स्वत: बाबतचे,,शिवाय अज्ञान ही संकल्पना आहे ही उपाधी आहे, तिला सापेक्षता नाही,,त्यामुळे जे तत्व जी उपाधी निरपेक्ष आहे त्यात वैविध्य कसे??

दुसरी महत्त्वाची गोष्ट की आत्मा नावाची गोष्ट ही जड वस्तूच्या स्वरूपात विद्यमान नाही,,ते तत्व आहे,,आणि हे वैश्विक तत्व आहे,,शिवाय सत्य तत्व आहे ,,एक तत्वांचा दुसऱ्या उपाधीशी संयोग

झाला आणि आत्मा अज्ञानाच्या उपाधीने युक्त झाला,,आणि ह्याला आम्ही जीव संबोधले,,आणि हा जीव स्थूल शरीराशी एकरूप झाला,,

आता विचार करा की जीव तत्वात भिन्नता नाही,,प्रत्येकाच्या जीवतत्व हे अज्ञानाची उपाधी आणि आत्मतत्त्व ह्यानेच बनला आहे मग नामरूपात्मक भेद असला तरी जीव ह्या स्तरावर भेद कसा कारण हा जीव ब्राह्मतत्वचेच प्रगटन आहे,,,म्हणून एक लक्षात ठेवायला हवे की शरीरे जरी भिन्न असली म्हणजेच माणसाचे असेल पशूंचे असेल पक्षांचे असेल तरी जीव तत्वांचे आत्मतत्वाचे ब्राह्मतत्वचे ते प्रगटन आहे किती छान!!

आता दुसरा मुद्दा असा येतो की हा जो जीव आहे तो स्वतः ला ईश्वरापासून भिन्न मानतो,,मी आणि ईश्वर ह्यात आपण फरक समजतो,,पण हा समज होण्याचे महत्वाचे कारण उपाधी आहे,,जीवाला अज्ञानाची उपाधी आहे,,आणि ईश्वराची परिभाषा केली तर मायेच्या उपाधीने युक्त आशा आत्मतत्वाला ईश्वर म्हणतात,,आता हाच ईश्वर म्हणजे जगताचे निर्मितीचे कारण आहे,,

तो मायेच्या उपाधीने युक्त आहे पण माया त्याच्यावर प्रभाव टाकू शकत नाही आणि म्हणूनच त्याला मायापती असेही म्हटले जाते,,

आता हेच अनंत सत्य तत्व जे मायेच्या उपाधीने ईश्वर रूपात प्रगट झाले तेच अविद्येच्या उपाधीने युक्त होऊन जीव म्हणून प्रगट झाले,,आता तत्वाच्या स्तरावर भेद राहिलाच कुठे,,,

आता मायेचे गुण सात्विक आहे तर अविद्येचे स्वरूप तामसिक आणि म्हणून ते जीवाला बंधनात टाकते,,करण हा जीव अज्ञानाच्या उपाधीने स्वतः चे सत्यस्वरूप विसरतो आणि स्वतः ला संकुचित समजतो,,फक्त स्थूल शरीराशी तादात्म्य पावतो आणि स्वतः ला

असहाय समजतो,,

सत्यातत्व(ब्राह्मतत्व,आत्मतत्त्व)+सत्वगुणमाया(उपाधी)

=ईश्वर,

सत्यतत्व(ब्राह्मतत्व,आत्मतत्त्व)+अविद्या(उपाधी)=जीव,,,

आता ह्या सूत्रामध्ये तुमच्या लक्षात येईल की केवळ उपाधीमुळे हा भेद अन्यथा तत्वाच्या स्तरावर सर्व समान,,,,

मित्रानो आता जीवांमध्ये भेद तर नाहीच पण जीव आणि ईश्वरातही भेद नाही,,हेच जीव शिव ऐक्य आहे,,,आता हे सर्व ज्या ब्राह्मतत्वचे प्रगटन आहे तेच श्री गणेशाचे प्रगटन आहे आणि ते तत्व मी आहे,,,

मित्रानो आता ही फक्त ऋषींची अनुभूती नाही आता ही माझी अनुभूती ,,आपली अनुभूती आहे,,सर्वांची अनुभूती आहे,,,किती छान,,,



## भाग – ३६

# सर्व जगदिदं त्वत्तो जायते।
# सर्व जगदिदं त्वत्त स्तिष्ठति ।




श्री गणपती अथर्वशीर्ष चे चिंतन करीत असताना श्री गणेशाचे प्रगटन आपण पाहिले आणि ह्या प्रगटनातून तत त्वम असि आणि अयं आत्मा ब्रह्म ह्या महावाक्यांचा मागोवा घेताना व्यापक असणारे ब्रह्मतत्व तेच मी आहे ही अनुभूती महत्वाची आहे,,

हे संपूर्ण जगत तुझ्यापासून निर्माण झाले असे जी ऋषींची अनुभूती आहे त्यानुरूप ह्या विश्वाच्या निर्मितीमगिल २४ तत्व आणि त्याचे प्रगटीकरण ह्याचे अत्यंत महत्वाचे चिंतन आपण पाहिले,,,

सर्वम जगदिदं त्वत्तस्तिष्ठती:–मित्रानो जे ज्याच्या पासून निर्माण झाले असते ते त्याच्यापासून वेगळे नाही हा सिद्धांत आहे,,आणि म्हणूनच स्थितीच्या अवस्थेत कार्य हे कारणापासून वेगळे नाही,,पण हा कार्य करण संबंध नाही,,जगताच्या ज्या तीन अवस्था सांगण्यात येतात त्यातील ही स्थितीची अवस्था,,

संपूर्ण जगत हे परमात्म्याच्या मायेपासून उत्पन्न झाले,,माया ही परमेश्वरापासून भिन्न नाही ,,आणि म्हणून ह्याच माये पासून निर्माण झालेले जगत परमेश्वरापासून भिन्न नाही,,त्याच्याच आधारे ह्या

जगताचे संगोपन होत आहे,,ही स्थितीची अवस्था आहे,,

मित्रानो आपल्या व्यवहारातील जरी उदा घेतले तर आपल्या लक्षात येईल की समुद्रातच लाटांची उत्पत्ती होते,,समुद्रातच त्या खेळतात आणि समुद्रातच त्यांचा लायही होता,,


सर्वम जगदिदं त्वयी लयमेष्यति:–ह्या जगताचा लायही तुझ्यातच होतो ही जी अनुभूती आहे ही विलक्षण आहे,,संपूर्ण नामरूपाच्या पसारा जेव्हा अव्यकतात विलीन होतो त्याला प्रलय म्हणतात,,अव्यक्ततून मायेच्या द्वारा जी जगताची निर्मिती झाली ही निर्मिती नामरूपात्मक आहे,,आणि ही क्रमाक्रमाने विचार केला तर आकाश वायू अग्नी जल आणि पृथ्वी आशा क्रमाने आहे पण लयाची प्रक्रिया स्थूलकडून सूक्ष्मकडे नेणारी आहे,,आणि प्रलयाच्या वेळी हे नामरूपात्मक जगत तात्पुरते लोप पावते व सृजन काळी ते पुन्हा निर्माण होते,,पण सूक्ष्मकडे वाटचाल केली असता आपल्या लक्षात येईल की अव्यक्त ब्राह्मपर्यंत ची ही वाटचाल आहे,,

ओंकाराचा स्वरूपातील तीन मात्रा अकार, उकार,मकार, ह्या उत्पत्ती स्थिती व लय दर्शवितात,,,आपण तीन अवस्थेचा विचार केल्यास जागृतीत सृजन आहे,स्वप्नवस्थेत सर्व जगत स्थिरावले आहे,जे जागृतीत अनुभवले त्याचा पुनरप्रत्यय आहे,,सुषुप्तीत सर्व नामरूपात्मक जगताचा लय झालेला असतो,,हा मुद्दा विस्तृतपणे येणारच आहे,,,किती सुंदर अनुभूती आहे ही,,,

मला हा प्रश्न नेहमी पडतो की इतके सुंदर सार्वभौम तत्वज्ञान समाजापर्यंत ज्या पद्धतीने पोहोचायला हवे होते ते तसे का पोहोचले नाही??वास्तविक पाहता हे सार्वभौम तत्वज्ञान आहे,,,लक्षात घ्या धर्म नावाच्या तत्वाच्या दोन बाजू असतात,,एक असते ज्ञानाची आणि दुसरी असते कर्माची,,ज्ञानाशिवाय कर्म होत असेल तर तेथे गोंधळ

निर्माण होतो आणि मूळ तत्वज्ञान बाजूला पडते,,आणि नुसतं ज्ञान झाले आणि त्यानुसार आचरण नसेल तर तेथे प्रचंड अहंकार निर्माण होतो,,आणि ह्या दोन्ही परिस्थितीत धर्म संकल्पनेची हानी होते,,,ही तत्व जाणून घेणे त्याचा अनुभव घेणे ही बाब महत्वाची आहे,,असो,,हा मुद्दा मी वेळोवेळी चर्चेला आणणार आहे,,,

असो,,जीपण उत्पत्ती स्थिती आणि लयाच्या पलीकडेही श्री गणेशाचे अस्तित्व आहे,,कसे,,पुढील भागात,,



# भाग – ३७

## सर्व जगदिद ंत्वयिलयमेष्यति।।
## सर्व जगदिदं त्वयि प्रत्येति।।




श्री गणेशाचे प्रगटन पाहत असताना संपूर्ण जगताची निर्मिती ही त्याचीच आहे,,संपूर्ण जगताचे संगोपन करणाराही तोच आणि जगताचा लय ही त्याच्या ठिकाणी होतो,,आता ह्याठिकाणी

सर्वम जगदिदं त्वयी प्रत्येयिती::असे म्हणत असताना ह्या जगतात चराचर सृष्टीमध्ये फक्त तूच व्यापून राहिला आहेस,,संतांची पण हीच अनुभूती होती,,‘‘‘हरी भरला घनदाट चोहीकडे‘‘‘ही ती अनुभूती आहे,,ओंकाराच्या आधाराने आपण तिन्ही अवस्थांची प्रचिती घेतली ज्यात फक्त गणेशाचेच प्रगटन आहे,,उत्पत्ती स्थिती आणि लय ह्या अवस्थेत तर श्री गणेशाचे प्रगटन आहेच पण प्रलयानंतर मायेचा लय हा पुनः ब्रह्मतत्वात होतो ही तुर्या वस्था आहे,,ही पूर्णावस्थेची अवस्था आहे,,आणि हीच चैतन्याची अवस्था आहे,,हे खरे शुद्ध स्वरूप आहे,,हे श्री गणेशाचे रूप आहे तेच माझेही आहे,,ह्या शुद्ध स्वरूपलाच आपण म्हणतो,,

ह्या ठिकाणी उत्पत्ती स्थिती लयाची स्थिती नाही,इथे कार्यकारण भेद नाही,येथे मायेचे देखील विलीनीकरण शुद्ध ब्रह्मात झाले आहे,,,मित्रानो ओंकाराच्या उच्चार करताना शेवटच्या हमिंग साउंड नंतर जी निरव शांतता आहे ती तुर्या वस्था आहे,,एकदा ओंकार म्हणून


झाला आणि दुसर्यावेळी म्हणायचं आहे त्यामधील जी शांत अवस्था आहे ती देखील श्री गणेशानेच व्यापली आहे,,,मित्रानो ही निरव शांततेची प्रचिती आपल्याला सगळ्यांना घ्यायची आहे न,,मग मन शांत ठेवण्याचा प्रयत्न करा,,कारण जेवढे मन शांत असेल तेवढेच शुद्ध सत्वाचे प्रतिबिंब त्यात दिसेल,,,

त्वम भूमीरापो नलो निलो नभ:::–हे संपूर्ण पंचमहाभूतात्मक जगात ही तुझीच अभिव्यक्ती आहे,,कारण अव्यक्त चैतन्य मायेशी एकरूप झाले ,,,ही माया त्रिगुणातमीका आहे,,ह्या मायेपासून पंचमहाभूतांची क्रमाक्रमाने आकाश वायू,अग्नी,जल पृथ्वी, प्रत्यक्ष प्रगट होण्यापूर्वी तन्मत्राच्या रुपात म्हणजेच गुणरूप ने कसे प्रगट झाले आणि मग त्यापासून स्थूल जगताची प्रगटीकरण झाले ह्याचे विस्तृत विवेचन ह्यापूर्वी आपण पाहिले आहे,,,

आता एक पुन्हा अशी घडी पक्की बसवून घ्यावी लागेल की जे त्याच्यापासून निर्माण झाले ते त्याच्यापासून भिन्न नसते,,,मग अव्यक्त ब्रह्मापासून निर्माण झालेले संपूर्ण जगत त्याच्यापासून वेगळे कसे असेल???आपण तरी भिन्न आहोत का??जे त्याचे स्वरूप आहे तेच माझे आहे,,,संतांना ही दृष्टी प्राप्त झाली असते,पण आम्हाला अज्ञानामुळे ते कळत नाही आणि मग सुरू होतो तो भेदाभेद,,,,,समुद्रात जशा अनेक लाटा येतात आपणही असेच विभिन्न लाटा आहोत,,,पण आपले मूळ स्वरूप लाटांनी विसरू नये तसेच आपलेही मूळ स्वरूप  सतचितआनंद स्वरूप आहे हे आपण विसरू नये,,,,,

भाग-३८

# त्वं चत्वारि वाक्पदानी।।५।।




श्री गणेशाचे प्रगटन पाहत असताना त्याची व्यापकता सर्व समावेशकता आपल्या लक्षात येते,,

त्वम चत्वरी वाक पदानि:-श्री गणेश हे वाणीचे प्रगटन आहे,,असे म्हणत असताना वाणीचे प्रगटन चार प्रकारचे आहे,,नमू शारदा मूळ चत्वर वाचा,,असे शरदेचेही रूप सांगितले आहे,,मग प्रश्न पडतो की ह्या चार वाचा कोणत्या??

परावाणी:-शब्द एकदम प्रगट होत नाहीत ते प्रगट होण्यापूर्वी आपल्या स्वरूपाशी एकरूप असतात,,जसे मातीचा घडा बनविण्यापूर्वी तो मातीशी एकरूप असतो,,,ही परावाणी आहे,,ही अप्रगट आहे पण ती ब्रह्माशी एकरूप आहे,,,

पष्यांती:-स्वरूपाशी एकरूप असणारी वाणी ही विचारांच्या स्तरावर येते आणि ज्याच्या विचारांच्या स्तरावर येते तो तिला पाहू शकतो,,

मध्यमा:-पारा वाणी पष्यती स्तरावर येते आपण आपले विचार जाणू शकतो पण त्यांना प्रगट करण्यासाठी जो शब्द आहे तो आपल्याला आतल्या आत सापडला पाहिजे,,ही उपलब्धतेच्या जी

अवस्था आहे तिला मध्यमा असे म्हणतात,,

वैखरी:–आता माध्यमेच्या स्तरावर उपलब्ध असणारे शब्द हे आपल्या वाचेतून बाहेर पडतात ही वैखरी म्हणजेच शब्दाचे प्रत्यक्ष प्रगटीकरण,,,

हे सूक्ष्मपासून स्थूलपर्यंत वाणीचे प्रगटन आहे,अगदी व्यवहारातील उदा,घेतले तर आपण घर बांधायचे ठरवतो ते फक्त विचार रूपाने,,,मग ते कसे असावे ह्याचा विचार करतो,,ते कसे असावे ह्यासाठी आपण विविध शब्द बांधणी करतो,आणि मग प्रत्यक्ष ते प्रगट करतो,,

ह्यातील परावणी व पष्यांती ही अव्यक्त सूक्ष्म आहे त्यानंतर ती माध्यमेत व वैखरीत प्रगट स्तरावर येते,,

परावणी ही तुर्या वस्था आहे कारण ह्या ठिकाणी शब्द प्रगट होण्यापूर्वी ते परतत्वाशी एकरूप असतात अव्यक्त असतात ,,,पष्यांती वाणी ही सुषुप्ती अवस्था आहे,अव्यक्त अवस्था आहे,,मध्यमा ही स्वप्न अवस्था आहे ह्याठिकाणी शब्द आपण पाहू शकतो,,आणि वैखरी ही जागृतावस्था आहे ही स्थूल आहे,

संपूर्ण जगत हे अव्यक्त ब्रह्माचे प्रगटन आहे,,वाणी ही ओंकार स्वरूप आहे,,आणि गणपतीचे रूप ओंकार स्वरूप आहे,,,ओंकार प्रधान रूप गणेशाचे,,,,असे आपण का म्हणतो हे आपल्या लक्षात आले असेलच,,, आता साधनेत वाणीचा स्थूलकडून सूक्ष्मकडे प्रवास असतो,,,आणि वैखरी ही पुन्हा परावणीत लय पावते,,

गणपतीचे प्रगटन ह्या पाचव्या श्लोकात आपण पाहिले आणि एक अनुभव आला की तत्वाच्या स्तरावर मी आणि गणेश आमचे ऐक्याच आहे,,शास्त्राने तत त्वम आसि हे निर्देशित केले आणिअयं आत्मा ब्रह्म ही माझी अनुभूती आहे


# भाग – ३९

**त्वं गुणयत्रयातीत:। त्वम वस्थात्रयातीत:। त्वंदेहत्रयातीत: त्वं कालत्रयातीत:। त्वं मूलाधारस्थितो। सि़नित्यं। त्वं शक्तित्रयात्मक:।।**

**त्वां योगिनो ध्यायंतिनित्यम। त्वं शक्तित्रयात्मक:।।**

**त्वांयोगिनोध्यायंतिनित्यं। त्वं ब्रह्मा त्वं विष्णु स्त्वंरुद्रस्त्वंइन्द्रस्त्वंअग्निस्त्वं।**

**वायुस्त्वं सूर्यस्त्वं चंद्रमास्त्वं ब्रह्मभूर्भुव: स्वरोम**




श्री गणपती अथर्वशीर्ष पाहत असताना गणेशाचे प्रगटन आपण पाहिले,,अव्यक्तपासून व्यक्तपर्यंत ,सूक्ष्मपासून स्थूलपर्यंत,,ह्या संपूर्ण सृष्टीक्रमच आपण पहिला,,पण हे सर्व नाम रूप उपाधीयुक्त जे जगत आहे ह्याच्या विरहित गणपतीचे रूप आहे,,,हे उपाधी विरहित रूप कसे आहे ह्याची वर्णन ह्या सहाव्या श्लोकात दिले आहे,,

त्वम गुण त्रयातीत: :– हे गणेश तू तीन गुणांच्या अतीत आहेस,,हा शब्दश: अर्थ झाला,,आता आपण ह्यापूर्वी पाहिले की अव्यक्त ब्रह्माशी एकरूप झालेली माया (प्रकृती अविद्या) जी त्रिगुण युक्त आहे ,,ह्यालाच पर्यायी शब्द व्यवहाराच्या स्तरावर जिवाच्या संदर्भात अज्ञान वासना असे म्हणतात आणि जेव्हा आपण म्हणतो ''''जन्म घेणे लागे वासनेच्या संगे,'''',,

तेव्हा ही वासना म्हणजेच प्रकृती म्हणजेच माया,,आणि ती तीन

गुणांनी युक्त आहे,,माणूसही ह्याच तीन गुणांनी युक्त असतो,,हे तीन गुण सत्व रज आणि तम ह्या तीन गुणांचे पंचमहाभूतांशी तादात्म्य आणि त्यापासून निर्माण झालेले हे सर्व जगत,,हे सर्व निरूपण आपण पाहिले आहे,,

पण ह्याठिकाणी एक महत्वाची बाब आपल्याला ही लक्षात ठेवायची आहे की अव्यक्त असिमीत परमात्म तत्व जेव्हा मायेशी एकरूप झाले तेव्हा ते सीमित झाले असे आपणास भासात्मक वाटते,,आणि माया तत्व हे जड तत्व आहे ते स्वयं प्रकाशित नाही आणि ह्या जड तत्वपासून निर्माण झालेले जगत हे ही जड आहे हे निश्चित,,पण ते आपल्याला चेतन स्वरूप वाटते करण मायेला जे चेतन तत्व प्राप्त झाले त्याचाच आविष्कार ह्या जगतात आपणास बघावयास मिळतो,,,

त्रिगुण हे मायेचे स्वरूप आहे,,पण त्यापलीकडे असणारे परमात्म तत्वात हे कोणतेच गुणांचे अस्तित्व नाही,,,ते निरतिशय शांत आहे,,,आणि जेव्हा आपण गणपतीचा अर्थ पहिला तेव्हा गणांनाम पती म्हणजेच गणांचा जो पती आहे,,गणांचा पती म्हणजेच जे संपूर्ण जड जगत आहे त्याचे अधिष्ठान जो आहे तो म्हणजेच गणपती,,,

मित्रानो माझ्यात पण तिन्ही गुणांचे अस्तित्व असते ,,जेव्हा मी शांत असतो तेव्हा मी सत्व गुणात असतो ,,जेव्हा मी रज गुणात असतो तेव्हा मी कर्मप्रधान असतो,,जेव्हा मी निद्रा आळस ह्या गुणात असतो तेव्हा मी तमो गुणात असतो,,,ह्याचे महत्वाचे कारण आपण जीवभावत असतो ,,पण आत्मभावात हे तिन्ही गुण नाहीत,,,ही ब्रह्म दृष्टी आहे,,गणपति अथर्वशीर्ष हे जीवदृष्टिकोनातून ब्रह्मदृष्टिकोनाकडे नेणारा साधना मार्ग आहे,,,ह्याबाबत चे अधिक विवेचन पुढील भागात,,,,

## भाग-४०

त्वं गुणयत्रयातीत:। त्वम वस्थात्रयातीत:। त्वंदेहत्रयातीत: त्वं कालत्रयातीत:। त्वं मूलाधारस्थितो। सिनित्यं। त्वं शक्तित्रयात्मक:।।
त्वां योगिनो ध्यायंतिनित्यम। त्वं शक्तित्रयात्मक:।।
त्वांयोगिनोध्यायंतिनित्यं। त्वं ब्रह्मा त्वं विष्णु
स्त्वंरुद्रस्त्वंइन्द्रस्त्वंअग्निस्त्वं।
वायुस्त्वं सूर्यस्त्वं चंद्रमास्त्वं ब्रह्मभूर्भुव: स्वरोम




श्री गणपती अथर्वशीर्ष हे जीवदृष्टिकोणातून आत्मदृष्टिकोणकडे नेणारा मार्ग आहे,,संपूर्ण जगात हे प्राकृतिक प्रगटन आहे,,प्रकृती त्रिगुणत्मिक आहे,,पण ह्या प्रकृतीला प्रकाशित करणारे तत्व स्थिर आहे आणि तेच खरे माझे मूळ आहे हा विषय महत्वाचा ठरतो,,जी त्रिगुणत्मिक प्रकृती आहे तिच्यामुळे जीवाला बंधन असते,,पण परमात्मा ह्यापासून भिन्न आहे,,गीतेच्या १४ व्या अध्यायात याचे वर्णन केलेले आपणास आढळते,,पण ब्रह्म तत्व हे ह्या त्रिगुणाच्या अतीत आहे आणि तेच गणपतीचे रूप आहे,,

मित्रानो आपण जीवभावात आहोत असे म्हणत असताना,आपल्यातही तीन गुण प्रबळ असतात,कधी मी शांत असतो,कधी मी क्रियाशील असतो तर कधी मी अलस्य निद्रा क्रोध ह्यात असतो,,पण माझे मूळ काय आहे हा विचार करून पाहूया,,अगदी

माझ्या कुटुंबाची मी वंशवेल तयार करतो आणि मूळ पुरुषापर्यंत पोहोचतो अगदी तसेच आपण आपल्या मुळापर्यंत पोहोचलो तर

मी

माझादेह–

स्थूल देह–सूक्ष्म देह–

ह्याला प्रकाशित करणारे माझे सूक्ष्म ज्ञानेंद्रिय,,

त्याला प्रकाशित करणारे पंचमहाभूते–

पंच महाभूताला प्रकाशित करणारी त्रिगुणात्मिक माया–मायेला प्रकाशित करणारे ब्राह्मतत्व,,हे स्वयंप्रकाशित आहे,,,

१.ब्राह्मतत्व(माझ्या वंशाचे मूळ)

२.त्रिगुणातमीका माया

३.पंचमहाभूते(त्रिगुणात्मक)

४.सूक्ष्म ज्ञानेंद्रिये(सत्वगुणप्रधान)

५.मन बुद्धी चित्त अहंकार(सत्वगुणप्रधान)

६.पंचप्राण(राजोगुणप्रधान)

७.पाच कर्मेंद्रिये(राजोगुणप्रधान)

८.स्थूल देह(तमोगुणप्रधान)

(ह्यालाच गीतेत म्हटले ऊर्ध्व मूलं अध शाखा:) ही जीवाची वंशवेल आहे,,,आणि मुख्य म्हणजे प्रत्येक जीवाची आहे,,,ज्यांना ज्यांना आम्ही सजीव म्हणतो त्या सर्व जीवांची सार्वभौम वंशवेल,,,किती छान)

मग आता आपणच विचार करायचा की मूलतः मी कोण आहे??माझे मूळ स्वरूप काय आहे? उत्तर प्रत्येकाजवळ आहे,,,जे चेतन तत्व आहे त्याचाच प्रकाश म्हणजे मी आहे,,,सूर्याचा कवडसा मी आहे,,,असे अनेक कवडसे जगात आपल्याला दिसतात,,आकार

वेगवेगळे स्थळ वेगवेगळे पण त्यांना प्रकाशित करणारा सूर्य वेगळा नाही,,हे एव्हढे जरी लक्षात आले तरी जीवभावात असणारा मी हा मुळत: चैतन्य रूप आहे ब्रह्म रूप आहे हा अखंड भाव असणे आवश्यक आहे,,ही साधना प्रणाली आहे,,

मित्रानो ह्या दृष्टिकोनातून ब्रह्म सत्य असे आपण म्हणतो,,आपल्या तत्व ज्ञानाने ही शाश्वत तत्व आपल्याला दिले,,पण जसे दिले तसे आम्ही स्वीकारले नाही हा आपला दोष आहे, त्या ज्ञानाचा नाही,,पण ही ज्ञानाची गंगा आपल्या जवळ आहे पण तहान आपल्याला लागलीच नाही तर ,,,असो ,,म्हणून श्री गणपती अथर्वशीर्ष हे व्यक्तीला स्वरूप ज्ञान प्राप्त करून देणारी साधनाप्रणाली आहे



त्वं गुणयत्रयातीत:। त्वम वस्थात्रयातीत:। त्वंदेहत्रयातीत: त्वं कालत्रयातीत:। त्वं मूलाधारस्थितो। सिनित्यं। त्वं शक्तित्रयात्मक:।।
त्वां योगिनो ध्यायंतिनित्यम। त्वं शक्तित्रयात्मक:।।
त्वांयोगिनोध्यायंतिनित्यं। त्वं ब्रह्मा त्वं विष्णु
स्त्वंरुद्रस्त्वंइन्द्रस्त्वंअग्निस्त्वं।
वायुस्त्वं सूर्यस्त्वं चंद्रमास्त्वं ब्रह्मभूर्भुव: स्वरोम




श्री गणपती अथर्वशीर्ष पाहत असताना गणपतीचे उपाधिरहित स्वरूप आपण पाहत आहोत,,गणपती हा त्रिगुणतीत आहे तीन गुणांच्या पलीकडे आहे,,

त्वम देहत्रयातीत:::–तू तीन देहाच्या पलीकडे आहेस,,देह ही उपाधी आहे हे पटायला वेळ लागतो,,पण असे पहा देह हे साधन आपल्याला मिळाले आहे,, आपल्याला कायम असे वाटते की मी म्हणजे माझा स्थूल देह ,,आणि त्या स्थूल देहाच्या अनुषंगिक माझे सर्व व्यवहार चालत असतात,,आणि त्या स्थूल देहाच्या दृष्टिकोनातूनच मी माझ्याकडे पाहते,, पण ह्या स्थूल देहाचे व्यवहार ज्याच्या आधारे चालतात तो आहे सूक्ष्म देह,,ज्यात मन आणि बुद्धी अंत:करण चतुष्टय ज्याला आम्ही मन बुद्धी चित्त अहंकार समाविष्ट आहे,,पंचप्राण ज्ञानेंद्रिय कर्मेंद्रिय ही ह्या सूक्ष्म देहात समाविष्ट आहे,हे भोगाचे साधन आहे , पण ह्या स्थूल देहाला सूक्ष्म देहाला प्रकाशित करणारे जे आत्मतत्त्व आहे ते मात्र उपाधी रहित आहे,,त्याला स्थूल देह व सूक्ष्म देहाची

उपाधी नाही,,त्याला आकार रंग रूप नाही,,ते ह्या सर्व उपाधी पेक्षा भिन्न आहे,,,ह्या तीन शरीराबाबत अजून विवेचन बघूया

स्थूल देह:-हे इंद्रियांनि युक्त इंद्रियांनी जाणले जाते,अन्नाने तो पुष्ट होतो,मानव जन्म हा सर्व जन्मात श्रेष्ठ मानला आहे,करण ह्याच देहात आपल्या पूर्ण विकासाची व्यवस्था आहे,,ह्या स्थूल देहाला

अस्ति :-आईच्या गर्भात आपले अस्तित्व आईला जाणवते जायती:-आईच्या गर्भातून जगताचा अनुभव घेणासाठी मी येतो

वर्धती:-अन्नाच्या पोषणाने शरीर वाढते

विपरिणमते :-काळानुसार शरीर परिपक्व होते व किशोर तारुण्य वार्धक्य ह्या अवस्था प्राप्त करते.अपक्षीयती:-कालांतराने अवयव क्षीण होतात,व कार्यशक्ती क्षीण होते,, विनश्याति:- शेवटी हे शरीर नाश पावते विघटित होते,व आपल्या मूळ तत्वात विलीन होते,,,शरीराचे हे सहा विकार आहे,, पण मी जो विकारांचा साक्षी आहे तो ह्यापासून भिन्न आहे,,,ह्या देहाचा साक्षी जो आत्मा आहे त्याला जन्म मरण ह्या उपाधी नाहीत,,,

सूक्ष्मदेह:-इंद्रियांनी जाणले जात नाही,,पण त्याची अभिव्यक्ती शारीरिक पातळीवर होते,,उदा,माझ्या मनात विचार येतो,बुद्धीच्या स्तरावर निर्णय घेतो,चित्तात अनेक स्मृतींची साठवण होते,माझ्या मी कर्ता हा भाव निर्माण होतो,,हे सर्व भाव जाणवल्याशिवाय मला सूक्ष्म देह आहे हे पटत नाही,,हा सूक्ष्म देह सतरा घटकानी बनला आहे,,५ज्ञानेंद्रिय,,,५कर्मेंद्रिये,,,५प्राण,,मन बुद्धी,,हे ते घटक आहे,,

कारण देह:-माझ्या स्थूल आणि सूक्ष्म शरीराचे जे कारण आहे ते म्हणजे आमच्या स्वाभाविक वासनांची बैठक आहे,,म्हणजेच माझ्या दोन्ही देहाचे ते कारण आहे,,त्याचे अस्तित्व आपल्या दोन शरीरामुळे सिद्ध होते,,,ह्याचे विस्तृत विवेचन पुढील भागात

## भाग–४२

त्वं गुणयत्रयातीत:। त्वम वस्थात्रयातीत:। त्वंदेहत्रयातीत: त्वं कालत्रयातीत:। त्वं मूलाधारस्थितो। सिनित्यं। त्वं शक्तित्रयात्मक:।। त्वां योगिनो ध्यायंतिनित्यम। त्वं शक्तित्रयात्मक:।।
त्वांयोगिनोध्यायंतिनित्यं। त्वं ब्रह्मा त्वं विष्णु
स्त्वंरुद्रस्त्वंइन्द्रस्त्वंअग्निस्त्वं।
वायुस्त्वं सूर्यस्त्वं चंद्रमास्त्वं ब्रह्मभूर्भुव: स्वरोम




आजचा दिवस विशेष आहे ,,आज ही लेखनसेवा अजून पुढे गेली आणि आज २०० लेख आज पूर्ण होत आहेत,,ही सर्व लेखनसेवा गणाधिशाच्या चरणी आणि आदिशक्तीच्या चरणी अर्पण करूया,,,,

श्री गणेश हा तीन देहाच्या अतीत आहे हे पाहत असताना स्थूल देह व सूक्ष्म देह ह्याबाबत चे विस्तृत विवेचन आपण पाहिले पण ह्या दोन्ही देहाला प्रकाशित करणारा जो देह आहे तो करण देह,

कारण शरीर:–हे स्थूल व सूक्ष्म शरीराला व्यापते,,असे आपण म्हणतो ह्याचे महत्वाचे कारण की करण शरीर हे अज्ञानरुप अविद्यारुप आहे ज्यांच्याशी मायेचे ऐक्य सांगण्यात आले आहे,,आणि अज्ञानाचे मोजमाप नसते,,अज्ञान स्वत: जरी वस्तू विरहित असले तरी ते मी

शिवाय राहू शकत नाही,,हा जो मी आहे तोच अज्ञानाचे अधिष्ठान आहे,,,त्याला माझे अधिष्ठान आहे म्हणूनच ते निवृत्त ही होऊ शकते,,,ह्या कारण शरीराचे काही गुणधर्म आहेत

१)अनिर्वचनीय:-अज्ञानाला आकार नाही,रूप नाही मग त्याचे वर्णन कसे करता येईल??ज्ञानाचा अभाव म्हणजे अज्ञान,,कारण शरीराचे दृश्य रूप दिसत नाही पण ते अस्तित्वात नाही असेही म्हणता येत नाही,,ह्याचे कारण त्याचे परिणाम आपण आपल्या स्थूल देहावर पाहतोच ना!!ह्याच अज्ञानामुळे तर आपण दुःख भोगतो,,मग जे दिसत नाही ते नाही कसे म्हणायचे,,म्हणून कारण शरीराचे अज्ञान जन्य माया शक्तीचे वर्णन करता येणार नाही,,,


२)अनादी:-अज्ञान हे अनादी आहे,,,कारण त्याची सुरवात सांगायची म्हणजे ज्ञानाचे अस्तित्व सांगावे लागेल,,पण ज्ञान झाल्यावर अज्ञान कसे राहील,,,म्हणून अज्ञान हे ज्ञानातूनही येऊ शकत नाही,,आणि म्हणूनच अज्ञान हे अनादी आहे

३)निर्विकल्प:-अज्ञान अनादी तर आहेच पण ते एकजिनसी आहे,,ज्ञान संकल्पनेत ज्ञाता ज्ञेय आहेत,,पण अज्ञानात हे नाही,,ते एकटेच आहे,,बरं ते सर्वांचे सारखेच आहे,ज्ञान तरी कमी अधिक प्रमाणात असेल पण अज्ञान हे अज्ञानच असते,,,ते विकल्पाच्या म्हणजेच विचारांच्या पलीकडे आहे,,विचाराराहित आहे,,,

ज्ञानाने अज्ञानाचा नाश होत असल्यामुळे,कारण शरीर नित्य नाही,,,माझ्यातील आत्मतत्त्व हे जन्म आणि मृत्यूच्या पलीकडे आहे,,आणि म्हणून मी कारण शरीराहुन भिन्न आहे,,, ब्रह्मस्वरूप असणारा गणपती म्हणूनच तीन देहाच्या पलीकडे आहे,,तत्वाच्या स्तरावर मी आणि गणेश ह्यांचे अद्वैत आहे,,,,,

## भाग–४३

# त्वं गुणयत्रयातीत:
# त्वं देहत्रयातीत: त्वं कालत्रयातीत:।




गणपती अथर्वशीर्ष पाहत असताना आपण गणेशाची उपाधिराहितता पाहत आहोत,,आणि ह्यात गणपतीचे वर्णन तीन गुणांच्या पलीकडे,तीन देहाच्या पलीकडे आहे हे आपण पाहिले,,,ह्याठिकाणी श्री गणेश का तीन अवस्थाच्याही पलीकडे आहे असे अंतर्भूत आहे कारण जागृती स्वप्न व सुषुप्ती अवस्थांचा पलीकडे जी तुर्या वस्था आहे आणि त्यापलीकडे गणेशाचे अस्तित्व आहे आणि म्हणून आपण म्हणतो’‘‘ ऐसें तिन्ही देव जेथूनी उत्पन्न ,,,,तो हा गजानन जाणियेला!!!

त्वमकालत्र्ययातीत :–श्री गणपती हा तिन्ही काळाच्या अतीत आहे,,आपल्या सर्व व्यवहाराची परिछिन्नता ही तीन काळामध्ये आहे,,झालेल्या गोष्टी,सुरू असणाऱ्या,व पुढे होणाऱ्या,ह्यात आपले आयुष्य प्रभावित झाले आहे,

,past tense + present tense + future tense
=life tense,,,,

(what is ganpati=beyond tense)

ह्यात सर्व जीवन व्यतीत होत आहे,,काळ ही संकल्पना अंतराने सिद्ध होते,,,शिवाय काल ही मनाची सापेक्ष कल्पना आहे,,,वर्तमान

म्हणता म्हणता त्याचे एक सेकंदात भूतकाळात रूपांतर होते,,

Interval between two event is time,,

ही काळाची संकल्पना आहे,,,दोन घटनांमधील गॅप म्हणजे काळ होय,,विविध देशामधील काळामध्ये अंतर आहे,,समजा मी प्रवासाला निघालो,,आणि माझे गाव मला जेथे जायचे तेथून ५० किमी आहे,,आता अंतर ५० किमी आणि वेळ १ तास,,हे काळ आणि अंतर ह्याचे गणित ,,,पण आता माझे इच्छित स्थळ आले आणि तेथे ० किमी चा दगड ठेवला आहे,,,त्या दगडावर मी उभा राहिलो तर आता त्या गावापासून माझे अंतर किती???आणि मला आता वेळ किती लागणार??? म्हणून '''जहाँ दूरी है वहा देरी है''' हे तत्व ह्या ठिकाणी आहे,,,पण माझे आणि गणपतीचे अंतरच किती??तोच मी आहे,,,अयं आत्मा ब्रह्म,,,अहं ब्राह्मस्मि,,,ही अनुभूती आहे,,आता माझे माझ्यापासून माझे गणपतीपासून अंतर किती???काहीच नाही,,शिवाय कालपरिछिन्नता ही सत्य तत्वाला नाही,,,कारण काळही उपाधीच आहे,,,हे सत्य तत्व होते आहे आणि राहणार,,,त्याला काळ माहीत नाही,,,सूर्याला जर विचारले की अंधार म्हणजे काय???ह्याचे उत्तर सूर्य देऊ शकणार नाही,,त्याच प्रमाणे सत्याला काळ ही संकल्पना लागू होत नाही,,,,,

मित्रानो ,आपण सतत तीन काळाचा सतत विचार करून माझे जीवन किती दु:खात घालवतो?झालेल्या गोष्टींचा पश्चात्ताप,,भविष्यात घडणाऱ्या गोष्टींची काळजी,आणि वर्तमानाबाबत असमाधान,,,,शिवाय काय होईल??कसे होईल ??ही काळजी,,,पण लक्षात घ्या मी गणपतीचा उपासक असेल आणि काळाची सापेक्षता मी जाणली असेल तर ह्या तीनही काळात माझ्या मनाची स्थिती डगमगणार नाही,,,माझ्या जवळ ह्या प्रश्नांची उत्तरे

असतील ती अशी की,,,,

काय होईल??जे व्हायचे असेल ते,,,,

कसे होईल???जसे व्हायचे असेल तसे होईल,,,,

पण ह्या सर्वात मी माझे स्वरूप विसरता कामा नये,,,मग काळ परिस्थिती आणि अंतर ह्याचा त्रास मला होणार नाही,,,श्री गणपतीच्या उपसनेतून ही धारणा पक्की झालीच पाहिजे,,,



## भाग–४४

# त्वं मूलाधारस्थितो।.सिनित्यं।




आपण श्री गणपतीचे उपाधिरहित रूपाचा विचार केला,श्री गणपती तीन देहाच्या तीन गुणांच्या तीन काळाच्या तीन अवस्थांचाअतीत आहे,,हे स्वरूप जाणल्या नंतर आता त्याचे स्थान कोणते ह्याचा विचार ह्या पुढे सांगितला आहे,,तो कुठे स्थित असतो???

त्वम मूलाधार स्थितोसी नित्यम :–श्री गणेश तू मूलधाराच्या ठिकाणी नित्य स्वरूपात असतोस,,,मित्रानो एक लक्षात घ्या आपला गणपती अथर्वशीर्षाचा जो रिदम आहे तो आता उपाधिराहित स्वरूपापर्यंत आलेला असल्यामुळे वेदांत शास्त्रास अनुसरून जेथे उपाधी नाही तेथे खऱ्या अर्थाने तू आहेस हा रिदम आपल्याला लक्षात घ्यावा लागेल,,

शब्दश: ह्याचा अर्थ आपणास घेता येणार नाही,,ह्याचे महत्वाचे कारण तो स्तोत्राचा रिदम नाही,,योगशास्त्राच्या दृष्टिकोनातून मूलधाराचे स्थान गुदद्वार व जननेंद्रिय उपस्थ ह्याच्या मध्ये जी शिवण आहे त्याठिकाणी सांगण्यात आले आहे,,कुंडलिनी साधना करणारे साधकांना ह्याची जाण आहे,,तिथून इडा पिंगला मधून जी सुषुम्ना नाडी जाते ती सहस्त्रधार चक्रापर्यंत जाऊन पोहोचते,,आणि त्यामुळे

मूलाधार चक्राचे अनन्य साधारण महत्व आहेच,,पण ह्याठिकाणी आपल्याला हा अर्थ घेता येणार नाही,,

आपल्याला ह्याठिकाणी असा अर्थ घ्यावा लागेल की निर्मितीच्या मुळाचा आधार गणपती आहे,,आता विचार करा निर्मितीचे मूळ काय आहे,,विचार केल्यास लक्षात येते की ब्राह्मध्ये जर मायेची एकरूपता नसती तर सृष्टी निर्मिती झालीच नसती,,ह्या संपूर्ण पंच महाभूतात्मक जगाच्या निर्मितीचे कारण ही माया आहे,,पंचमहाभूतांची बाबतीत स्थूलकडून सूक्ष्मकडे गेल्यास पृथ्वी जल अग्नी वायू आकाश असे ते व्यापक होतात पण आकाशाची निर्मिती ज्या अव्यक्त मायेपासून झाली त्या मायेचे कारण परमात्मा आहे,,,आपल्या देहाच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास स्थूल देहाचे करण ,सूक्ष्म देह आणि सूक्ष्म देहाचे कारण हा कारण देह,,,पण ह्या कारण शरीराचे कारण हे करणातीत आहे,,,

ह्या दृष्टिकोनातून विचार केल्यास 'मुला' ह्याचा अर्थ माया असाच घ्यावा लागेल,,जी त्रिगुणातमीका अविद्यारुप आहे,,जीचा आधार परमात्म तत्व आहे,,आणि हे गणपतीचे रूप आहे,येथे तो स्थित आहे तेथून तो कधीच च्युत झाला नाही म्हणून त्याला अच्युतही म्हटले जाते,,,तो चैतन्य स्वरूप आहे,ही उपाधिराहित अवस्था आहे,,आणि म्हणूनच ती कोणत्याही उपाधिनी सीमित करता येणार नाही,,,आणि म्हणून जो मायेचा आधार आहे जो चैतन्ययुक्त आहे,उपाधी रहित आहे,तो कायमस्वरूपी तेथेच स्थित आहे,,,,

# भाग–४५

## त्वं मूलाधारस्थितो।सिनित्यं।




श्री गणपतीची उपाधिराहित अवस्थेचा विचार केला,,आणि त्याचे स्थान मूलधाराच्या ठिकाणी आहे म्हणजे काय ह्याचाही विचार केला,,

त्वमशक्तीत्र्यात्मक: :– हे गणपती तू तीन शक्तींनी युक्त आहे,,ह्याचा आपण दोन दृष्टीने विचार करू त्यात पहिला विचार आहे की प्रत्येक मनुष्याच्या तीन मूळ इच्छाशक्तीअसतात,,

१)मी असावे:–मी असावे ही इच्छा मानवाच्या अस्तित्वाच्या इच्छेशी निगडित आहे,,माझे अस्तित्व कायम ह्या जगात असावे ही इच्छा तर प्रत्येकाची असतेच पण त्याचसोबत ही जीवन जगण्याची प्रेरणा पण आहे,ही सत स्वरूपाची इच्छा आहे

२)मी जाणावे:–मी सर्वांना जाणावे,मला सर्व माहीत व्हावे ही मानवाची प्रेरणा तर आहेच पण ही मानवाची मूलभूत प्रेरणा आहे,ही चित स्वरूपाची इच्छा आहे

३)मी सुखी असावे:–कुणाही व्यक्तीला मी दु:खी असावे असे वाटत नाही,,जीवनाची संपूर्ण धडपड ही सुखासाठीच सुरू आहे,,ही जीवन जगण्याची प्रेरणा आहे,ही आनंद स्वरूपाची प्रेरणा इच्छा आहे

वरील तीनही इच्छाशक्ती ह्या सत चित आनंद ह्याचेही निगडित

आहे,,हेच आपले खरे रूप आहे,,गणपती हा स्वतःच सत चित आनंद स्वरूप आहे,,नव्हे तो ह्या सर्वांच्या पलीकडे आहे,,

ह्याचे विवेचन आणखी आशा पद्धतीने करता येईल की ईश्वराच्या तीन प्रकारच्या शक्ती असतात,,ज्ञानशक्ती,इच्छाशक्ती आणि कर्मशक्ती,,प्रथम आपण कोणतीही गोष्ट जाणतो, त्यानंतर तिची इच्छा करतो,आणि नंतर आपण त्याबाबतचे कर्म करतो,ह्या तिन्ही इच्छे मध्ये श्री गणेशाचे अस्तित्व आहे,,,किती व्यापक विचार आहे हा,,,ह्या तीनही शक्तीत जर गणपतीचे अस्तित्व आहे तर ह्या तिन्ही स्तरावर मानवाची अभिव्यक्ती कशी असावी??कारण मी श्री गणेशाचा उपासक आहे,,


त्वम योगिनो ध्यायंती नित्यम:-

तुझे ,योगी जन नित्य ध्यान करतात,,,ह्या ठिकाणी योगी ह्याचा अर्थ ज्याला परब्रह्मचा वियोगच झाला नाही असा जो आहे तो,,,बाह्य रूप नाही ही आंतरिक स्थिती आहे,,असे योगी ध्यान करतात,,पण केव्हा??हा समजून घेण्यासारखा मुद्दा आहे,,जे परब्रम्ह नित्य अस्तित्वात आहे आणि ह्या नित्य विद्यमान परमतत्वपासून जो कधीच दूर झाला नाही त्याचे ध्यानही कायम नित्य हे परब्रह्माचेच असेल,,मग विशिष्ट वेळ काळ वार तारीख ह्याचे बंधन त्याला राहणार नाही,,ध्यायंती नित्यम,,,कारण सर्वदूर तूच आहेस,,,,

मित्रानो तत्वज्ञानाचे बारकावे समाजासमोर कधी आपण आणलेच नाहीत ,आणि फक्त कर्मकांडाला समाजात स्थान दिले,आणि परिणाम??? भय,अपपर भेद,,एका विघटित समाजाला आपणच आपल्या अज्ञानातून प्रोत्साहन देतो,,,तत्वज्ञान अध्यात्म पुनरजागृत करायला हवे,,,

## भाग–४६

# त्वां योगिनोध्यायंतिनित्यं।
# त्वं ब्रह्मात्वं विष्णुस्त्वं रुद्रस्त्वंइन्द्रस्त्वं अग्निस्त्वं।




सर्वांना दसऱ्याच्या निमित्त हार्दिक शुभेच्छा व नमस्कार,,, आज विजयादशमी,आपण नवरात्री च्या पावन पर्वावर दुर्गा लक्ष्मी सरस्वतीची उपासना करून आज सीमोल्लंघन करीत आहोत आणि आज अथर्वशीर्षात श्री गणेशाने आपल्याला विश्वरूप दर्शन दाखविले आहे,,,ह्यापूर्वी आपण तो कुठे स्थित असतो हे पहिले पण आता त्याची वैश्विकता काय आहे??हे पाहूया,,

भागवद्गीतेमध्ये विश्वरूप दर्शन अध्याय आहे,,अर्जुन भगवंताला विचारतो की हे कृष्णा तू सर्वव्यापक आहेस तर तुझे चिंतन मी कोणत्या भावाने करू??मी तुझे कसे ध्यान करू??ह्यावेळी भगवंताने आपली विभूती प्रगटकेली,,आणि विश्वरूप दर्शन अध्यायात आपण पाहतो,,परमात्म तत्व सर्वदूर एकच आहे ,,

अथर्वशीर्ष मध्ये हीच सर्वव्यापाकता आपणास ह्या श्लोकात बघावयास मिळते,,अधिदैवत रूपाने श्री गणपतीचे वर्णन ह्या ठिकाणी आपणास आढळते,,,

त्वम ब्रह्मा:–श्री गणेशापासून निर्माण झालेली गणेशाचेच विभूती

ह्या ठिकाणी सांगितली आहे,,ह्या ठिकाणी तू ब्रह्मा आहेस असे म्हणताना उत्पत्तीच्या देवता ब्रह्माचे निर्देशन ह्याठिकाणी केले आहे,,चैतन्य जेव्हा निर्माण शक्तीशी एकरूप होते तेव्हा त्याला ब्रह्मदेव म्हणतात,,अशा सृष्टीच्या निर्मितीचे तत्व तूच आहे,,

त्वम विष्णू:–जी निर्मिती झाली तिचे योग्य रित्या संगोपन होणेही आवश्यक आहे,,गणपती ही संगोपणाचीही देवता आहे,,,

त्वम रुद्रम:–रुद्र ही देवता संहारक देवता आहे,,जगात फक्त उत्पत्ती स्थिती असती आणि लय नसता तर??विचार करा,,सृष्टीचा समतोल राहिला नसता,,गणपती हा उत्पत्ती स्थिती व लयाची अधिष्ठात्री देवता आहे,,आणि त्यामुळे सृष्टीचा समतोल साधला गेला आहे,,


सृष्टीमधील कोणत्याही घटकाला ह्या तिन्ही चक्रातून जावेच लागते,,ज्याची ज्याची उत्पत्ती आहे त्याचा लय निश्चित आहे,,ह्या तत्वाला अनुसरून आपल्या देहाचाही अंत आहेच,,

मित्रानो जीवन तत्व अखंड आहे पण आयुष्य सीमित आहे,,आज ह्या दसऱ्याच्या पावन पर्वावर सर्व भेदाभेद गैरसमज,राग द्वेष सगळ्या मर्यादा पार करून सह अस्तित्वाची भावना मनात जागवू या,,,

जुने जाऊ द्या मारणालागुनी,,,


नव्याचाही विचार करा,,,,

(हा विचार ज्यांनी माझ्या मनात रुजवला त्यांना माझा साष्टांग दंडवत)



## भाग–४७

# त्वां योगिनोध्यायंतिनित्यं।
# त्वं ब्रह्मात्वं विष्णुस्त्वं रुद्रस्त्वंइन्द्रस्त्वं अग्निस्त्वं।




श्री गणपतीची अधिदैवत रूपाने ऋषींनी विभूती सांगितली,,विभूती म्हणजे वैभव,,श्री गणेश ही उत्पत्ती स्थिती व लयाची देवता आहे,,आणि हे सांगण्यासाठी ब्रह्मा विष्णू आणि रुद्र ह्याचे निर्देशन केले आहे,,आता ही संपूर्ण पंचमहाभूतात्मक जगत हे श्री गणपतीचेच वैभव आहे ह्याची विवेचन आपणास पुढच्या टप्प्यात आढळते,,

त्वम इंद्र:–तूच इंद्र आहेस,,,देवनाम राजा इंद्र,,,असे म्हणण्यात येते,,पंच महाभूतात्मक देव,असा ह्या ठिकाणी अर्थ घेतल्यास,इंद्र ही ध्यानाची देवता आहे,,करण ध्यानाच्या वेळी मनाचाही लय होतो,,अशा निरनिराळ्या देवतांचा राजा तूच आहेस,,,

अग्नित्वम:–तू अग्नी आहेस,,असे म्हणत असताना अग्नी ही वाचेचे देवता आहे,,ह्या वाचेच्या रूपातही तूच आहेस,,व्यापक अर्थाने बघितल्यास ज्ञान रुपी अग्नी असेही म्हणता येईल,,शिवाय जेव्हढ्या शब्दराशी पडतात तेवढे सगळे तुझेच रूप आहेत,,,

वायुस्त्वं–तूच वायू आहे,,स्पर्शाची देवता वायू आहे,,वायू मुळे स्पर्शाचे ज्ञान होते,,म्हणून हे गणेश तू वायूची देवता आहेस,,,

सूर्यस्त्वं:-सूर्य देवता ही नेत्राची देवता आहे,,सूर्याच्या सूक्ष्म शक्तीमुळे नेत्रात पाहण्याची शक्ती असते,,पिंडात अक्ष व ब्राह्मण्ड मध्ये सूर्य,,पण त्यामागे असणारी चेतना मात्र एकाच आहे,,सूर्य ही नेत्राची देवता आहे,आणि सूर्यात तेज अग्नी आणि ध्वनी ह्या तिन्ही बाबी अंतर्भूत आहेत,,तो ज्ञान आणि सक्रीयतेचे प्रतीक आहे

चंद्रमा स्त्वं:-चंद्र ही मनाची देवता आहे,,मनाच्या जेवढ्याही विचाराराशी आहेत ते सगळे तुझेच रूपे आहेत,,व्यष्टी मन आणि समष्टी मन ह्यांना प्रकाशित करणारा तूच आहेस,,

ब्रह्म भुर्भुव: स्वरोम:- ह्याठिकानी तिन्ही लोकांचे निर्देशन केले आहे,,ते म्हणजे भूलोक, अंतरिक्ष,आणि स्वर्ग लोक,,ह्या तिन्ही ठिकाणी तूच आहेस,,,,

मित्रानो अधिदैवीक पातळीवर म्हणजेच पंचमहाभूतात्मक पातळीवर परमेश्वराचे विभूती वर्णन,,अधिभूत पातळीवर व आध्यात्मिक पातळीवर हे विभूती वर्णन पाहिले ह्या सर्वात व्यापून असणारे तत्व म्हणजेच श्री गणेश आहे ही त्याची विभूती आहे,,ह्याच विभूतीचे वर्णन आपण गीतेच्या १० अध्यायात पण पाहतो,,श्री गणेश हा सर्वव्यापक ब्रह्म आहे ही ऋषींची अनुभूती आहे,,,ही अनुभूती आपल्याला ही येवो ही श्री गणपती चरणी प्रार्थना करू या,,,



# भाग–४८

## त्वां योगिनो ध्यायंतिनित्यं।
## त्वं ब्रह्मात्वं विष्णुस्त्वं रुद्रस्त्वंइन्द्रस्त्वं अग्निस्त्वं।




अथर्वशीर्ष चा विचार करताना आता आपण गणेशमंत्रपर्यंत येऊन पोहोचलो,,आपण व्यवहारात नेहमी एक गोष्ट पाहतो की आपण कोणताही मानत स्तोत्र म्हणतो ते बरेचदा यांत्रिक पणेच करतो,,म्हणजेच उच्चारण करतो पण त्याच्या अर्थापर्यंत जात नाही,,पण ही यांत्रिक ता त्यागली व आशयासकट मंत्रोच्चार केला तर त्याचा निश्चित प्रभाव होईल,,

ह्या श्लोकात ऋषी ‘‘‘ओम गँ गणपतये नम:‘‘‘‘ हा जो एकक्षर मंत्र आहे त्याचे स्मरण उच्चारण कसे करावे ह्याचे मार्गदर्शन केले आहे,,हा प्रणव ओंकारासाहित असणारा बीजमंत्र आहे,,ह्याचे प्रारूप ह्या ठिकाणी ऋषींनी आपणास समजावून सांगितली आहे,,,

गणादि पूर्वमुच्चर्य:– बीजमंत्रात येणारा प्रथम शब्द आद्याक्षर‘‘ ग‘‘आहे,,त्याला आपण हलंत लावून म्हणतो,,

वर्णादी तद्रंतरम :–पण त्याला वर्णाक्षरातील ‘‘अ‘‘हे अक्षर लावले की ‘‘ग‘‘हा शब्द बनतो,,येथे ग शब्दाचे उच्चारण पूर्ण होते,,

अनुस्वार परतर: :–आता जो ग शब्द बनला त्याला या अनुस्वार द्या,,


अर्धेन्दुल सितमः-अनुस्वार झाल्यानंतर त्याला अर्ध चांद्रकृती समाविष्ट करा,,आणि त्याला अनुनासिक शब्दात उच्चारण करा,,

तारेण रुद्धमः-तार म्हणजेच ओंकार,म्हणजेच त्याला ओंकाराने युक्त करा,कारण कोणत्याही मंत्राला ओंकारशिवाय,प्रणावशिवाय शक्ती येत नाही,,

एताततव अनुस्वरूपमः-हे गणपती हे तुझे व्यक्त स्वरूप आहे,प्रणव युक्त स्वरूप आहे,हे तुझे साकार रूप आहे,,

ओम नमस्ते गणपतये पासून श्री गणपतीचे वर्णन त्याची व्यापकता त्याची विभूती इ सांगितल्यावर ओम गँ गणपतये नमः ह्याचे उच्चारण कसे करायचे ह्याचे निर्देशन केले,,

मित्रानो कोणतीही विद्या कौशल्य शिकायचे असेल तर त्याचे सखोल ज्ञान आपल्याला असायलाच हवे,, तरच ते संयुक्तिक ठरते,,प्रणव ओंकाराबाबतही तसेच आहे,,ह्या मंत्रात ओंकार व गणपती एकच आहे हे निर्देशित केले आहे,,आणि ह्या मंत्राची पूर्तता नमः म्हणजेच नामस्काराने केली आहे,,ह्याचाच अर्थ असा की आपल्यातील अहंकाराचे समर्पण गणेशाच्या चरणी अर्पण करण्याचे मार्गदर्शन ह्या ठिकाणी आहे,,



भाग–४९

## त्वां योगिनो ध्यायंतिनित्यं।
## त्वं ब्रह्मात्वं विष्णुस्त्वं रुद्रस्त्वंइन्द्रस्त्वं अग्निस्त्वं।




श्री गणपती अथर्वशीर्षात आपण बीजमंत्राचा विचार करीत आहोत,,ओम गँ गणपतये नमः,, आणि हे ओंकाराच्या रूप आहे ही विचारांची अभ्यासाची साखळी आपणास लक्षात ठेवायचे आहे त्याच सोबत ह्यात तत त्वम आसि आणि अयं आत्मा ब्रह्म ह्या महावाक्यांचाही आपण मागोवा घेत आहोत,,

गकार:पूरवरूपम:–बीजमंत्रात गकार हे पूर्वरूप

अकारो माध्यमरूपम:–अकार हे त्याचे मध्यम रूप आहे

अनुस्वारश्चत्य रुपम:–अनुस्वार हे त्याचे अंतिम रूप आहे

बिंदुरुत्तरारूपम:–बिंदू हे त्याचे उत्तररुप आहे म्हणजेच आता त्याच्यानंतर काहीच नाही,,

नादसंधानं संगहित संधी: :–आशा चारवर्णाच्या संधींनी युक्त असा हा श्री गणपती आहे,,

आपल्याला ह्याठिकाणी पुनरावृत्ती केली असे वाटणे स्वाभाविक आहे पण तत्वाचे दृढीकरण करायचे असेल तर ही वारंवारिता आवश्यक आहे,,

ओंकाराने युक्त असा हा गँ बीज मंत्र आहे,,गँ बीज शक्ती

ओंकार!!सर्व कामार्थ सिद्धये!!म्हणजेच कोणत्याही कार्यात यश प्राप्त व्हावे कार्य सिद्धीस जायचे ते श्री गणेशशिवाय शक्य नाही,,,

आता साधनेच्या दृष्टिकोनातून जर विचार करायचा असेल तर ह्यातून निर्देशित केलेल्या आत्मतत्वाचा अनुसंधान महत्वाचे ठरते,,आणि म्हणूनच पहिल्या तीन मात्रा ह्या ओंकाराच्या सगुण रूपाचे अध्यारोप आहे तर चवथी मात्रा ही अमात्र चे निर्देशन करणारी आहे म्हणजेच त्यापलीकडे काहीच नाही,,

आपल्याला आत्मतत्वाची अनुसंधान करायचे आहे आणि म्हणून पहिल्या तीन मात्रा ह्या अत्म्यावर केलेले सगुण रूपाचे अध्यारोप आहे आणि शेवटची मात्र म्हणजे सूक्ष्म स्वरूप,,,

आता हीच संकल्पना आपण देहाच्या स्तरावर आणली तर तीन मात्र ह्या स्थूल सूक्ष्म व कारण देहाशी एकरूप होऊन तीन अवस्था चा अनुभव घेतात

तीन अवस्थेच्या दृष्टीने पाहिले तर पहिल्या तीन मात्र

स्थूल शरीराशी एकरूप झालेला आत्मा जागृती अवस्था,,जागृतभिमानी आत्मा,,,,

सूक्ष्म शरीराशी एकरूप झालेला आत्मा स्वप्न अवस्था स्वप्नाभिमानी आत्मा,,,

व कारण देहाशी एकरूप झालेला आत्मा सुषुप्ती अवस्थेचे निर्देशन करतो तो कारण शरीराभिमानी आत्मा,,,

तर शेवटची मात्र तुर्या अवस्थेचे निर्देशन करते,,ही ओंकाराची ध्वनिराहित अवस्था आहे,,पुढल्या भागात,,,,,

# भाग–५०

## त्वां योगिनो ध्यायंतिनित्यं।
## त्वं ब्रह्मात्वं विष्णुस्त्वं रुद्रस्त्वंइन्द्रस्त्वं अग्निस्त्वं।




ओम गँ म्हणजेच ओंकार आहे,ह्या विवेचनाचा अपण विचार करीत आहोत,,अकार उकार मकार ह्या तिन्ही मात्रा ह्या उत्पत्ती स्थिती लय,जागृती स्वप्न सुषुप्ती ह्याचे प्रतीक आहे,,ओंकार हेच आत्मतत्व आहे,,हे सर्व व्यष्टीच्या स्तरावर,

व्यष्टी स्थूल शरीराभिमानी आत्मा म्हणजे विश्व,

(जागृतभिमानी आत्मा)

व्यष्टी सूक्ष्म शरीराभिमानी आत्मा म्हणजे तैजस

(स्वप्नाभिमानी आत्मा)

व्यष्टी कारण शरीराभिमानी आत्मा म्हणजे प्राज्ञ

(कारण शरीराशी एकरूप आत्मा)

आता हेच विवेचन समष्टीच्या स्तरावर पाहिले तर

समष्टी स्थूल शरीराभिमानी आत्मा –विराट

समष्टी सूक्ष्म शरीराभिमानी आत्मा–हिरण्यगर्भ

समष्टी कारण अभिमानी आत्मा–ईश्वर

हे सर्व ओंकाराच्या व्यक्त अवस्था आहेत,,पण ओंकाराच्या अव्यक्त स्वरूपाचे अ मात्रेचा विचारही महत्वाचा ,,अमात्र म्हणजे जेथे

ओंकाराच्या शेवटचा ध्वनीही संपतो,,आणि मीच ते ब्रह्म आहे ही अनुभूतीची अवस्था आहे,,

म्हणून अनुस्वार हे अंतिम रूप असले तरी बिंदुरुपानंतर काहीच नाही,,पिंडाच्या स्तरावरील तीन अवस्था व ब्राह्मन्ड च्या स्तरावर तीन अवस्था ह्याचे जे अधिष्ठान आहे तिला आत्मज्ञानाची अवस्था म्हणतात,,,तोच आत्मा व तेच ब्रह्म व तीच तुर्या वस्था आहे,,,जी अयंआत्माब्रह्म ह्या महावाक्याने निर्देशित केली आहे,,,माझे स्वरूप हेच ब्रह्मस्वरूप आहे हे प्रणवच्या उपासनेने जाणणे हीच साधना आहे,,,मांडूक्य उपनिषदात ह्याच अर्थाने आत्म्याचे वर्णन चतुष्पाद असे केले आहे,,,

स इशा गणेश विद्या:–विद ह्या धातूपासून विद्या हा शब्द निर्माण झाला आहे,,विद म्हणजे जाणणे,,म्हणजेच आतापर्यंत जे ऋषींनी आपणास सांगितले ती गणेश विद्या आहे,,ती शब्द रूपाने स्पष्ट करून सांगितली,ज्यात श्री गणेशाचे सगुण आणि निर्गुण असे दोन्हीही रूपाचे वर्णन केले आहे,,

ह्या विद्येची देवता श्री गणपती असून ह्या मंत्राना जाणणारे ऋषी हे गणक ऋषी असून ह्याचा गायत्री हा छंद आहे,,पुढील भागात अधिक विवेचन ह्या संदर्भात पाहू,,,,

# भाग–५१

## त्वां योगिनो ध्यायंतिनित्यं।
## त्वं ब्रह्मात्वं विष्णुस्त्वं रुद्रस्त्वंइन्द्रस्त्वं अग्निस्त्वं।



गणपती आणि ऋषी वेगळे नाही एकाच आहेत,,गणेश विद्येच्या जाणणारे आहेत,,आणि नियम असा आहे की जो ज्याला जाणतो तो त्याच्यापासून वेगळा नाही,,आणि म्हणूनच ऋषी हे साक्षात गणपती स्वरूप आहेत,,

गणेशाबाबतची विद्या व त्याला जाणणारे ऋषी म्हणजे गणक ऋषी,,ऋषी हे कधीही स्वत:ला मंत्राचा कर्ता समजत नव्हते,,ऋषी एव मंत्र द्रष्टर: असे म्हणण्यात येते,,ज्या ज्या क्षेत्रात सर्वसामान्यपणे शोध लागतात त्याचे वर्गीकरण आपण केले तर दोन प्रकारात होईल,,

1) Objective Science,,

2) Subjective Science,,,

ह्यापैकी objective science मध्ये जे लोक पुढे आले त्यांच्या नावे अनेक शोध झाले,,त्यांनी अनेक सिद्धांत मांडले,,पण विचार करा हे सगळे पुनर्शोध होते,,ते सर्व सिद्धांत ह्या सृष्टीत विद्यमान होतेच पण ते सर्वांना नाही आकलन झाले ते फक्त ज्यांनी शोध लावले त्यांनाच आकलन झाले,,आणि म्हणून ते त्या विशिष्ट शोधाचे शोधक झाले,,


subjective science च्या संदर्भात त्यातही वेदांत शास्त्राच्या संदर्भात विचार केल्यास वेद साहित्याला अपौरुषेय साहित्य म्हणण्यात येते,,,

ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे सर्व मंत्र हे अक्षर ब्रह्म आहे आणि ते अस्तित्वात होतेच पण ऋषी त्याचे द्रष्टे होते ,,ह्या मंत्राना देश काळाची मर्यादाही नाही,,करण ऋषींनी हे मंत्र जाणले तेव्हा त्यापूर्वी ते कोठेतरी अस्तित्वात होतेच फक्त ते कुणी जाणले नव्हते,,आणि म्हणून वेदाना अनादी म्हटले जाते,,ऋषींनी हे अक्षर ब्राह्मची अनुभूती घेतली आणि ते व्यवहारात आणले,,

ह्याच आशयाने हिंदू धर्माला अनादी अनंत म्हणतात,,,कारण हिंदू धर्म व्यक्तिनिष्ठ नाही,,हिंदू धर्माचे कुणी संस्थापक नाही,,मुळातच हिंदुत्व हे ऋषीत्व आहे,,जेथे जेथे ऋषीत्व आहे तेथे तेथे हिंदुत्व आहे,,कारण हिंदुत्वाने धर्म संकल्पना वैश्विक दृष्टीने मांडली,, जो ज्याचा अस्तित्वाचा नियम तो त्याचा धर्म,,,ही ती व्यापक संकल्पना आहे,,पण दुर्दैवाने कर्मकांडाला आम्ही धर्म समजतो आणि धर्मसंकल्पनेची हानी करून बसतो,,,ह्या दृष्टीने विचार केला तर न्यूटन हे पण ऋषी होते हे मान्य करण्याचा मोठेपणा आपल्याला दाखववाच लागेल, श्री गणपती अथर्वशीर्षाच्या निमित्ताने हे विवेचन ह्यासाठी महत्वाचे ठरते की ह्यातील कर्मकांडात्मक भाग जास्त पुढे येतो आणि मग त्यातून ज्या ज्ञानाची प्राप्ती करून घ्यायची आहे ते तत्व बाजूला पडते,,आणि कर्मकांडाचे प्राबल्य झाले की तेथे मग भेदाभेद निर्माण होतो,,अथर्वशीर्ष तत्वज्ञान हे वैश्विक आहे,सार्वभौम आहे,,जाती धर्म स्थळ काळ ह्याचे बंधन अथर्वशीर्षाला लागू नाही,,,परमेश्वराने हे सर्व सढळ हाताने दिले त्याला आपण संकुचित बनविले,,,वास्तविक हा अधिकार आपल्याला परमेश्वरानेही दिला नाही,,,भेदयुक्त बनवून आपण जन्माला आलो नाही,,नामरूपात्मक भेद आपण बनविले,,,अथर्वशीर्षाचा उपासक अभ्यासक भेदाभेदाच्या पलीकडेच असायला हवा,,,,

# भाग–५२

## त्वां योगिनो ध्यायंतिनित्यं।
## त्वं ब्रह्मात्वं विष्णुस्त्वं रुद्रस्त्वंइन्द्रस्त्वं अग्निस्त्वं।




जी गणेशविद्या म्हणजेच श्री गणेशाबाबत चे ज्ञान आपल्याला ऋषींनी दिले ते गणक ऋषी ,,,,ह्याश्लोकांमध्ये जो छंद आला आहे तो गायत्री छंद आहे,,छंद म्हणजे तो श्लोक म्हणण्याची जी पद्धती निर्देशित केली असते ,,,

निचहृदगायत्री छंद:म्हणजेच हे श्लोक गायत्री छंदातील असून विशेष शुद्ध असणाऱ्या गायत्री छंदातील आहे,,छंद हे वेगवेगळे असतात,,जसे रमरक्षेचा छंद हा अनुष्टुप छंद आहे,,,गायत्री छंदाचा उल्लेख गीतेमध्ये सुद्धा आपणास पहावयास मिळतो,,प्रत्येक देवतेची स्वतंत्र गायत्री देण्यात आली आहे,,(ह्या सर्व गायत्री आपण विशेषत: आरतीनंतर म्हणतो,,,),,ह्या गायत्री जरी भिन्न असल्या तरी त्याचा आशय मात्र एकच आहे,,

गायत्री छंदातील हा मंत्र असून त्याची देवता गणपती आहे,,गणपती आणि गणक ऋषी ह्याचेही ऐक्य ह्याठिकाणी आहे,,कारण क हा शब्द स्वामी चे निर्देशन करणारा आहे,,गणांचा जो स्वामी तो,,,असा विनम्रतेने उल्लेख करून श्री गणेशाला वंदन केले आहे,,

ओम गँ गणपतये नमः,,,ह्या मंत्राचे उच्चारण सहज सुलभ आहे,,आणि कुणीही ह्याचे उच्चारण करू शकतो,,,आता ह्या मंत्राने आपल्या संकटांचा नाश होतो असे म्हटले जाते,,,पण कोणत्या संकटांचा??ह्याचा मात्र विचार करणे अत्यंत आवश्यक आहे,,बाह्य जगतातील जी संकटे आहेत त्या संकटांचे निर्देशन ह्या ठिकाणी केलेले नाही,,

ह्याचे महत्वाचे कारण ती सर्व संकटे येणे हे माझे माझ्या देहाशी निगडित असणारे प्रारब्ध आहे आणि हे प्रारब्ध अगदी ब्रह्मदेव सुद्धा बदलवू शकत नाही,,पण माझ्यावरील सर्वात मोठे संकट आहे ह्या जगताबाबत चे चुकीचे तादात्म्य,,,आणि स्वतः बाबत चे अज्ञान,,ह्यासारखे सर्वात मोठे संकट ह्या जगात असूच शकत नाही,,आणि श्री गणेश मंत्राचा अभ्यास हा निदिध्यासनाच्या रूपात केल्यास हे आत्मसंकट दूर व्हायला मदत होते,,,आणि आपण ह्या संकटातून मुक्त होतो,,,आणि स्वतः बाबत चे ज्ञान झाले की बाह्य भौतिक जगतातील अडचणी ह्या अडचणी वाटत नाही ती परमेश्वराची योजना आहे आणि त्या योजनेचे स्वागतच मला करायचे आहे,,,ते भोग मला भोगायचेच आहे,,आणि प्रारब्धाचे बॅलन्स शून्य करायचे आहे,,



# भाग–५३

**एकदंतायविद्महे। वक्रतुण्डाय धीमहितन्नोदंतीप्रचोद्यात।।**




गणेश मंत्रानंतर श्री गणेश गायत्री ऋषींनी मांडली आहे,,

एकदंताय विदमहें:–आम्ही एकदंतला जाणतो

वक्रतुंडाय धीमहि:–आम्ही वक्रतुंडचे ध्यान करतो

तन्नो दंती प्रचोदयात:–त्याचे आम्ही ध्यान करतो तो गणपती आम्हास प्रेरणा देवो

श्री गणपतीचे वर्णन एकदंत ह्या शब्दाने करण्यात आले आहे ह्याचे महत्वाचे कारण एक हा शब्द मायेचे निर्देशन करणारा आहे,,गणपतीचा एक दात वर्णन केलेले आहे आणि तोही दात खंडित आहे,, ह्याचे महत्वाचे कारण खंडलेला दात हे अवैदिक मताच्या खंडनाचे प्रतीक आहे आणि दंत ह्याचा अर्थ अधिपती असा होतो,,


सांख्य तत्त्वज्ञानाने हा विचार समाजात रुजवला होता की माया,प्रकृती हे जगताचे मूळ कारण आहे,,पण वेदांत मताने ह्याचे खंडन केले,,कारण माया मूळ जड आहे,,आणि एकट्या जडपासून कोणतीही निर्मिती शक्य नाही ,,,शिवाय जडाला प्रकाशित करणारे चेतन तत्व असल्याशिवाय जडाला अस्तित्वच प्राप्त होत नाही,,आणि ह्या जडपासून उत्पन्न झालेल्या समुदायाला गण म्हणतात तेव्हा गणपती हा ह्या गणांचा संपूर्ण जड सृष्टीचा अधिपती आहे,,

अद्वैत मताने संख्याच्या मताचे खंडन केले,,,,एक म्हणजे माया आणि दंत म्हणजे त्याचा अधिपती,,,म्हणून जो मायेचा अधिपती आहे त्याला एकदंत असे म्हणण्यात आले आहे,,एकदंत ह्या शब्दातून एकात्मिक मायेचे निर्देशन केले आहे,,,एक शब्दत्मीका माया!तस्या सर्वम समुदभवम!! मायायुक्त ब्रह्मापासून सर्व जगताची निर्मिती होते,,,आशा ह्या मायेचे संचालन व नियंत्रण करणारा तूच आहे हे ह्याठिकाणी निर्देशित केले आहे,,,तत्र माया चालक उच्चते!!!तोच मायेचा चालक आहे ,,,संख्यांच्या एकेरी विचारला वेदांतानी उत्तर दिले आहे,,

हा मायाचालक स्वतः आनंदस्वरूप आहे त्याचा आनंद कशावरही अवलंबून नाही,,त्याची सत्ता दुसऱ्या कोणत्याही सत्तेवर अवलंबून नाही,,तो ज्ञानस्वरूप आहे,,तो सत चित आनंद स्वरूप आहे,,,तो शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे,,,,

# भाग–५४

**एकदंतायविद्महे। वक्रतुण्डाय धीमहितन्नोदंतीप्रचोद्यात।।**




श्री गणेशाबाबत चे ज्ञान प्राप्त झाल्यावर ऋषींनी गणेश गायत्री मांडली आहे,,गणेशाचे एकदंत हे मायाधिपती आहे हे दर्शवितो,,आणि हीच गणेश गायत्रीच्या प्रारंभी नमूद केले आहे,,येथे तत्वाचे प्रारंभिक आकलन झाले,,पण ह्या आकलनाचे अनुभवात रूपांतर करण्यासाठी त्याचे ध्यान करणे महत्वाचे आहे,,

वक्रतुंडाय धीमहि:– वक्र म्हणजे तिर्यक माया म्हणजेच जी मोहयुक्त आहे,,,म्हणजेच जिच्यामुळे आपल्याला जगताबाबत स्वत: बाबत चे विपरीत ज्ञान होते,,,

तुंडयती:–म्हणजेच नाश करणारा

म्हणजेच श्री गणेश हा मायेचा नाश करणारा आहे,,,

अशा गणपतीचे ध्यान करण्याबाबत येथे निर्देशित केले आहे,,,

माया ही सर्वांनाच त्रासदायक ठरते,,ह्याचे महत्वाचे कारण ह्या मायेमुळे आपल्या स्वरूप ज्ञानापासून आपण वंचित राहतो,,आणि एकदा स्वरूपाचे ज्ञान झाले की मायेचाही नाश होतो,,

वक्रतुंडची कल्पना मुखाच्या ठिकाणी केली आहे ह्याचीही कारणमीमांसा महत्वाची ठरते,,जग हे मन आणि वाणीयुक्त

आहे,,विचार आणि शब्दयुक्त आहे,,त्याचा प्रकाशक हे ब्रह्मस्वरूप व आत्मस्वरूप आहे,,आणि आत्मस्वरूप हे मन आणि वाणीच्या पलीकडे आहे,,मन आणि वाणी ह्याच्या पलीकडे परिसर आहे तेथे वाचा पोहोचते पण ती तेथून परत येते,,त्याबाबत शब्द सांगू शकत नाही,,,

मनोवाणी हिनत्वत,,,,

तदेव मुखम यस्य,,,,,

सा वक्रतुंड इति,,,,

श्री गणेशाचे ध्यान त्याला जाणल्याशिवाय शक्य नाही,,,

अशा गणपतीचे आम्ही ध्यान करतो,,,समष्टी ध्यान ह्याठिकाणी निर्देशित केले आहे,,

तन्नो दंती प्रचोदयात:-तो एकदंत आम्हास प्रेरणा देवो जेणेकरून आम्ही स्वरूपाची स्थिती प्राप्त करू शकू,,,प्रेरित होणारी बुद्धी विविध दिशेला जाऊ शकते,,पण तिला एकाच दिशेने ठेवली तर अभेद वस्तूला ती जाणू शकते आणि अभेदाचे ज्ञान झाले तर भेदाभेदच राहणार नाही,,,,,जो ज्ञानोपासक आहे तो ह्या पेक्षा वेगळे काय मागणार??

येथे गणपतीचे ध्यान करून प्राप्त केलेले ज्ञान ध्यानाने अनुभवाच्या प्रांतात आणावे हे निर्देशित केले आहे,,एक महत्वाची बाब अशी की कोणतेही शास्त्र वाचलं तरी त्याचे मनन चिंतन व निधीध्यासन(Contemplation) महत्वाचे ठरते,,,जसे की आपण जेवतो,,,जेवताना व्यवस्थित खाऊन पचवतो,,, आणि पचावलेले आत्मसात करतो, Eat,,, Digest,,, assimilate,,,and make it your own,,,हीच शास्त्राच्या बाबतीत पण लागू आहे,,,

# भाग–५५

## एकदंतायविद्महे। वक्रतुण्डाय धीमहितन्नोदंतीप्रचोद्यात।।




वक्रतुंड ह्याचा अजून एक अर्थ सांगितला जातो तो म्हणजे,,‘‘‘वक्रात विघ्नान विघनकरतुम,,,,,शत्रूं वा तुंडयाती‘’’म्हणजेच आपल्या जीवनात अनेक विघ्न येतात,,ह्या विघ्नांचे आपणास खूप त्रास होतो,,पण गणपती देवता ही विघ्न मध्ये विघ्न आणणारी देवता आहे,,जीवनात मनाची शांती घालविणाऱ्या अनेक गोष्टी घडतात,,आपल्याला विक्षेप देऊन जातात,,,ह्या गोष्टी कधी बाहेरून तर कधी अपल्यातूनच निर्माण होतात,,,अशा वेळी गणपतीचे ध्यान खूप महत्वाचे असते,,ह्या सर्व विक्षेपचा नाश तेव्हाच होईल जेव्हा तेथे श्री गणेशाचे निर्गुण निरकाराचे ध्यान आपण करू,,,करण त्या ध्यानानेच आतील विक्षेप शांत होतील,,,ह्या ध्यानानेच अंतर्गत शत्रू नामोहरम होतील,,,

अथर्वशीर्षात गणपती गायत्रीचा विचार आपण केला,,गायत्रीच्या विचारात ऋषींना अध्यात्मिक अर्थ अपेक्षित आहे,,प्रत्येक गायत्रीमध्ये आपणास दोन दोन शब्द पहावयास मिळतात,,विधमहे आणि धीमहि,,,ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे ज्या देवतेची कृपा आपण अपेक्षित करीत आहोत तिची सत्ता महत्ता ह्याचे पूर्ण ज्ञान आपणास असावयास हवे,,आणि आता केवळ बौद्धिक स्तरावर हे ज्ञान होणे खूपसे महत्वाचे नाही तर त्याचा साक्षात्कार करावयाचा असेल तर

त्याबाबत चे ध्यानहीं आवश्यक आहे व ध्यानानेच त्यामागील तत्व जाणून घेणे आवश्यक आहे,,,आपण विविध देवतांची गायत्री म्हणतो पण देवता जरी भिन्न असल्या तरी त्यामागील तत्व मात्र एकाच आहे हे महत्वाचे,,,प पू गुरुदेव स्वामी चिन्मयनानंद म्हणत असत की Idols are many but Ideal is one मूर्ती मूर्त स्वरूप जरी भिन्न असले तरी ते ज्याचे प्रतीक आहे ते तत्व मात्र एकाच आहे ही धारणा पक्की होणे हीच अध्यात्मिक साधना आहे,,

मित्रानो आतापर्यंत ऋषींनी अनेक अंगांनी श्री गणेशाचे वर्णन आपल्यासमोर मांडले आहे,,नाम मंत्र ,महावाक्यनुसार असलेले स्वरूप,निर्गुणनिराकारअसलेले आत्मस्वरूप,गणेशविद्या ,मंत्र,गायत्री,,इ,,हे सर्व सांगितले,,पण हे सर्व निरकाराचे दृष्टिकोनातून,,,पण ऋषींनी हे जाणले होते की जोवर व्यक्तीची देहामध्ये साकार बुद्धी असते तो पर्यंत ब्राह्मबाबत सुद्धा सगुण साकार उपासनेची गरज असते,,,‘‘‘सगुणाचेनी आधारे निर्गुण‘‘‘‘,,,हा अभ्यास करून ‘‘‘‘सगुण निर्गुण दोन्ही विलक्षण‘‘‘‘‘ ही अनुभूती आयुष्यात खूप महत्त्वाची आहे,,आणि म्हणूनच आता पुढच्या भागात ऋषींनी श्री गणपतीचे सगुण साकार रूपाचे वर्णन केले आहे,,,पण त्यातही प्रतिकात्मकता आहे,,त्यातील अध्यात्मिक संकेतीकता जाणणे अतिशय महत्वाचे आहे,,अशी प्रतिकात्मक उपासना ही बहिरांग शुद्धीकरणासाठी अत्यंत उपयुक्त ठरते,,,

आपण ह्या सगुण साकार मूर्तीचा आशय लक्षात घेतला तर आपल्या उपासनेला कर्मकांडाचे रूप येणार नाही,,आणि आपली पूजा ही तांत्रिक पण होणार नाही,,,बऱ्याचदा ज्या पद्धतीने आपण पूजा करतो त्या बहिरंग कर्मावर बरेच जण आक्षेप घेतात,,,त्यातील सर्वात सर्वसामान्य आक्षेप म्हणजे आपण देवांना घातलेले रोजचे

स्नान,,,मित्रानो आपण देवाला स्नान घालतो ते मूर्तीला नाही त्यात भाव महत्वाचा आहे,,मी तोच आहे,,त्याच्यात आणि माझ्यात अद्वैत आहे,,तो आणि मी वेगळा नाही,,आणि म्हणून जे काही मी माझे जीवन जगणार आहे ते त्याला स्मरूनच,,,भगवंताच्या मूर्तीची स्नान हे माझे स्नान आहे,,त्याचा नैवेद्य माझे भोजन आहे,,मित्रानो शेवटी संपूर्ण कर्मकांड ही बहिरांग उपासना आहे,,फक्त त्याचे स्तोम माजविले तर त्यामागील तत्वज्ञान हे आकलन होत नाही,,मग धर्मसंकल्पनेची हानी होते,,,आणि म्हणून बहिरांग उपासनेला तत्वाची जोड खूप महत्त्वाची आहे त्याशिवाय चित्त शुद्धी होत नाही,,पण अहंकार वाढतो,,,,आणि म्हणूनच गणेशबाबतचे तत्वज्ञानात्मक अभ्यास केल्यावर आता त्याच्या सगुण रूपाचे दर्शन पुढील भागात,,,

## भाग–५६

**एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम। रदं च वरदं हस्तैर्विभ्राणंमूषकध्वजम । रक्तं लंबोदरं शूर्पकर्ण कंरक्तवाससम्। रक्तगंधा। नुलिप्तांगंरक्तपुष्पैः सुपुजितम।। भक्तानु कंपिनं देवं जगत्कारण मच्युतम आविर्भूतंच सृष्टया दौप्रकृतेपुरुषात्परम। एवं ध्यायतियो नित्यं स योगी योगिनांवर :**




हरिओम सुप्रभात मित्रानो:गणेशाचे निर्गुण निरकाराचे अनुसंधान आपण सर्वांनी केले,, गणेशाच्या मंत्राचे स्मरण केले ,,गणेश गायत्रीच्या उच्चारण केले,,,आणि श्री गणेश आता साक्षात आपल्यासमोर उभे आहेत सगुण साकार रुपात,,,

एकदंतम चतुरहस्तम:–गणपतीला एक दात आहे,,अद्वैत मताला पुरस्कार करणारा,व द्वैत मताचे खंडन करणारा ,,,असा,,ह्याबाबत चे विवेचन आपण ह्यापूर्वी बघितले आहे,,,तो मायेचा अधिपती आहे,,खंडित दात हा अवैदिक मताचे खंडन केले त्याचे प्रतीक आहे,, एकदंत ह्या शब्दातून एकात्मिक मायेचे निर्देशन केले आहे,,,

चतुरहस्तम:–श्री गणेशाला चार हात आहेत,,,श्री विष्णूचे चिंतन करताना सुद्धा शंख चक्र गदा पदम ज्याने आपल्या हाती धारण केले आहे असे वर्णन आपणास पहावयास मिळते,,,ह्याची प्रतिकात्मता

पण देण्यात आलेली आहे,,,,श्री गणेशाच्या चारही हातात जी आयुधे आहेत त्याचे वर्णन पुढे येईलच पण आपल्या साधनेच्या दृष्टीने आपण त्याचा विचार केला तर प्रत्येक चार बाबींचे अनुसंधान आपण गणपतीचे चार हात पाहून करायला हवे। ,,,त्या बाबी म्हणजे

अंत:करण चतुष्टय:–शरीर मन बुद्धी चित्त अहंकार

चार पुरुषार्थ:–धर्म अर्थ काम मोक्ष

चार वाणी:–परा, पष्यांती,मध्यमा वैखरी

चार वेद:–ऋग्वेद,अथर्ववेद,यजुर्वेद,सामवेद,

ह्या चारही बाबींचे अनुसंधान ह्याठिकाणी महत्वाचे ठरते ,,आणि हीच खऱ्या अर्थाने गणेश साधना आहे,,कारण वर नमूद केलेल्या चारही बाबी माझ्या जीवन जगण्याचे प्रमाण आहेत,,जीवन जगण्याचे प्रमाण ह्यासाठी की ह्या देशात वेद प्रणित जीवनप्रणाली अस्तित्वात होती,,,हे तर आहेच पण जे स्वत: बाबतचे ज्ञान आहे ते मानवाला उन्नत बनविते,,,

मित्रानो,,गणपतीचे पूजन ध्यान अनुसंधान करताना हे विवेचन व ह्यापुढील विवेचन खूप महत्वाचे ठरते करण मग त्यातील औपचारिक भाग आपलाही गळून पडायला हवा,,,गणपतीला विशिष्ट रंग आवडतो तो का??त्याने लाल रंगाचे वस्त्र परिधान केले ते का??त्याला मोदकच का आवडतो??त्याच्या हाती दोरी का आहे,,,त्याच्या हाती दंत का आहे??खूप मोठा आशय आहे ह्यात,,,ह्या गोष्टी आपण समजून घेणे खूप महत्वाचे आहे,,,,,,

श्री गणेशाचे चार हात ह्याचे वरील प्रमाणे विवेचन हे आपल्या आंतरिक विकासाच्या दृष्टिकोनातून खूप महत्वाचे ठरते,,,,

## भाग – ५७

एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम। रदं च वरदं हस्तैर्विभ्राणंमूषकध्वजम । रक्तं लंबोदरं शूर्पकर्ण कंरक्तवाससम। रक्तगंधा। नुलिप्तांगंरक्तपुष्पैः सुपुजितम।। भक्तानु कंपिनं देवं जगत्कारण मच्युतम आविर्भूतंच सृष्टया दौप्रकृतेपुरुषात्परम। एवं ध्यायतियो नित्यं स योगी योगिनांवर :




श्री गणेशाचे प्रत्यक्ष सगुण साकार रूप आपल्यासमोर उभे ठाकले आहे,,आणि आपण त्या सगुण साकार रूपातून आपल्या साधनेला पक्केपणा आणतो आहोत,,श्री गणेशाच्या एकदंत रूपाचे अनुसंधान आपण केले आणि तत्वाच्या दृष्टिकोनातून त्याच्या चार हातांच्या संदर्भात आपली दृष्टी कशी असावी ह्याचा पण विचार केला,,त्याचा आणखी विस्तार पहावयाचे असल्यास

चार वर्ण:–ब्राह्मण,क्षत्रिय,वैश्य,शूद्र

चार मुक्ती:–सलोपता,समीपता, सरूपता, सयूज्यता

चार अवस्था:–बद्ध,मुमुक्षु,साधक सिद्ध

चार भक्त:–आर्त, जिज्ञासू,अर्थार्थी, ज्ञानी,

चार शक्ती:–इच्छाशक्ती,क्रियाशक्ती, द्रव्यशक्ती,ज्ञानशक्ती

आशा अनेक तत्वज्ञानात्मक गोष्टींचे अनुसंधान आपणास करता येईल,,,,

पण गणेशाने आपल्या हातात चार आयुधे धारण केली आहेत,,,

पाशमअंकुश धारिणम:–श्री गणेशाने आपल्या हातात पाश(दोर) धारण केला आहे,,,मानवाला त्याच्या जीवनात छळणारे दोन पाश आहेत,,,हे पाश माणसाच्या जीवनात दु:ख ला कारणीभूत ठरतात,,

१)मोहपाश:–माणूस मोहात अडकतो,,मोह म्हणजेच वास्तुबाबत चे आपणास कायम विपरीत ज्ञान होते,,,जे जे माझे आहे ते ते मी नाही हा सिद्धांत माणूस विसरतो आणि जे जे मी नाही ते ते माझे माझे म्हणतो,,,ह्यालाच मोह म्हणतात आणि ह्याचा पाश इतका घट्ट असतो की तो सुटता सुटत नाही,,,आणि माणूस आपल्या जीवनाची हानी करून बसतो,,,मी नेमका कोण आहे हे न जाणल्यामुळे तो कायम मोहपाशात अडकतो

२)प्रेमपाश:–प्रेम हा जरी स्थायी भाव असला तरी त्या प्रेमाची दिशा कोणती आहे हे खूप महत्वाचे ठरते,,सांसारिक प्रेम हे माणसाला स्वरूपाची प्राप्ती करून देऊ शकत नाही,,कारण हे प्रेम माणसामध्ये आसक्ती निर्माण करते,,पण ह्याच प्रेमाची दिशा परमेश्वराकडे उच्च तत्वाकडे वळविली तर जीवनात आनंद निर्माण झाल्याशिवाय राहत नाही,,,

मग आता आपल्या जीवनाची उन्नती अधोगती आपल्याच हाती आहे,,,गणेश ह्या पाशापासून आपली सुटका आपण करून घेण्याबाबत आपल्याला सुचवतो आहे,,,

पाश मोहमयं तस्य!!स्वभक्त मोहनाशनम!!


आता आपण असाही अर्थ काढू शकतो की आपल्याला मोहपशातून प्रेमपाशातून(भवपाशातून) गणपती स्वत:च्या म्हणजेच तत्वाच्या पाशात ओढून घेतो,,,तत्वपाश जीवनाला उन्नत तर करतोच पण सर्व पाशातून आपली सुटका करतो,,

अंकुश धारीणाम:–हत्तीवर असलेल्या माहुताच्या हाती अंकुश असतो तो नियंत्रण ठेवण्यासाठी,,,आपल्या जीवनात सर्वात नियंत्रणाची गरज जर कुणाला असेल तर ती आपल्या मनाला,,,खूप विचित्र वागते ते,,आणि त्यामुळे जीवनात अनेक समस्या निर्माण करते,,अशा वेळी ताबडतोब ह्या मनाची दिशा परमेश्वराकडे वळविल्यास त्यावर अंकुश ठेवण्याचे कार्य गणेश करतो,,आणि आपल्या मनाचा प्रवाह नियंत्रित करतो,,आपल्याला ज्ञानाची प्राप्ती करायची असेल तर हा अंकुश महत्वाचा आहे,,,,

मित्रानो ,,प्रत्येकवेळी बुद्धीवाद कार्य करीत नाही,,साधनेच्या दृष्टिकोनातून श्री गणेशाच्या ह्या विलोभनीय स्वरूपाचा आपल्याला साक्षात्कार करून घ्यायचा आहे आणि आपले जीवन सार्थक करून घ्यायचे आहे,,,हे गणेशरूपी धन आपण सर्वांना प्राप्त होवो ही आज धनतेरस च्या शुभ दिनी श्री गणेशाच्या चरणी प्रार्थना करते,,

## भाग–५८

**एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम। रदं च वरदं हस्तैर्विभ्राणंमूषकध्वजम । रक्तं लंबोदरं शूर्पकर्ण कंरक्तवाससम। रक्तगंधा। नुलिप्तांगंरक्तपुष्पैः सुपुजितम।। भक्तानु कंपिनं देवं जगत्कारण मच्युतम आविर्भूतंच सृष्टया दौप्रकृतेपुरुषात्परम। एवं ध्यायतियो नित्यं स योगी योगिनांवर :**




गणपतीच्या चार हातांचे वर्णन पाहत असताना साधनेच्या दृष्टिकोनातून आपण पाहायला हवे,,आणि साधक म्हणून आपण साधनचतुष्टय संपन्न व्हावे अर्थात

विवेक

वैराग्य

शट संपत्ती (शम, दम,उपरम, तीतीक्षा, श्रद्धा, समाधान,)

मुमुक्षु

(आपण साधन चतुष्टय बनून चित्ताची शुद्धी करून ज्ञानासाठी पात्र बनणे हे खऱ्या अर्थाने अभ्यंग आहे,,,आणि ह्याच अभ्यंगचा निश्चय आपण करायला हवा,,,ह्यासाठी कर्म उपासना भक्ती नाम ही साधने आपण वापरायची आहेत)

बनण्याचा निश्चय करणे ही साधनेच्या प्रांतात प्रवेश करण्याची पात्रता आहे,,आणि छात्र हा पात्र असावा हा नियम आहे,,,आणि मी जर साधक आहे तर मला हा नियम पाळणे आवश्यकच आहे,,,

अशा श्री गणेशाने आपल्या हाती पाश आणि अंकुश धारण केला

आहे,,साधन चतुष्टय संपन्न साधक व्हावा ह्यासाठी श्री गणेशाची ही योजना आहे,,सगळ्या पार्थिव पाशात आपण गुरफटला असताना तो आपल्याला त्याच्या अनुसंधानाच्या पाशात ओढून घेतो,,आणि आपल्या मनावर अंकुश ठेवतो,,

मित्रानो,साधनेच्या काळात जीवनात अनेक प्रसंग येतात,,ही सर्व प्रारब्ध वश असतात आणि ती भोगावी लागतात आणि भोगून ती संपवावी लागतात,,आशा वेळी व्यक्तीच्या निष्ठेची कसोटी लागणार आहे,,त्याच्या परीक्षेत आपण उतरायला हवे,,,आल्या प्रसंगाचे स्वागत करायला हवे,,,करण आपल्या जीवनातील प्रत्येक प्रसंगाचे निश्चित काही प्रयोजन असते,,,ईश्वर हा प्रत्येकवेळी आपल्याला संधी देत असतो त्याच्या शक्तीला जाणण्याची आणि त्याचे अनुसंधान करण्याची,,,फक्त आपल्याला ते ओळखता आले पाहिजे,,,

नित्य नवा क्षण जागृतीचा,,,हा भाव पक्का हवा,,,जीवनात विपरीत प्रसंग येतील,दुःखाचे क्षण येतील,आपली परीक्षा पाहण्याचे क्षण येतील,,अपमानाचे क्षण येतील येतील,,कुणी विरोधात जातील,,आपलेच आपल्याला नाकारतील, सगे सोयरे साथ सोडतील,,प्रेमाची माणसे दुरावतील,, अशी अनेक प्रसंग येतील,,पण ही सर्व प्रसंग म्हणजे श्री गणेशाची आपल्याकडे कृपा दृष्टी आहे हे नक्की समजा,,आणि त्याने हाती पाश व अंकुश घेऊन त्याची कृपा आपल्यावर होणार आहे,,,फक्त ती कृपा मला ओळखता आली पाहिजे,,,आणि माझ्या जीवनाची उन्नती मला करून घेता आली पाहिजे,,,

अशी जेव्हा जेव्हा आयुष्यात प्रसंग येतील तेव्हा निश्चित समजा की ते श्री गणेशाचे आपल्याला आमंत्रण असेल साधनेसाठी,,,जीवनात विपरीत प्रसंग येणे हे प्रारब्ध आहे पण त्यातून

योग्य मार्ग काढून साधनेची बळकटी करणे हा पुरुषार्थ आहे,,आणि परमपुरुषार्थाची प्राप्ती हे आपले जीवनध्येय आहे,,


रदमच वरदम हस्ते :–त्याच्या डाव्या हातात हस्तीचा दात आहे,,

विभ्रणम मूषकम ध्वजम:–गणपतीच्या हाती ध्वजा असून त्यावर मूषक आहे,,,

ह्याचे विस्तृत वर्णन पुढील भागात,,,,

# भाग–५९

**एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम। रदं च वरदं हस्तैर्विभ्राणंमूषकध्वजम । रक्तं लंबोदरं शूर्पकर्ण कंरक्तवाससम्। रक्तगंधा। नुलिप्तांगंरक्तपुष्पै: सुपुजितम।। भक्तानु कंपिनं देवं जगत्कारण मच्युतम आविर्भूतंच सृष्टया दौप्रकृतेपुरुषात्परम। एवं ध्यायतियो नित्यं स योगी योगिनांवर :**




श्री गणपती च्या सगुण साकार दर्शनाने आपली साधना बळकट करायची आहे,आणि आपल्याला साधनचतुष्टय संपन्न होऊन गुणलक्ष्मी चे आवाहन करून तिला स्थिरो भव ही प्रार्थना करायची आहे,,आणि ज्ञानाची दिवाळी साजरी करायची आहे,,

रदमच वरदम हस्ते:–श्री गणपतीच्या डाव्या हातात हत्तीचा दात आहे,,ह्याबाबत काही कथा आहेत,,असे म्हटले जाते की एकदंत हा श्री गणेशाचा पहिला अवतार आहे आणि ह्या अवतारात त्याने मदासुराचा वध केला,,दुसरे निर्देशन असे असे आहे की गणेशाने देवांतक व नारांतक ह्या दोन असुरांचा नाश केला तेव्हा हस्तिदंताचा वापर केला,,देवांतक हा देवांना त्रास देणारा असुर तर नारांतक हा मानवांना त्रास देणारा असुर होता,,तिसरे निर्देशन आहे की परशुरामाशी जेव्हा घनघोर युद्ध झाले तेव्हाही त्यांनी हाच हस्तिदन्त वापरला होता,,,

आता ह्यातील प्रतिकात्मकता लक्षात घ्यायची असेल तर आपल्यातील मद मोहाचा नाश करणारा,आपल्यातील राक्षसी प्रवृत्ती

ना नेस्तनाबूत करण्यासाठीचे प्रतीक म्हणजे हस्तिदन्त आहे,,आपल्यातील दुष्ट प्रवृत्तीचा विनाश करण्यासाठी गणेशाच्या हाती हस्तिदन्त आहे, दुसऱ्या हाताने तो अभय मुद्रा देतोय,,श्री गणेशाची अभय मुद्रा भक्ताला आनंद प्रदान करणारी आहे,,साधनचतुष्टय संपन्न साधकाची साधना बळकट झाली की त्याला आनंदाशिवाय दुसरे काय प्राप्त होणार??हा खूप मोठा आशावाद श्री गणेश आपल्याला देतो,,,त्याचा मनाला मोद म्हणजेच आनंद देणारा मोदक रुपी आशीर्वाद तो आपल्याला कायम देतोच आहे पण आपल्या स्वभक्तीने तो संपादन करणे प्राप्त करणे हे साधक म्हणून आपले कर्तव्य आहे,,विभ्रणम मूषक ध्वजम:–ध्वजावर पताका असून त्यावर मूषक आहे,,,आता मूषकाची प्रतिकात्मकता पहा,,मूष म्हणजे अज्ञान आणि क म्हणजे नाश करणारा,,,म्हणजेच मूषक हा अज्ञानाचा नाश करणारा आहे ,,ज्ञानाचे प्रतीक आहे,,उंदराची सवय आपण सर्वांना माहीत आहे तो रात्री घरभर फिरून कुर्तांडण्याचे काम करतो,,अज्ञानाला कुरतडून टाकणे महत्वाचे आहे, भृ ह्या धातूपासून विभ्रणम हा शब्द झाला,,म्हणजेच धारण करणे,,म्हणजेच ज्ञानाची क्षमता असलेली पताका श्री गणेशाने धारण केलेली आहे,,सायनाचार्यांनी मूषकाचा अर्थ सांगितला आहे,ते म्हणतात ‘‘मूष्णाती हरती कर्मफलानी ‘‘ह्याचाच अर्थ असा आहे की आपल्याला कर्माचा त्रास होत नाही पण कर्माबाबत ची आपली जी प्रतिक्रिया असते त्याचा त्रास होतो,,,ह्या प्रतिक्रिया अहंकार युक्त असतात,,सुख दुःखाचा असतात ह्या कर्मफळाचे अपहरण करणारा मूषक हा ज्ञानाचे प्रतीक आहे,,, मित्रानो ह्यालाच उपासना म्हणतात,,छोट्या छोटी गोष्टीत आपण दिव्यत्वा पाहतो,,हे आपल्या संस्कृतीचे सौन्दर्य आहे,,आणि म्हणूनच आपल्याला सर्वच उपयुक्त प्रेरक व महत्वाचे आहेत,,,ह्याबाबत चे विवेचन पुढील भागात,,,,,

# भाग–६०

**एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम। रदं च वरदं हस्तैर्विभ्राणंमूषकध्वजम । रक्तं लंबोदरं शूर्पकर्ण कंरक्तवाससम्। रक्तगंधा। नुलिप्तांगंरक्तपुष्पैः सुपुजितम।। भक्तानु कंपिनं देवं जगत्कारण मच्युतम आविर्भूतंच सृष्टया दौप्रकृतेपुरुषात्परम। एवं ध्यायतियो नित्यं स योगी योगिनांवर :**




स्थानम प्रधान:न बलं प्रधानं,,,अशी महत्वाची शिकवण देणारा मूषक हा आपला अहंकाराचे प्रतीक आहे आणि हा अहंकार ईश्वराला अर्पण केल्यास जीवनाला अर्थ प्राप्त होतो,,प्रपंचात कितीही नाही म्हटले तरी अहंकार ठेवावाच लागतो,,फक्त तो ईश्वराला व सद्गुरूला अर्पण करणे महत्वाचे आहे,,

रक्तम लंबोदरम:–गणपतीचा रंग लाल रक्तवर्ण असा वर्णन केला आहे,,तांबडा रंगाचे वर्णन ह्या ठिकाणी आहे,,तांबडा रंग हा ज्ञानाचे प्रतीक आहे,,गणपती ही ज्ञानाची देवता आहे,,वैराग्याची देवता आहे,,आणि ह्याचे महत्वाचे कारण बुद्धीची देवता म्हणून आपण गणेशकडे पाहतो,,बुद्धी ची देवता म्हणजे अग्नी,,आणि अग्नीचा रंग तांबडा असतो,,आणि म्हणून तांबडा रंग ज्ञानाचे प्रतीक आहे,,,तसेच अग्नी हे तपश्चर्येचे प्रतीक आहे,,वैराग्याचे प्रतीक आहे ,,,आपल्याला

गणपतीची उपासना करायची असेल तर अंत:करण सुद्धा तपस्वी असायला हवे,,,म्हणून तपश्चर्या ज्ञान वैराग्य ह्याचे प्रतीक म्हणून तांबडा रंग आहे,,

लंबोदर:–लंब उदरम,, गणपतीचे पोट विशाल आहे,,ऋषींची ह्यामगिल अनुभूती खूप विलक्षण आहे,,,ज्ञानेश्वरीत ह्या आशयाची ओवी आहे,,

अकार चरण युगुल!उकार उदर विशाल!
मकार महामंडल!मास्तकाकारे!!
हे तिन्ही एकवटले!तेथे शब्द ब्रह्म कवळले!
ते म्या गुरुकृपा नामिले!आदीबीज!!!


पायापासून ते मस्तकापर्यंत केलेले हे गणपतीचे ध्यान आणि ऋषींची अनुभूती ह्यातील साधर्म्य आपल्या लक्षात येईलच,,,

ओंकार शब्द ब्रह्माच्या ‘उकार ‘म्हणजेच उदर हे हिरण्यगर्भाचे प्रतीक आहे,,हिरण्यगर्भ हे समष्टी सूक्ष्म शरीराचे उगमस्थान आहे,,‘‘‘देहाभिमानी आत्मा,,हिरण्यगर्भ उच्चते‘‘‘!!जेथून समष्टी जगताची उत्पत्ती झाली असे ब्रह्मदेवाला हिरण्यगर्भ म्हणतात,,,

ही सूक्ष्म अवस्था आहे,,सगळ्या बाबींचे बीज हे सूक्ष्म शरीरात असते,,आणि समष्टी सूक्ष्म शरीराशी एकरूप झालेले जे चैतन्य आहे त्याला हिरण्यगर्भ म्हणतात,,तावोदर भवात सर्वे!!त्याच्या उदरापासून सर्व निर्माण झाले आहे,,पण तो मात्र कुणाच्याही उदरापासून निर्माण झाला नाही,,,तो सर्वांचे कारण आहे पण त्याचे कारण कुणीच नाही,,,तत्वाच्या स्तरावर ही दृष्टी पक्की हवी,,

# भाग–६१

एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम। रदं च वरदं हस्तैर्विभ्राणंमूषकध्वजम । रक्तं लंबोदरं शूर्पकर्ण कंरक्तवाससम्। रक्तगंधा। नुलिप्तांगंरक्तपुष्पैः सुपुजितम।। भक्तानु कंपिनं देवं जगत्कारण मच्युतम आविर्भूतंच सृष्टया दौप्रकृतेपुरुषात्परम। एवं ध्यायतियो नित्यं स योगी योगिनांवर :




गणपती च्या सगुण साकार रूपाचे वर्णन आपण पाहत आहोत,,

लंबोदर गिरीजनांदना!पूर्ण करी मोक्षाची कामना!!

जीवनाची सर्व श्रेष्ठ कामना ही मोक्षाची आहे,,बाकी सर्व भौतिक कामानांची पूर्ती करणारा म्हणजेच भौतिक कामनाना पूर्णविराम देणारा गणेश व मोक्षाची कामना जागवणारा गणेश म्हणूनच श्रेष्ठ ठरतो,,,म्हणूनच लंबोदरअसे म्हणत असताना सर्वसमावेशकता आपल्या ध्यानात यायला हवी,,

शूर्पकरणकम:–सुपासरखे ज्याचे कान आहेत,,सुपामध्ये कोंडा धान्य दोन्ही असते पण पाखडले असताना स्वच्छ धान्य बाजूला होते आणि कोंडा फेकला जातो,,,खरच संतांनी आपल्या जीवनातच भक्ती रुजवली म्हणजे काय केले हे लक्षात येते,,,पाखडल्यानंतर शुद्ध धान्य जे खाण्या जोगते असते ते मागे राहते आणि फोलकट गोष्टी फेकल्या जातात,,,आपण व्यवहार करताना असे राहू शकू??

किती प्रसंग येतात जीवनात जेव्हा काहीतरी आपण ऐकतो आणि गैरसमज करून बसतो,,,त्यानंतर संपूर्ण आयुष्य ह्या गैरसमाजच्या धगधगण्यात जाते,,आणि जेव्हा तो गैरसमज होता ह्याचे आकलन होते तेव्हा मात्र वेळ निघून गेली असते,,

'''भद्रम कर्णेभी श्रुणूयाम देवा''ह्या प्रार्थनेचे प्रतीक म्हणजे श्री गणेशाचे कान आहेत,,,जेव्हा आपण शास्त्राचे श्रावण करतो तेव्हा त्यातील आत्मविचार घेऊन त्याचे पर्यवसान आत्मनात्म विवेकात व्हायला हवे,,,मागेच सांगितल्याप्रमाणे अविद्या मायेने युक्त ब्रह्म म्हणजे जीव व विद्यामायेने युक्त ब्रह्म म्हणजे ईश्वर,,,पण ह्या दोहोंना मागे सारून विवेकाने ब्राह्मतत्वाची प्राप्ती करून घेणे महत्वाचे आणि ह्याची प्रतिकात्मकता म्हणजे श्री गणेशाचे कर्ण होय,,

आपल्या उपासनेने हे वेगळे करून आपणास शुद्ध ब्राह्मची प्राप्ती होते,,आणि हे सोहम भावनेने शक्य होते,,,आपल्या अंतःकरणातील अशुद्धता दूर करून,त्यातून शुद्ध ज्ञान प्राप्त करून देण्याचे काम आपले चिंतन करीत असते,,,शास्त्राचे श्रवण करावे व सार स्वीकारावे व असार सोडून द्यावे,,,

आणि सर्वात महत्वाचे की कोणतेही ज्ञान घेण्याचे पाहिले प्रवेश द्वार म्हणजे श्रवणच आहे,,,श्रावणाच्या माध्यमातून भगवंत आपल्या हृदयात प्रवेश करतो,,,नव विधा भक्ती मध्ये पहिली भक्ती श्रवण सांगितली आहे,,ह्या सर्व साधनापद्धतीचे निर्देशन ह्यात आपणास आढळते,,,,

रक्तवासासम:-गणपतीचे वस्त्र हे रक्तवर्णीय तांबडे आहे,,श्री गणेशाला वस्त्र अर्पण करायचे असेल ते ज्ञानयुक्त अंतकरणाने समर्पित करावयास हवे,,,वस्त्र हे जे नाशिवंत देह आहे तो झाकण्यासाठी वापरले जाते,,भोतिकतेला मागे सारून ज्ञानप्राप्ती करायची आणि


ह्यासाठी आपले ज्ञानरुपी वस्त्र हे अज्ञानाला झाकायला समर्थ ठरते,,,किती सुंदर प्रतिकात्मकता आहे,,

रक्तगंधानु लिप्तगम:–श्री गणेशाची रक्तवर्णीय रक्तचंदन ची उटी लावली आहे,,मित्रानो अनेक भौतिक तपाने आपण पोळतो अशावेळी मनाला शांत करणे खूप गरजेचे असते,,शरीर जेव्हा पोळतो तेव्हा चंदन ची उटी शीतलता प्रदान करते ,,,मन जेव्हा भौतिक तपाने पोळते तेव्हा ज्ञानयुक्त अनुसंधान रुपी चंदन हे मनाला शीतलता प्रदान करते,,,ही त्यामागील धारणा आहे,,,

आता ह्या सर्व गोष्टी म्हणजेच गणपतीला लाल रंग आवडतो म्हणून लाल रंगाचा वापर आपल्या पूजनाच्या साहित्यात वापरताना त्यामागे ही ज्ञानाची दृष्टी असायला हवी,,,गणपतीला आवडत ह्यापेक्षा त्याच्या मागे असणारी माझी साधना गणपतीला आवडते असा विचार महत्वाचा आहे,,,,,

# भाग–६२

एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम। रदं च वरदं हस्तैर्विभ्राणंमूषकध्वजम । रक्तं लंबोदरं शूर्पकर्ण कंरक्तवाससम। रक्तगंधा। नुलिप्तांगंरक्तपुष्पै: सुपुजितम।। भक्तानु कंपिनं देवं जगत्कारण मच्युतम आविर्भूतंच सृष्टया दौप्रकृतेपुरुषात्परम। एवं ध्यायतियो नित्यं स योगी योगिनांवर :




मित्रानो गणपतीला लाल रंग आवडतो,,हे विधान आपण नेहमी ऐकतो,,लाल तांबडा रंग ज्ञानाचे प्रतीक आहे,,गणपती तर ज्ञान स्वरूपच आहे,,आणि म्हणून गणपतीला तो रंग अवडण्यापेक्षा तो रंग मला आवडणं महत्वाचे आहे,,आणि कोणतीही उपासना ही दृष्टी ठेऊन मी करायला हवी,,,

रक्तपुष्पे सुपूजितम:– गणपतीला लाल रंगाचा फुलाने पूजन करावे,,पुष्प म्हणजेच सुमन,,शुद्ध अंतकरणाने,शुद्ध भक्तिभावाने श्री गणपतीला पुष्प अर्पण करावे,,,सुमन अर्पण

करावे म्हणजेच आपले मन त्याला अर्पण करावे व हे मन ज्ञानयुक्त बुद्धीच्या क्रमविकासाअंती अर्पण करावे,,असा पुष्प अर्पण करण्यात खरा आनंद प्राप्त होतो,,,येथे आणखी एक बाब चिंतनीय ठरते ती अशी की ,,मन ही अंतकरणाची वृत्ती आहे की जिच्या प्रभावाने मानवाचे व्यवहार चालतात,,आणि म्हणून सर्व संतांनी सुद्धा मानवी

मनावरचं लक्ष केंद्रित केले आहे,,समर्थांनी २०० वेळा मनाशी संवाद साधला जेव्हा त्यांनी मनाच्या श्लोकाची रचना केली,,,अशा ह्या मनालाच खरच प्रशिक्षणाची खूप गरज असते,,आणि म्हणून वारंवार आपल्या मनाची दिशा ही ज्ञानाकडे असली तर जीवनाचे वास्तव दर्शन तर होईलच पण त्याचसोबत आपले मन बुद्धी चित्त अहंकार त्याला समर्पित केले तर त्यांचा लय व्हायला वेळ लागणार नाही ह्यालाच संतांनी ‘‘‘आपुले मरण पाहिले म्या डोळा‘‘‘,,,असे म्हटले आहे,,,

मृत्यू म्हणजे फक्त शरीराचाच असा आपला समज झाला आहे ,,,पण संतांची अनुभूती विलक्षण आहे,,,‘‘‘ह्याची देही ह्याची डोळा‘‘‘‘,,,जेवढी शरीराच्या मृत्यूची स्वाभाविक प्रक्रिया आहे तेवढीच स्व च्या मृत्यूची घडली तर तो मोक्ष पुरुषार्थ घडेल,,,किती प्रेरणादायी विचार आहेत हे,,,श्वास संपले त्याला आपण मृत्यू म्हणतो पण श्वास असून देहबुद्धी संपणे ,,कायम स्वरूपी लय पावणे ह्यालाच तर मोक्ष म्हणतात,,,आणि ह्यासाठी आपल्या प्रत्येक कर्ममागे भक्तिभाव असावा,,प्रत्येक भक्ती ज्ञानयुक्त अंतकरणाने घडावी आणि ज्ञानप्राप्तीचा मार्ग हा भक्तीच्या पायवाटेवरून जावा,,,खूप समृद्ध करणारी ही विचार धारा आहे,,

अथर्वशीर्षात ह्या सर्वांचा अंतर्भाव आहे,,कर्म उपासना भक्ती ज्ञान ह्याचा सुंदर मिलाप आपल्याला अथर्वशीर्षात बघावयास मिळतो,,,आशा भक्तीयुक्त अंतकरणातून आपण परमेश्वराला जे अर्पण करतो ते तो स्वीकारतो,,शबरीने बोरे स्वतः खाऊन पाहिले पण भगवंतांनी ते स्वीकारले,,सुदम्याचे पोहे स्वीकारले तो मला स्वीकारणार नाही का??पण त्यासाठी महत्वाचे माझे अंत:करण सुमन असायला हवे,,,अगदी शबरीसारखे सुदाम्यासारखे,,,,,

मित्रानो ज्या भावनेने आपण गणपतीला पुष्प वाहतो त्याच शुद्ध


मनाने आपला प्रपंचाहि त्याच्या चरणी ज्ञानयुक्त अंतकरणाने अर्पण केला तर आपल्या मार्गात कितीही विघ्न आले तर त्या विघ्नांचे नाश ही तोच करतो,,,करण आपल्या देहाचे प्रारब्ध आपल्याला भोगावेच लागणार फक्त ते प्रसाद म्हणून पाहिले तर भोगणे हा भाग नाहीस होईल व त्याठिकाणी ग्रहण करणे आणि तेही आनंदाने,,,किती छान,,गणपतीला लाल फुल आवडते की मला???आता हे लाल फुल मला माझ्याचसाठी वाहता यायला हवे,,,

सुपूजितम:-पूजन करणे हा आपल्या आनंदाचा भाग असावा,,पूजा ही उरकून टाकण्याचे कार्य नाही,,आनंदाने केलेले कोणतेही कार्य हे ईश पूजन आहे पण उरकून घेण्याची पूजा हे ईश पूजन होणार नाही,,मग ते कितीही वेळचे असू देत,,,देवचिये द्वारी उभा क्षणभरी''असे म्हटले ते उगीच नाही,,,म्हणून ईशपूजा हे कर्मकांड न बनता प्रत्येक कर्म हे ईशपूजन व्हावयास हवे,,,हे सुपूजन आहे,,,हे सर्व गणपतीला आवडत म्हणजेच मला आवडत कारण तत्वाच्या स्तरावर मी आणि गणपती अभिन्न आहोत,,,किती छान,,,आत्मरुप ब्रह्मरूप गणेशाचे पूजन,,,



## भाग–६३

एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम। रदं च वरदं हस्तैर्विभ्राणंमूषकध्वजम । रक्तं लंबोदरं शूर्पकर्ण करंक्तवाससम। रक्तगंधा। नुलिप्तांगंरक्तपुष्पै: सुपुजितम।। भक्तानु कंपिनं देवं जगत्कारण मच्युतम आविर्भूतंच सृष्टया दौप्रकृतेपुरुषात्परम। एवं ध्यायतियो नित्यं स योगी योगिनांवर :




गणपतीच्या सगुण साकार रूपाचे दर्शन आणि त्या दर्शनाने साधनेला मिळणारी दिशा हे सर्वच विलोभनीय आहे,,गणपती पूजनाकडे कर्मकांड म्हणून न बघता साधना म्हणून पाहिल्यास जीवनाची उन्नती आहे,,आणि कर्मकांड म्हणून पाहिल्यास तेथे अहंकाराची वाढ होण्याची शक्यता जास्त आहे,,आणि कर्मकांडाचा अहंकार सर्वात घातक,,, असो,,

भक्तानुकंपिनमं देवम:–श्री गणपती हा भक्तांवर अनुकंपा करणारी देवता आहे,,म्हणजेच तो भक्तांवर कृपा करणारा आहे,,आता ह्याठिकाणी भक्तांवर म्हणजे कुणावर कृपा करणार??जे भक्त नाही त्यांच्यावर कृपा होणारच नाही का??कृपा म्हणजे काय?? असे विविध प्रश्न आपल्या मनात उभे राहतात,,

भक्तांची एक परिभाषा खूप छान आहे,,जो विभक्त नाही तो,,ज्याच्या मनात कायम भगवंताचे प्रेम ओथंबून वाहते आहे तो

भक्त,,,तो अखंड भगवंतांच्याच अनुसंधानात असतो,,तो खरा भक्त,,आणि अशा भक्तांवर अनुकंपा करतो म्हणजे काय??

सर्वसाधारण पणे आपली कृपेची परिभाषा वेगळी आहे,,गणपतीने माझ्यावर कृपा करावी म्हणजे ,,'मला कोणताही आजार व्हायला नको,मला दुःख व्हायला नको,मला भरपूर वैभव मिळावे,,सत्ता संपत्ती मान सन्मान मिळावा,,माझ्या कौटुंबिक जीवनात मला कोणतेही चढाव उतार नको,,''''

अशी आपली कृपेची परिभाषा आहेत,,पण मित्रानो हे तर आपल्या प्रारब्धाचे घटक आहे आणि ते ह्या देहसोबतच मी घेऊन आलेलो आहे ह्यात कुणीही बदल करू शकत नाही,,यम देवता आपल्या मृत्यूचा एकही क्षण कमी करू शकत नाही आणि ब्रह्मदेव एक सेकंदही उशिरा जन्माला घालू शकता नाही,,आणि आलेला प्रत्येक जीव आपले स्वतंत्र नशीब घेऊन जन्माला आला आणि आपल्या कर्माच्या साहाय्याने तो आपले भविष्याला आकार देतो,,

पण आता अनुकंपा करताना गणपती भक्ताला आपल्या जवळ ठेवतो म्हणजेच सतत त्याच्या अनुसंधानात ठेवतो,,आपल्याला चांगली बुद्धी देतो,,आपले प्रारब्ध भोगण्याची क्षमता देतो,,फक्त आपल्याला तशी दृष्टी हवी,,आता जे गणपतीचे भक्त नाही त्यांचे काय,,,,,तो हातात पाश घेऊन बसलाय न,,त्या तत्वाकडे माणसाला जाण्यासाठी तो अनेक संधी उपलब्ध करून देतो,,,

मित्रानो ,,जीवनात असे अनेक प्रसंग येतात जे प्रसंग पाहून आपल्या मनात हा विचार येतो की हा प्रसंग माझ्या जीवनात का आला??हे असे व्हायला नको होते,,पण मित्रानो प्रारब्धानुसार घडणाऱ्या ह्या घटना आहे,,पण त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग गणेश नावाचे तत्व आपल्याला दाखवितो,,,आणि ही योजनाच त्या करीत


असते,,म्हणून घडणाऱ्या घटनांचे आकलन,,त्या घटनांना स्वीकृती आणि त्यावर मात करण्याची क्षमता प्राप्त झाली की आपल्यावर कृपा झाली हे समजावे,,,

जे खरच भक्त असतात त्यांनी तर आपला प्रपंचाच ईश्वराच्या चरणी अर्पण केलेला असतो,,त्यांच्या बाबतीत जीवनात सुख असो की दुःख ती सर्व त्याच्या प्रेमास्पद भगवंतांचीच कृपा असते,,,ह्याच तर दृष्टीने ईश्वर कृपाळू असतो,,आता प्रश्न हा आहे की ही कृपा मला स्वीकारता येते का म्हणजेच कृपा ओळखण्याची माझी पात्रता मला वाढवावी लागेल,,,माझे कृपापत्र तेव्हाच भरेल जेव्हा ते मी भरण्यासाठी उपलब्ध करून देईल,,किती महत्वपूर्ण विचार आहे हा,,,,

माझ्या आयुष्यात जर सुरवातीपासून मी फक्त आणि फक्त दुःखच पाहत आले असेल तर त्या दुखकडे पाहण्याची माझी दृष्टी काय आहे ही बाब महत्वाची आहे,,‘’’आता मी किती दुःख झेलयचे???माझा जन्म दुःख सहन करण्यासाठीच आहे का??एवढे होऊन माझी कुणाला किंमत नाही’‘‘ही दृष्टी आपल्याला ईश्वरापासून दूर नेईल,,,पण ‘‘‘सुख दुःखे समे कृत्व !!लाभा लाभौ जया जयो!!‘‘‘’ही दृष्टी आम्हाला जीवन जगण्याची प्रेरणा देते,,आणि सर्वात मोठी अनुकंपा आहे ती आत्म कृपा,,,ज्ञान कृपा,,शास्त्र कृपा,,,गुरू कृपा,,,हे जर माझ्या जीवनात घडत असेल तर मी गणपतीची पूजा करो किंवा न करो मी त्याचा भक्तच आहे,,,करण माझ्या जीवनाला मी आहे तसे स्वीकारले आहे,,,आणि त्यामुळे आता मला त्याचे सुख दुःख नाही,,,गणेश तत्वाची उपासना म्हणून महत्वाची ठरते,,,,श्री गणेशाची ही कृपा आपल्यावर होवो हीच सदिच्छा व्यक्त करते,,,

# भाग–६४

**एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम। रदं च वरदं हस्तैर्विभ्राणंमूषकध्वजम । रक्तं लंबोदरं शूर्पकर्ण कंरक्तवाससम्। रक्तगंधा। नुलिप्तांगंरक्तपुष्पैः सुपुजितम।। भक्तानु कंपिनं देवं जगत्कारण मच्युतम आविर्भूतंच सृष्टया दौप्रकृतेपुरुषात्परम। एवं ध्यायतियो नित्यं स योगी योगिनांवर :**




श्री गणेश सगुण साकार रूपात आपल्यासमोर आहे आणि आपल्या सर्वांवर तो अनुकंपा करीत आहे,,पण त्याची अनुकम्पा आपल्यात सामावून घेणे स्वीकारणे ही आता आपली जबाबदारी आहे,,,

जगतकारण अच्युतम:––तो सर्व जगताचे कारण आहे पण तो आपल्या स्वरूपापासून ढळला नाही,,जगत ह्याचा अर्थ जे सतत परिवर्तनशील आहे,,ह्या जगात सर्वच परिवर्तनशील आहे हा ह्या जगाचा अपरिवर्तनीय नियम आहे,,ते देश काल परिछिन्न आहे पण जे ह्या सर्वांच्या पलीकडे तत्व आहे ते म्हणजे श्री गणेश,,,करण तोच सर्व जगताचे करण आहे,,ह्या सृष्टीच्या निर्मितीचे कारण असणारा पंचमहाभूतात्मक ईश्वर आणि पंच महाभूतांचे करण असणारी अव्यक्त माया व त्याचे कारण असणारे ब्राह्मतत्व जे आहे ते तू आहेस,,आणि म्हणून तूच सर्व जगताचे कारण

आहे,,तुझे कारण मात्र कुणीच नाही,,,पण तुझे स्थान अढळ आहे कारण तू नाहीस अशी कोणतीच जागा ह्या जगतात नाही,,आणि म्हणून तू अढळ आहेस,,,तू आपल्या स्वरूपाच्या ठिकाणी अढळ आहे,,,तू स्वरूपाच्या ठिकाणी अविनाशी आहे,,तूच सर्व जगताचा प्रकाशक आहे,,,तूच अधिष्ठान रूप आहेच,,,''मित्रानो श्री गणेशाचे रूप पाहिल्यावर ह्या विचारांचे दृढीकरण होणे खूप आवश्यक आहे,,

अविर्भूतच सृष्ट्यादौ:–ह्या सृष्टीची निर्मिती होण्यापूर्वीच त्याचे अस्तित्व आहे,,आपण संपूर्ण जगताकडे दृष्टिक्षेप टाकल्यास लक्षात येईल की ह्या जगताला पूर्वीचा अभाव होता आणि नंतरचाही अभाव आहे,,निर्मितीपूर्वी चा अभाव म्हणजेच प्रागभाव व निर्मितीनंतरचा अभाव म्हणजेच प्रधवांसाभाव आहे पण हे दोन्ही अभाव चैतन्य स्वरूप ब्रह्माला लागू नाहीत,,,उदा घटाची निर्मिती होण्यापूर्वी आकार रूपाने ह्याचा अभाव होता आणि घट फुटल्यावर सुद्धा आकार नाव ह्याचा अभाव असेल पण त्यातील माती तत्वाला ह्याचा फरक पडत नाही ते तत्व कायम स्थिर आहे,,घटाच्या जीवनातील कोणत्याही अवस्थेत मृत्तिकातत्वात फरक होत नाही,,घट बनण्याचे पूर्वी मृत्तिका होती आणि घट फुटल्यावरही मृत्तिका राहणारच,,,तसेच जगत निर्माण होण्याची पूर्वी तू होतास आणि आता जगताच्या अंतनंतरही तू असशीलच कारण तू निर्गुण निराकार आहेस तूच सतचीदानंद स्वरूप आहेस,,,ह्या परिवर्तनशील जगताचे अपरिवर्तनीय अधिष्ठान तूच आहेस,,,,

प्रकृते पुरुषातपरं:–हे गणेश तू प्रकृती आणि पुरुष ह्याच्या पलीकडे असणारं तत्व आहेस,,ज्याच्या पासून हे प्रकृती आणि पुरुष निर्माण झालेत असा तू पितामह आहेस,,,प्रकृती पुरुषे दोन्ही!उपजली जयाचे मन मनी!!अशी ज्ञानदेव माऊली ची पण अनुभूती आहे,,,,,,,,

## भाग – ६५

**एकदंतं चतुर्हस्तं पाशमंकुशधारिणम। रदं च वरदं हस्तैर्विभ्राणंमूषकध्वजम । रक्तं लंबोदरं शूर्पकर्ण कंरक्तवाससम्। रक्तगंधा। नुलिप्तांगंरक्तपुष्पैः सुपुजितम।। भक्तानु कंपिनं देवं जगत्कारण मच्युतम आविर्भूतंच सृष्टया दौप्रकृतेपुरुषात्परम। एवं ध्यायतियो नित्यं स योगी योगिनांवर :**




श्री गणपतीचे सगुण साकार विलोभनीय दर्शन डोळयांना, मनाला,अंतकरणाला खूप सुखावून गेले,,,त्याच्या सगुण साकार मूर्तीची प्रतिकात्मकता व त्यामागे साधनेची दृष्टी कशी असावी ह्याचा अत्यंत विस्तृत विचार आपण केला आहे,,जेव्हा जेव्हा आपण ही सगुण मूर्तीचे दर्शन घेतो तेव्हा तेव्हा हा भाव आपल्या मनी येणे गरजेचे आहे,,,

एवं ध्यायांती यो नित्यम:–अशा प्रकारे जो गणपतीचे घ्यान करतो,,,,म्हणजेच तत्वाच्या स्तरावर गणपतीचे ध्यान महत्वाचे ठरते,,,पुष्कळदा देवतांचे रूप आपल्याला विचारात पाडते की हे कसे शक्य आहे???पण मित्रानो शास्त्र व गुरुवाक्य ह्यावर विश्वास असणे ह्यालाच तर श्रद्धा म्हणतात,,,,आणि हेच आमच्या तत्त्वज्ञानाने आम्हास शिकविले आहे,,तेथे बुद्धिवाद करण्यात काहीच अर्थ नाही,

‘‘‘हे असे गणपतीचे रूप खरच असेल का??ह्याला जिवंशास्त्राचा आधार आहे का??,‘‘‘हे सगळे पोकळ प्रश्न आहे,,आपली आपल्या ग्रंथावर गुरूवर श्रद्धा हवी,,,करण ‘‘‘श्रद्धावान लभते ज्ञानम‘‘‘आणि ह्या ठिकाणी संशय घेतला तर ‘‘‘संशयात्म विनश्याती‘‘म्हणून संपूर्ण सगुण साकाराचे दर्शन घेताना त्यामागील तत्व विचारात घेऊन जो गणपतीचे ध्यान करतो तो

स:योगी योगीनं वर: :–तो योग्यमध्ये श्रेष्ठ योगी आहे,,,,आता ह्याठिकाणी योगी म्हणजे कोण??असा विचार आपल्या मनात येतो,,,योगी ही बाह्य व्यवस्था आहे की आंतरिक अवस्था आहे??आपल्या समोर दृश्य येते की ज्याने भगवे वस्त्र घातले जटा ठेवल्या,,काही अजून अनुषंगिक बाबी केल्या म्हणजे तो योगी,,,असे नाही,,ज्याने स्वत: ला परम तत्वाशी जोडून घेतले तो योगी आहे,,,योगी असणे ही आंतरिक अवस्था आहे,,ही अवस्था प्राप्त करून घ्यायची असते,,,मेक अप करून ती प्राप्त होणार नाही,,,बाह्य रूप कसे ह्यावर काहीच अवलंबून नाही,,,भगवंताशी जो नित्य जोडला गेला आहे तो योगी,,,आणि तत त्वम असि आणि अयम आत्मा ब्रह्म ही दृष्टी ठेवून जो घ्यान करतो नव्हे ज्याची ही दृष्टी स्थिर झाली आहे पक्की झाली आहे तो सर्व योग्यांमध्ये श्रेष्ठ योगी आहे,,,मग आपणही हा प्रयत्न करायला काय हरकत आहे,,,कारण हीच जीवन विकासाची गुरुकिल्ली आहे,,जी आपल्या गुरूंनी आपल्याला उपलब्ध करून दिली आहे,,,


मित्रानो श्री गणपतीची ही प्रतिकात्मकता आपल्या मनाचे उन्नयन करते,,,पण तरुण पिढीमध्ये ह्याबाबतची उदासीनता खूप अस्वस्थ करते,,,विशेषत: गणपती उत्सवात विविध प्रकारच्या गणपतीच्या मूर्ती पहिल्या की मन खरच नाराज होते,,,माणसाने युगानुकूल असावे

मान्य,,,पण ज्या गोष्टीकडे आपण साधना म्हणून बघतो ती बाब तशीच असावी,,,त्याची युगानुकूलता असू शकत नाही कारण ते वैश्विक सत्य आहे,,आणि सत्य हे त्रिकालाबाधित असते,,,पण आपणही ह्या गोष्टी मान्य करतो ,,नव्हे बरेचदा आपण नावे ठेवण्यात अग्रेसर तर असतोच पण कळस म्हणजे त्यात आम्ही किती बुद्धिवादी आहोत आधुनिक आहोत हा अविर्भाव आपला असतो,,,आणि त्यामुळेच गणपतीची खरी उपासना मागे पडते,,,

,माफ करा पण लोकमान्य टिळकांनी सामाजिक समरसता लक्षात घेऊन गणेश उत्सव प्रारंभ केला,,,किती उदात्त दृष्टिकोन होता त्यांचा,,,पण आजचे त्याचे स्वरूप पाहता असे वाटते की आज जर लोकमान्य असते तर आपल्या उदात्त हेतूंची समाजात होणारी पायमल्ली ते पाहू शकले असते???माझ्या ह्या विधानाला अपवाद बरेच असतीलही,,,असो थोडक्यात काय तर श्री गणेशाची उपासना महत्वाची,,,,,

# भाग–६६

**नमो व्रातपतये। नमो गणपतये। नमः प्रमथपतये। नमस्ते ऽ्स्तु लंबोदरायैकदंताय। विघ्ननाशिने शिवसुताय। श्रीवरदमूर्तये नमो नमः**




श्री गणेशाच्या सगुण साकार मूर्तीचे प्रत्यक्ष दर्शन व त्याची प्रतिकात्मकता हा विलक्षण अनुभव ,,,,आणि साधनेसाठी त्याचा कसा उपयोग करून घ्यायचा ह्याचे विवेचन आपण पाहिले,,,आणि आता ह्या अनुभूतीनंतर आपण श्री गणेशाला वंदन करतोय,,

,(हे वंदन करताना ह्याचा तात्विक आशय ह्यापूर्वी विवेचनात आल्यामुळे त्याची पुनरावृत्ती करीत नाही)

१ नमो व्रत पतये:– व्रात म्हणजे समुदाय . देवांचा दानवांचा राक्षसांचा मानवाचा असे विविध समुदाय आपण पाहतो.. गणपती हा सर्व समुदायाचा स्वामी आहे . अशा गणपतीला आमचा नमस्कार ..

२ नमो गणपतये :– गणांनाम पती,,सर्व चराचर सृष्टीचा तू स्वामी आहेस,,,तुला माझे नमन,,,

३ नमो प्रमथ पतये ,,, प्रमथ म्हणजे प्रमथन करणारा . म्हणजेच ज्या पिडा असतात त्यांचेशमन करणारा .. मित्रानो जीवनात अनेक प्रकारचे ताप येतात . त्याचे विभाजन प्रमुख्याने त्रिवीध तापात

केल्यास हया त्रिविध तापांच शमन करणारा तु आहेस .. तुला आमचे नमन ..

४ नमस्ते स्तु लंबोदराय..,, लंबोदरा तुला आमचे नमन असो .लंबोदर ह्याचा विस्तृत अर्थ आपण ह्यापूर्वी पाहिला आहे ..

५ एकदंताय:–गणपतीच्या एक दंत हा अद्वैताचे निर्देशन करतो,,,अवैदिक मताचे खंडन करणारा,,,तसेच एकमेव अद्वितीय ब्रह्म तत्वाचे निर्देशन करणाऱ्या तुला आमचे नमन,,

६ विघ्न नाशिने ,, सर्व विघ्नांचे नाश करणाऱ्या विघ्नेश्वरा तुला आमचे नमन असो,,,

७ शिवसुताय:–शिव म्हणजे कल्याण प्रद ,,तत्वाच्या दृष्टीने शिव असणारा तू भगवान शंकर ह्यांचा पुत्र आहेस,,सर्वांचे कल्याण करणारा असा तू ,,तुला माझे नमन,,,

८ श्री वरदमूर्तये नमः –सर्वांना वरदान देणाऱ्या हे गणेश तुला माझे नमन असो,,

मित्रानो ह्या नमनाच्या श्लोकात श्री गणेशाच्या आठ नावाचे निर्देशन आहे,,अष्टविनायकाची यात्राचं आपल्याला ह्या श्लोकाचा माध्यमातून घडते,,,प्रत्येक नावाचे स्मरण हे त्याच्या अर्थसकट केल्यास त्याला साधनेचे बळ प्राप्त होईल आणि साधनेच्या रूपात ह्याकडे पाहिल्यास त्याची फलश्रुतीही आपल्याला मिळेल,,,(क्रमशः)

## भाग–६७

**नमो व्रातपतये। नमो गणपतये। नम: प्रमथपतये। नमस्ते ऽस्तु लंबोदरायैकदंताय। विघ्ननाशिने शिवसुताय। श्रीवरदमूर्तये नमो नम:**




श्री गणपती अथर्वशीर्ष ची फलश्रुती सांगण्यात आली त्याचा थोडक्यात विचार करू,,,

आतापर्यंत जी ब्रह्म विद्या ऋषींनी सांगितली ती दोन महावाक्यांचा मागोवा घेऊन,,त्यानुसार अथर्वशीर्षाचा अभ्यास साधनेच्या रूपात आपल्या बुद्धीत उतरविल्यास तसेच गणेश विद्येचे ध्यान केल्यास ,तो साधक ब्रह्मविद्येच्या प्राप्तीसाठी प्राप्त होतो,,ब्रह्मविद्या अभ्यासण्याचा अधिकार प्रत्येकात आहे,,पण ती पात्रता मिळवावी लागेल,

अध्यात्म शास्त्रात ही पात्रता सांगण्यात आली आहे की जो सत्व गुणांचीही पलीकडे गेला तो ब्राह्मविद्येचे पात्र छात्र आहे,,,आशा ब्राह्मविद्याचा साधक हा सुख दुःख ह्याच्या पलीकडे गेला असल्याने तो त्या मर्यादेत नसतो,,त्याला आत्मसुख प्राप्त होते,,आणि त्यामुळेच त्याच्या जीवनात त्याला विघ्नांचे बाधा होत नाही,,,

विघ्न प्रारब्धानुसार येणार पण त्याची साधकाला बाधा होणार नाही कारण त्याचे मन बुद्धी आत्मतत्वाशीच लिन झाल्यामुळे त्याला कोणतेही विक्षेप त्रास देऊ शकत नाही,,,कोणतेही पाप पासून तो मुक्त होतो,,ह्याचा अर्थ पाप करून अथर्वशीर्ष म्हटल्यास पाप धुतले जाते असे होत नाही,,पाप ही क्रिया नसून प्रतिक्रिया आहे ,,शास्त्राने

पाच प्रकारची पापे संगीतली आहेत,,१)ब्रह्महत्या

२)हिंसा

३)परस्त्री गमन

४) परद्रव्य अपहार।

५) सुरापान

ही ती पाच पापे होत,,शास्त्राने काही आचारसंहिता आपणास दिली आहे,,,जे करावे असे शास्त्र सांगते त्याला विधी म्हणतात,,,व जे करू नये असे सांगते त्याला निषेध म्हणतात,,,पण कधी अविवेकाने अज्ञानाने प्रारब्धवश माणसाच्या हातून चुका घडतात,,त्या घडणाऱ्या घटनांकडे साक्षी भावनेने पाहिल्यास त्या घटना मध्ये आपला अहं प्रबळ होता हे लक्षत येईल,,, ,

व्यक्ती मुळातच पाप का करतो??त्याच्या ठिकाणी कर्तृ भाव असतो,,,हा कर्तृ भाव गळून पडला की अहंकार गळून पाडतो,, आणि मग पापत्मक कार्य त्याच्या हातून घडतच नाही,,म्हणून त्या स्थितीपासून उच्चते म्हणजेच स्वत: च्या मनाला उचलायचे आणि ईश्वराच्या अनुसंधानात लावायचे,,,ह्यांनी ब्रह्मस्थिती प्राप्त होईल,,आणि मग अशी स्थिती प्राप्त झाली की त्याचे सुख मग कशावरही अवलंबून राहत नाही,,त्याला वस्तू, विषय निरपेक्ष सुख प्राप्त होते,,,

अशा तर्हेने जर साधक उपासना करीत असेल श्रवण मनन पठण करीत असेल तर त्याची आचारसंहिता काशी असावी ह्याचे विवेचन पुढील भागात,,

# भाग–६८

**एतदथर्वशीर्ष यो।ध़ीते।स ब्रह्मभूयाय कल्पते।**
**स सर्व विघ्नैर्नबाध्यते। स सर्वत: सुखमेधते। स**
**पञ्चमहापापात्प्रमुच्यते**




गणपती अथर्वशीर्ष ची फलश्रुती व्यावहारिक पद्धतीने न घेता तात्त्विक दृष्टिकोनातून स्वीकारल्यास जीवनाच्या उन्नती करिता उपयुक्त ठरते,,,

श्री गणपती अथर्वशीर्ष चे पठण केव्हा करावे?कसे करावे??व पठण केल्याने काय फलश्रुती मिळते??ह्याचे मार्गदर्शन ऋषींनी केले आहे,,ह्यात ही बाब विशेषत्वाने नमूद केले आहे की "'अथर्वशीर्षाचे पठण हे ध्यान ,अर्थसाहित,आणि चिंतन युक्त ,भक्तिपूर्ण अंतकरणाने केल्यास''फलश्रुती प्राप्त होईल,,ही फलश्रुती पठण करणाऱ्याला होईल,,,ह्यातून ऋषींना हेच निर्देशित करायचे आहे की हे पठण तांत्रिक उपक्रम नाही,,तर चिंतनयुक्त उपक्रम आहे,,असो,,,आता हे अथर्वशीर्ष केव्हा म्हणायचे?

सायंकाळी,सकाळी,,संधिकाली म्हणावे,,,म्हणजेच श्री गणेशाचे अखंड चिंतन साधकाला असावे,,म्हणजे त्याचे हातून पाप घडणार नाही,,पाप म्हणजे क्रिया नाही प्रतिक्रिया आहे,,एखादी कृती केल्यावर मनाला दु:ख वेदना,पश्चत्ताप होत असेल तर ते कृत्य पाप

आहे,,आणि पापी माणसाला पापच शिक्षा करते करण त्याचे मन त्याला सतत खात राहते,,आणि म्हणून प्रत्येक कार्य हे श्री गणेशाच्या समरणाने करावे हा ह्यामागे उद्देश आहे,,,

ऋषींना असे अजिबात वाटत नाही की दिवसभर पाप करून आपण सायंकाळी अथर्वशीर्षाचे पठण केल्यास दिवसभराची पापे धुतल्या जातील,,,नाही,,,अजिबात नाही,,,पण सायंकाळ सकाळ साधिकाल आणि सर्वकाळ त्याचे अनुसंधान करावे हे निर्देशित होते,,आणि असे अनुसंधान करणाऱ्या व्यक्तीच्या जीवनात त्याच्या प्रारब्धानुसार घडायचे ते घडेल पण त्याचा त्रास त्याला होणार नाही कारण आता प्रत्येक क्षणावर फक्त गणेशाचाच प्रभाव असेल,,

म्हणजेच कोणत्याही प्रसंगाच्या रूपात त्याचीच कृपा असेल मग तो प्रसंग चांगला असो अथवा वाईट,,,प्रत्येक प्रसंगात तो आपल्याला जागृत ठेवतो,,ह्यालाच ‘‘‘रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग‘‘‘ असला तरी,त्यात ‘‘‘नित्य रोज दिस जागृतीचा‘‘‘ ही अनुभूती असेल,,,आणि तत्वाच्या स्तरावर जसजशी जागृतीचा क्षण वाढत जातील तसतशा आपण केलेल्या कर्माच्या प्रतिक्रिया कमी होतील,,जसजसे प्रतिक्रियांचे कंगोरे घासले जातील तसतसे कर्म अधिकाधिक शुद्ध होईल,,,खूप छान साधना पद्धती ह्याठिकाणी वर्णन केली आहे,,,


गणपती अथर्वशीर्ष चे आवर्तन,,देवी नवरात्रीत रोज सकाळ संध्याकाळ लावलेली माळ,,शंकराच्या पिंडीवर पडणारी सतत धार,,ह्या सगळ्या बाबी साधनेचे सातत्य दाखवितात,,ह्याने अखंडकार वृत्ती बनतात,,व अशाप्रकारे साधना करणाऱ्या साधकाला मग चारही पुरुषार्थ प्राप्त होतात,,,

पण ह्याठिकाणी ऋषींनी काही धोके पण सांगितले आहे,,की

आशिष्याला अथर्वशीर्ष ची शिक्षा दीक्षा आशिष्यास देऊ नये,,ह्याबाबतीत खूप टीका होते,,पण मित्रानो अगदी पहिल्या वर्गात जरी प्रवेश घ्यायचा असेल तरी आज विद्यार्थ्यांची पात्रता पहिली जाते,,,ह्याठिकानी आशिष्य म्हणजे तो आहे त्याच्यापर्यंत हे तत्वज्ञान पोहोचत नाही,,,मग त्याला हे प्राप्तच कसे होणार,,,ज्याच्या पर्यंत हे तत्व पोहोचत नाही तो आशिष्य आहे,,,देणार्याने फक्त देताना अहंकार ठेवू नये,,,घेणारा त्याच्या क्षमतेनुसार स्वीकारणारच आहे,,,तसेच देणार्याने ह्याबाबत आपण काही देतो आहोत त्याबाबत मोह ठेवू नये,,,चुकीचे ज्ञान देऊ नये,,,स्वार्थीपणा ठेऊ नये,,,

# भाग–६९

**सायमधीयानो दिवसकृतं पापं नाशयति। प्रातरधीयानो रात्रिकृतं पापं नाशयति । सायंप्रात: प्रयुंजानो। प़ापो भवति। सर्व त्राधीयानो।प़विघ्नोभवति। धर्मार्थकाममोक्षंचविंदति।**




श्री गणपती अथर्वशीर्षाचे सहस्त्र आवर्तन करावे ह्यातून त्याची संख्या विचारात न घेता त्याचे सातत्य लक्षात घेणे आवश्यक असते,,कोणतेही साधन सुरू केल्यावर आलंबन आवश्यक आहेच पण ते आलंबन आहे हे लक्षात ठेवून ते सुटले पण पाहिजे,,,हे सातत्य निर्माण व्हावे म्हणून सहस्त्र आवर्तन ह्याठिकाणी म्हटले आहे,,आणि कृतीच्या सातत्याने सवय निर्माण होते हा मानस शास्त्रीय सिद्धांत आहे,,,,

१२ व्या श्लोकाचा शब्दश: अर्थ घेतला तर ह्या अथर्व शीर्षाने जो गणपतीला अभिषेक करतो तो उत्तम वक्ता होतो,,चतुर्थीच्या दिवशी काही न खाता जो जप करतो तो विद्यसंपन्न होतो,,,असे अथर्वण ऋषींचे वाक्य आहे,,ब्रह्म व आद्य ह्याचा विलास कळेल त्याला कधीच भीती नाही,,,,


मित्रानो तत्त्व रुपानेच ह्याचा अर्थ आपण घ्यायचा,,उत्तम वक्ता कोण??ज्याच्या जवळ पांडित्य आहे तो की जो अनुभूतीजन्य भाष्य करतो पण त्याचा अहंकार त्याला नसतो तो?? आपल्या सत्ते नाही

मी बोलत!!बोलविता धनी वेगळाच,,ही दृष्टी ज्याची स्थिर झाली तो खरा वक्ता,,ज्ञानाचा अहंकार होऊन पांडित्य युक्त भाष्य करून त्याच्या आधारावर गर्दी खेचणारा त्या ज्ञानाची बोली लावून आपल्या वक्तव्याचे शुल्क ठरविणारा उत्तम वक्ता कसा ठरेल??पण आज हे सगळे निकष बदलले आहेत,,असो,,, काही न खाता म्हणजे काय??आपले शरीराचे खाद्य आहे तसे पंच ज्ञानेंद्रियचे पण खाद्य आहे,,,इतर विषयांचे सेवन न करता जो अथर्वशीर्षाचा जप करतो,,,,जो अथर्वशीर्षाचा जप करतो तो विद्यसंपन्न होतो म्हणजेच त्याला आत्मज्ञानाची प्राप्ती होते,,,ह्याचे कारण जप ह्या क्रियेत मनही अंतर्भूत असते,,वैखरी जप,उपांशु जप,मानसिक जप असे जपाचे प्रकार आहे,,,एक उदा छान देता येईल,,,जप म्हणजे भगवंताचे बोट पकडून चालणे,,,आई चे बोट पकडून मूल चालते तेव्हा त्याला खरच पडण्याचे भय नसते,,,फक्त त्याने मधूनच हात सोडता कामा नये,,,आई त्याला जिथे जायचे आहे तेथे नेतेच न,,अगदी तसेच मंत्र जप म्हणजे त्याचे बोट पकडून जीवनाची वाटचाल करणे,,,आत्मज्ञानापर्यंत तो नेईलच,,,ही अथर्व वाणी आहे,,म्हणजेच ही शाश्वत वाणी आहे,,अनुभव युक्त वाणी आहे,,

आणि हे जगत ब्रह्म आणि मायशक्ती ह्याचा विलास आहे,,आशा ज्ञानाने त्याचे आवरण दूर होते आणि त्याचा परिणाम म्हणजे त्याला मरणाचे,अज्ञानाचे,दु:खाचे भय राहत नाही,,,ह्याचा अर्थ मरण येणार नाही असे नाही,,,येणार पण त्याचे भय वाटणार नाही कारण मरण शरीराला आहे आत्म्याला नाही आणि अयं आत्मा ब्रह्म हा त्याचा निश्चय झालेला असेल,,,,त्याला प्रारब्धानुसार दु:ख येतीलच,,,पण मी सतचीत आनंद स्वरूप आहे ह्याची निश्चिती त्याची झालेली आहे,,मी ज्ञानस्वरूप आहे ह्या अनुभूतीमुळे त्याला अज्ञानाचे पण भय राहणार नाही,,,किती छान आहे हे सर्व,,,

# भाग–७०

**इदमथर्वशीर्षमशिष्याय न देयम। य`यदि मोहाद् दास्यति स पापीयान भवति। सहस्रावर्तनात्यं यं काममधीते तं तमनेन साधयेत**




गणपती अथर्वशीर्षाची फलश्रुती पाहत असताना १४ व्या श्लोकात हवन युक्त उपासना केल्यास काय फलश्रुती मिळेल हे नमूद करण्यात आले आहे,,ह्या ठिकाणी हवनाचा शब्दशः अर्थ घेऊन प्रत्येकजण उपासना करू शकेलच असे नाही शिवाय ती कर्मकांडात्मक उपासना होईल,,,आपण ह्याचा तत्व उपासनेच्या दृष्टिकोनातून अर्थ पाहू,,,

१)जो दुर्वांकुराने हवन करतो तो कुबेरासम होतो:–कुबेरासमान म्हणजेच धनवान,,ह्याठिकाणी धन हे आंतरिक संपत्ती ह्या दृष्टिकोनातून घ्यायचा आहे,,बाह्य लक्ष्मी ज्याला लौकिक भाषेत आपण संपत्ती पैसे म्हणतो ती चंचल आहे,,आपली आंतरिक संपत्ती मात्र आपल्यापासून कुणीच हिरावून घेऊ शकत नाही,,आत्मानंदाची संपत्ती कुणीच हिरावून घेऊ शकत नाही,,

दुर्वांकुराने हवन करण्याने आग विझेल की शांत होईल??मुळातच दुर्वा ह्याचा अर्थ दुःखाचे शमन करणारी,,दूर्व ह्या धातूचा अर्थ नष्ट करणे,,,दुर्वा ही आग शांत करणारी वनस्पती आहे,,पुराणात कथाभाग आहे की अनालासुरला मारण्यासाठी गणपतीने त्याला गिळंकृत केले आणि गणपतीच्या पोटात जेव्हा आग व्हायला लागली

तेव्हा ऋषींनी देवांनी त्याला दुर्वांची जुडी दिली व त्यामुळे त्याच्या पोटातील आग शांत झाली,,,

आता तत्वाच्या स्तरावर पाहिल्यास दु:खाचे शमन करणारी वनस्पती आहे,,आपल्याला शारीरिक स्तरावर अनेक व्याधी येतात दु:ख निर्माण होते,,दुर्वांमध्ये औषधी गुण विज्ञानाने मान्य केले आहे,,,मनाच्या स्तरावर सुख दु:ख त्रास देतात,,,त्रिविध ताप, षड्रिपु,विकार,,इ मुळे आपण दु:ख सहन करतो हे गणपतीच्या चरणावर वाहिल्यास त्याची शांती होईल,,दूर्वांना तीन पाते हे त्रिगुणाचे प्रतीक आहे,,दूर्वा वाहून त्रिगुणतीत होण्याची प्रार्थना करायची,,,

आपल्याला शरीर मन बुद्धी च्या स्तरावर जे जगताबाबत चे चुकीचे तादात्म्य आहे आणि त्यामुळे आपण जीवनात दु:ख भोगतो ह्या सर्वांचे हवन केल्यास आपणास आत्मज्ञानासारखे धन प्राप्त होईल आणि आपण ह्या दृष्टीने धनवान होऊ,,, प्रतिकात्मकते मध्ये माझा देह जर विचारात घेतले तर

५ ज्ञानेंद्रिय,

५ कर्मेंद्रिय,

५ प्राण,


अंत:करण चतुष्टय,आणि

जीवनातील सर्व द्वंद्व

ह्या सर्वांची एकत्र जुडी बांधून ती गणेशाच्या चरणी अर्पण करून त्याचे ज्ञानाच्या अग्नीत हवन करायचे,,आणि त्रिगुणतीत व्हायचे,,असे केल्यास आनंदारूपी धन प्राप्त होईल,,,म्हणूनच गणेश उपासना खूप महत्त्वाची आहे,,,

# भाग–७१

**इदमथर्वशीर्षमशिष्याय न देयम। य`यदि मोहाद् दास्यति स पापीयान भवति। सहस्रावर्तनात्यं यं काममधीते तं तमनेन साधयेत**




आपण हवनयुक्त अथर्वशीर्ष ची साधना पाहतो आहोत,,,आणि हवनयुक्त साधनेची फलश्रुती काय हा खुप महत्वाचा मुद्दा आहे,,,ह्या ठिकाणी एक बाब खूप महत्त्वाची आहे की ह्या हवनाकडे केवळ कर्मकांड म्हणून बघायचे नाही,,तर ह्यामगील भाव हा चित्त शुद्ध करेल,,,म्हणून कर्मकांड युक्त हवन करू नये असेही नाही ,,,पण त्यातून अहंकार निर्माण न होता भावयुक्त अंतकरणाने हे केले तर चित्त शुद्ध व शांत होईल व असे शुद्ध शांत चित्त हे साधनेसाठी उपयुक्त ठरेल,,,असो पुढचे हवन ,,,,,

जो लाह्यांनी हवन करतो तो यशस्वी व सर्वंकष बुद्धिवान होतो,,,यश वान भवति ह्या शब्दातून यशाबाबत चे आश्वासन आहे,,मित्रानो हवन करताना त्यात लाह्या टाकाव्या असा संकेत आपल्या कडे आहे,,लाह्या ह्या धानाच्या ,किंवा ज्वारीच्या असतात,,त्याचे वैशिष्ट्य आहेत,,

१)त्या लाह्या भाजल्यावर स्वछ पांढऱ्या होतात

२)त्याचे मूळ रूप बदलून जाते

३)त्याचे पुन्हा धानात रूपांतर होत नाही

४)त्या पुन्हा रुजत नाही

५) त्या अतिशय हलक्या होतात आणि प्रकृतीसाठी खूप चांगल्या असतात,,,

मित्रानो ,,जेव्हा व्यक्ती कोणतेही तप साधन करतो तेव्हा त्याच्या शरीर मन बुद्धीची आहुती त्याला द्यावी लागते,,म्हणजे तिन्ही स्तरावर त्याचे तप महत्वाचे ठरते,,,पण त्यानंतर त्याचे रूपांतरण जे होते त्यात प्रामुख्याने त्याचे षडविकार संपणे ही क्रिया महत्वाची असते आणि असे घडले की तो शुद्ध सात्विक बनतो,,आणि ज्ञानाच्या अग्नित जेव्हा तो तावून सुलाखून निघतो तेव्हा त्याच्या मनात पुन्हा नवीन वासना रुजत नाही,,,आणि अशा व्यक्तीची दृष्टी ‘‘‘‘तुझे कारणी देह माझा पडावा’’’अशी बनते,,,ह्या सर्वांचे प्रतीक म्हणजे लाह्यांचा होम,,,हे सत्वगुणात्मक समर्पण आहे,,आणि जे माझ्या भगवंताला समर्पण करायचे ते शुद्ध आणि सात्विक असायलाच हवे,,, म्हणून हा होम महत्वाचा आहे,,,देहभावनेचा बळी ह्या होमात द्यावयाचा आहे,,असे केल्यास साधकाला यश प्राप्त होईल,,म्हणजे पैसे धन गाडी बंगला कीर्ती पद प्रतिष्ठा मिळेल का???आपण ह्यालाच यश समजतो,,,नाही तसे काहीही होणार नाही,,ते तुमच्या प्रारब्धात असेल तर अथर्वशीर्ष न म्हणताही मिळेल,,,

यश म्हणजे,श्री,गुणसंपत्ती,औदार्य,विवेक,ज्ञान ,वैराग्य,हे यश प्राप्त होईल आणि स मेधावन भवति,,,तो साधक बुद्धिवान बनेल,,,म्हणजे त्याला खूप मार्क्स मिळतील,,मेरिट येईल असे होईल का???ह्याला बुद्धिवान नाही म्हणत,,,,

बुद्धिवान तोच आहे ज्याने आत्मनिश्चय केला आहे,,

बुद्धिवान तो ज्याने आत्म अनात्म विवेक केला ,,,

बुद्धिवान तो आहे ज्याने आपला योग परमतत्वाशी जोडला,,,

बुद्धिवान तो ज्याने ह्या जगताचे खरे रूप जाणले,,

बुद्धिवान तो ज्याने आपल्या विकारांचे कंगोरे घासले,,,

बुद्धिवान तो ज्याने शास्त्राचे अर्थनिर्वाचन योग्य केले,,

बुद्धिवान तो ज्याची शास्त्र गुरुवाक्य ह्यावर श्रद्धा आहे,,

बुद्धिवान तो ज्याने तत्वातून सत्वात जाण्याचा निश्चय केला,,

बुद्धिमान तो जो कोणताही भेदाभेद न ठेवता ह्या जगताकडे पाहतो,,,

बुद्धिवान तो ज्याला सर्वत्र चैतन्य दृष्टीस येते,,,

बुद्धिवान तो जो अयं आत्मा ब्रह्म ह्या भावात निरंतर असतो,,,ह्याची अनुभूतीत नित्य असतो,,,

बुद्धिवान तो ज्याच्या मनात शास्त्र गुरुवाक्य ह्याबद्दल शंका तर नाहीच पण त्यांनी जो उपदेश केला तो अगदी तंतोतंत ग्रहण करतो,,,

किती छान आहेत ह्या सर्व बुद्धीच्या परिभाषा,,,श्री गणेश साधनेने उपासनेने हे सर्व साध्य होईल,,,आणि त्यायोगे मग जीवन सफल व सार्थक होईल हा ऋषींनी दिलेले वचन आहे,,,ते निरर्थक असूच शकत नाही,,,ह्या सर्व दृष्टींनी लाह्यांचा होम खूप महत्त्वाचा ठरतो,,,

# भाग–७२

**इदमथर्वशीर्षमशिष्याय न देयम। य`यदि मोहाद् दास्यति स पापीयान भवति। सहस्त्रावर्तनात्यं यं काममधीते तं तमनेन साधयेत**




आपण अथर्वशीर्ष च्या उपासनेचे पठणाचे फलश्रुती पहात आहोत,,

सहस्त्र मोदकांनी युक्त असे हवन केल्यास इच्छित फळाची प्राप्ती होते,,,मोद म्हणजे आनंद,,आनंद करणारा मोदक,,, हे शाश्वत आनंदाचे प्रतीक आहे,,आणि शाश्वत आनंदाची प्राप्ती फक्त शाश्वत वास्तुपासूनच प्राप्त होऊ शकते,,,माउलींनी वेदांत तो महारसू!!तो मोदकु मिरवे!!असे म्हटले आहे,,वेदांत रुपी हा जो महार स आहे त्यातून मिळणारा आनंद हा शाश्वत आनंद आहे,,बाकी जीवनातील सर्व रस निरस आहेत,,,ब्राह्मरसाच्या पासून मिळणारा ब्रह्मानंदच शाश्वत आहे,,,बाकी सर्व अशाश्वत आनंद आहेत,,,

करण आशा मोदयुक्त अंतकरणाने अथर्वशीर्षाचे पठण केल्यास अंतकरणाची शुद्धी होईल,,,मालिनता विक्षिप्तता दूर होईल,,आवरण दूर होईल,,त्यातून निर्माण होणाऱ्या आनंदाचे निर्देशन ह्या ठिकाणी केले आहे,,,

येथे य:हा शब्द वापरला आहे तो सर्वांकरिता लागू आहे,,,स्त्री पुरुष जाती धर्म सर्वांकरिता लागू आहे,,ह्याठिकाणी भेद नाही,,जो केला तो आपण केला आहे,,,


घृतयुक्त समिधानी हवन केल्यास त्याला सर्व काही प्राप्त होते,,,अग्निकुंडात यज्ञात समिधांचे हवन करतात,,ह्या वाळलेल्या असतात तद्वतच साधकाच्या वासना ह्या संपुष्टात आलेले वाळलेल्या असाव्यात,,ह्या समिधा धृतयुक्त म्हटल्या आहेत कारण धृत हे स्निग्धतेचे प्रतीक आहे,,समिधा जळाव्या म्हणून घृत लावतात,,,आपला समर्पण भाव हा प्रेमयुक्त अंतकरणाचा असावा,,,म्हणून धृतयुक्त समिधा या सेवा समर्पण भावाचे प्रतीक आहेत,,,सेवाभावनेने अंतःकरण शुद्ध होते व त्यात नव्याने वासना निर्माण होत नाहीत,,,जेवढे वासनांचे ओझे कमी तेवढे विक्षेप कमी,,जेवढे विक्षेप कमी तेवढे चित्त शांत आणि जेवढे चित्त शांत तेवढे ते गुणवत्ता पूर्ण होते व ते चांगल्या विचारांना प्रेरित बनते,,,आणि हे अंतःकरण प्रेमयुक्त असेल तर ते परमेश्वराला चटकन शरण जाते व जाणून घेते,,, मग अशा व्यक्तीस जीवनात कशाचीही कमतरता राहत नाही,,,,भौतिक दृष्ट्या तो कमकुवत असेल पण अध्यात्मिक ऐश्वर्य त्याला प्राप्त होते,,,हे गणेश उपासनेचे खरेखुरे फळ आहे,,,

## भाग-७३

**अनेन गणपतिमभिषिंचति स वाग्मी भवति**

**चतुर्थ्यामनश्नन जपति स विद्यावान भवति। इत्यथर्वणवाक्यं।**

**ब्रह्माद्यावरणं विद्यात्न बिभेति कदाचनेति ।।१४।।**





गणपती अथर्वशीर्षाचे साधनेच्या दृष्टीने महत्व आहेच आणि म्हणून त्याची लौकिक फलश्रुती न बघता अध्यात्मिक फलश्रुती महत्वाची ठरते, आठब्राह्मणांना योग्य प्रकारे ह्याचा उपदेश केल्यास करणारा सूर्यप्रमाणे तेजस्वी होतो, सूर्यग्रहण,महानदीतीरी,किंवा गणपती प्रतिमेजवळ, जप केल्यास हा मंत्र सिद्ध होतो, असा मंत्र सिद्ध करणारा महाविघ्नांपासून,महादोषापासून, महापापापासून ,मुक्त होतो व सार्वज्ञा होतो, तो सर्वसंपन्नहोतो, हे असे उपनिषद आहे.

मित्रानो ब्राह्मण हा शब्द जातीवाचक नाही, ब्रह्म स्वरूपाचे ज्ञान प्राप्त करणारा तो ब्राह्मण मग तो कोणत्याही जातीचा असू देत, आशा जिज्ञासू साधकाजवल अथर्वशीर्षाचे विवेचन करणार्यालपण त्याचा विशेष अभ्यास करावाच लागतो त्याचा आशय जाणून घ्यावे लागतो, पाच ज्ञानेंद्रिये शरीर मन बुद्धी ही जी अष्ट धा प्रकृती आहे ही सर्व ज्ञान ग्रहण करणारी उपकरणे आहेत, आणि म्हणून कायिक वाचिक मानसिक अध्यात्मिक स्तरावर हे आठ ब्राह्मण आपल्यातच आहे, आणि ह्या आठ ब्राह्मणांना आपण हे अथर्वशीर्ष पचनी पडले

तर निश्चित पणे आपण सूर्यासारखे तेजस्वी होऊ म्हणजेच ज्ञानसंपन्न होऊ.

अज्ञानाचे ग्रहण लागल्यावर ह्याचे निश्चितच ध्यान करावे, भव सागर कठीण घोर षड्रिपु हे करिती जोर'असे तुकडोजी महाराज म्हणतात, महानदी ही भावसागरच आहे त्याच्या किनारी बसून म्हणजेच आपल्याच प्रपंचकडे तठस्थ तेणे पाहून अथर्वशीर्षाची साधना केली असता, तसेच प्रत्यक्ष श्री गणेशाचे सगुण ध्यान व त्याची प्रतिकात्मकता आपल्या अंगी रुजविल्यास साधक महा दोष व महापाप ह्यापासून मुक्त होतो, महादोष व महा पाप हे अविद्या व अज्ञान आहे, तत त्वम असि व अयम आत्मा ब्रह्म ह्या अनुभूतीचेच हे दूर होते, स्वतः बाबत चे अज्ञान हे सर्वात मोठे पाप आहे, आशा ह्या पापा पासून मुक्त करणारे हे उपनिषद आहे,

## ओम चिन्मय गणाधिशाय नमः





# प.पू. गुरुदेव चिन्मयानंद ह्यांच्या परमपवित्र चरणावर लेखन सेवा अर्पण

डॉ. वसुधा विनोद देव